

छत्रपती संभाजी महाराज

गोविंद सखाराम सरदेसाई

वरदा प्रकाशन

छत्रपती संभाजी महाराज

गोविंद सखाराम सरदेसाई

वरदा प्रकाशन

प्रस्तावना

मराठी रियासतीचे पुनर्मुद्रण प्रमुख व्यक्तिंच्या चरित्ररुपाने प्रसिद्ध करण्याचे ठरविले, त्याचे पहिले दोन भाग शहाजीराजे व शिवाजीराजे यांचे पूर्वीच बाहेर आले असून त्या पुढचा हा तिसरा भाग संभाजीराजांच्या कालाचा आता मी वाचकांचे हाती देत आहे. प्रस्तावरूपाने मला जे काही सांगणे आवश्यक वाटले, ते मागच्या भागात सांगितले असल्यामुळे आणि वस्तुत: हे सर्व खंड मिळून एकाच ग्रंथाची रचना तयार होत असल्यामुळे, त्या संबंधाने फिरून विशेष काही सांगण्याचे उरत नाही. ऐतिहासिक दृष्टीने शिवाजीराजे व संभाजीराजे यांच्या कर्तबगारीचा व तत्कालीन घडामोडींचा भरपूर विचार पुस्तकात ठिकठिकाणी येऊन गेला आहे.

संभाजीराजांच्या चरित्राच्या मांडणीवरून सहज दृष्टी फिरवली तरी पूर्वीच्या आवृत्तीतील काहीच अंश यात शिल्लक राहिलेला नाही हे लक्षात येईल. वीस वर्षांच्या संशोधनाने पूर्वीचे संशयात्मक भाग पुष्कळसे निश्चित झाले असून एकंदर कारकीर्दिचे मुख्य स्वरूप कार्यकारणभावाच्या पद्धतीने आता स्पष्ट मांडता येते. थोडीबहुत तपशिलाची भर अद्यापि ठिकठिकाणी पडण्यास अवकाश आहे, पण त्याचा सांगाडा मात्र म्हणण्यासारखा फिरणार नाही अशी माझी समजूत आहे. तथापि संशोधनदेखील सदैव वाढत्या प्रमाणात आहे आणि अनेकांच्या श्रमाने आपला राष्ट्रेतिहास उत्तरोत्तर पूर्णत्वास पोहचत आहे हे पाहून कोणासही आनंदच वाटेल. एकंदर ऐतिहासिक साधनांची चिकित्सा पूर्वीच्या भागात केली असल्यामुळे, त्या संबंधानेदेखील पुनरपि निराळे काही सांगणे राहत नाही. अभ्यासकांच्या सोयीसाठी साधनांचा निर्देश पादटीपांत शक्य तितका भरपूर केला आहे; आणि नकाशे वगैरे देऊन हे पुस्तक प्राप्त परिस्थितीत सामान्य वाचकांच्या व विशिष्ट अभ्यासकांच्या उपयोगी पडावे असा प्रयत्न मी केला आहे, तो कितपत सिद्धीस जातो हे ठरविणे वाचकवर्गाकडे आहे.

आता मी हे प्रास्ताविक निवेदन संपवितो.

कामशेत, जि.पुणे गो. स. सरदेसाई
ता. 12 नोव्हेंबर 1935

प्रकरण 1
पन्हाळ्याहून रायगडावर
ईसवी सन 1680

1. कारकिर्दिचा आढावा, 2. राज्यारोहण, 3.शहजादा अकबराचे आगमन, दुर्गादास, 4. प्रधानांच्या नेमणुका, कविकलश

1. कारकिर्दिचा आढावा :

छत्रपती संभाजीराजांची कारकीर्द शिवाजीराजांच्या इतकीच किंबहुना जास्त अभ्यसनीय आहे. इतिहास म्हणजे मानवीय घडामोडींचा वृत्तान्त होय. यशापयश नेहमीच मनुष्यास साध्य असते असे नाही. अर्थात संभाजीराजांचा कारभार यशस्वी झाला नाही तर त्याची कारणे शोधून काढणे इतिहासाला सारखेच अगत्याचे आहे. संधीचा उपयोग करण्यात शिवाजीराजांचे चातुर्य दिसते; त्याच्या उलट आलेली संधी फुकट दवडल्याचे प्रसंग संभाजीराजांच्या कारभारात वारंवार नजरेस येतात. शौर्य, पराक्रम, राष्ट्रप्रेम इत्यादि थोर गुण संभाजीराजांच्या ठिकाणी भरपूर होते; इतके असून अनावर क्रोधावेशामुळे नऊ वर्षांच्या अल्पावधीतील त्यांचे सर्व प्रयत्न फुकट जाऊन त्याचा शेवट हृदयद्रावक झाला, याबद्दल अनुकंपा वाटल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या कारभारांशी संबंध असलेल्या व्यक्ती व प्रसंग चित्ताकर्षक असून विहंगम दृष्टीने त्यांचे हृद्गत ओळखणे बोधप्रद आहे.

राजे संभाजी, औरंगजेब, त्याचा पुत्र शहजादा अकबर, अकबराचा एकनिष्ठ सहायक दुर्गादास, आणि संभाजीराजांचा हस्तक कविकलश इतक्या मुख्य व्यक्तिंचे भिन्न-भिन्न उद्योग व उद्देश संभाजीराजांच्या इतिहासात आपणास लक्षात घ्यावे लागतात. शिवाजीमहाराजांचे पश्चात् अल्पवयी राजारामाला गादीवर बसविण्याचा प्रयत्न झाला तो हाणून पाडण्यात संभाजीराजांची अनुपम तडफ दिसून आली आणि तेवढ्यावरच त्यांची नीट व्यवस्था लागली असती तर कारभाराचे गाडे सुरळीत चालू लागले असते. पण पुन्हा लगेच त्यांस राज्यावरून काढण्याचा प्रयत्न मुत्सद्द्यांकडून झाल्याने, स्वकियांविषयी जी एक तेढ संभाजीराजांच्या अंत:करणात उत्पन्न झाली, तिच्यामुळे सर्वत्र अविश्वास निर्माण होऊन ते स्वत:च्या कर्तव्यात असहाय्य बनले.

याचवेळी बाह्य राजकारणात एक प्रचंड व आकस्मिक प्रकार घडून आला. दिल्लीपति औरंगजेबाने राजपूत राजांस जिंकण्यासाठी युद्ध चालविले होते, त्यात त्याचा पुत्र अकबर राजपुतांस मिळून बापावर चालून गेला असता पराभव पावून दक्षिणेत संभाजीराजांच्या आश्रयास आला. मारवाडचा दुर्गादास हा शूर व कल्पक राष्ट्रपुरुष अकबराचा सहायक होता, त्यानेच त्या शहजाद्यास दक्षिणेत आणून असे राजकारण घडवून आणले की ‘मराठे व राजपूत या दोघांनी स्वधर्मरक्षणाचे हेतूने संगनमत करून परधर्मद्वेषी औरंगजेबाचा पाडाव करावा’ ही योजना सिद्धीस नेणे म्हणजे एकप्रकारे शिवाजीराजांचा हिंदुपदपातशाहीचा उद्योग पूर्ण करण्यासारखेच होते. हे आपल्यावर ओढवलेले प्रचंड संकट निवारण्यासाठी औरंगजेबास पुत्राचे मागोमाग दक्षिणेत धाव घेण्याची जरूर पडली; आणि उत्तरेतील राजपुतांस जिंकण्याऐवजी प्रथम दक्षिणेतील मराठ्यांस जिंकण्याची त्याने तयारी केली. त्याचा मनोरथ पंचवीस वर्षे सतत झगडूनही शेवटास गेला नाही हा या तीव्र झगडण्याचा मतितार्थ आहे. त्या झगड्यात मराठ्यांचे दोन छत्रपती खपले, पण अखेरीस शिवछत्रपतींच्या सुनेने त्या बलवान बादशहावर मात करून दाखवली. अर्थात ऐतिहासिक दृष्टीने नुसत्या संभाजीराजांची कारकीर्द तेवढी लक्षात घेऊन आपले भागणार नाही. ती कारकीर्द अपेशी दिसली तरी मुख्य घडामोडींचा तो केवळ पहिला अंक होय. संभाजी, कविकलश, अकबर व दुर्गादास यांनी आपापल्या परी अक्कल लढवून सहा वर्षे बादशहाला सडकून विरोध केला. तेवढ्या अवधित जंजिऱ्याचा सिद्दि, गोव्याचे पोर्तुगीज, वाडीकर सावंत इत्यादिकांस बादशहाने संभाजीराजांविरुद्ध उठवले आणि आपले मोठमोठे सरदार, शहाआलम, अजमशहा व कामबक्ष हे तिघे पराक्रमी पुत्र व तशाच तोडीचे त्याचे अनेक नातू यांसह प्रचंड फौजेनिशी दक्षिणेत युद्ध केले. येताक्षणी त्याने आपल्या सर्व सैनिकांस पृथक् कार्यभाग नेमून देऊन संभाजीराजांच्या प्रदेशावर चहूकडून चाल केली. त्यामुळे संभाजीराजांची नऊ वर्षांची कारकीर्द बादशहाशी झगडण्यातच खर्च झाली.

युद्धाच्या दृष्टीने या नऊ वर्षांच्या काळाचे दोन भाग स्पष्ट दिसतात. स.1685 जूनपर्यंतचा मोगलांच्या झगड्याचा पहिला भाग व त्यानंतरच्या काळाचा दुसरा भाग. पहिल्या भागात संभाजीराजांनी स्वकीयांचे बंडावे मोडून औरंगजेब व पोर्तुगीज यांच्याशी निकराचा सामना केला त्याचा अंतर्भाव होतो. या सामन्यात बादशहाला संभाजीराजांपुढे एकप्रकारे हार खावी लागली, आणि नाइलाजाने त्याने आपले लक्ष संभाजीराजांकडून काढून विजापूर व गोवळकोंडा ही राज्ये हस्तगत करण्याचा प्रथम उद्योग केला. त्या संधीत अकबराचा योग्य पाठपुरावा करून संभाजीराजांनी बाहशहावर त्वरेने चढाई केली असती तर औरंगजेबाचा निभाव इकडे बहुधा लागलाच नसता. परंतु हा मार्ग संभाजीराजांनी स्वीकारला नाही. म्हणून शहजाद्याला हिंदुस्थानात राहणे अशक्य होऊन इराणला प्रयाण करावे लागले. त्यामुळे संभाजीराजे अगदीच असहाय्य पडले आणि विजापूर व गोवळकोंडा ही राज्ये जिंकल्यावर औरंगजेबास चहूकडे निर्वीर्य व निर्भय वातावरण प्राप्त

झाले. अर्थात या दुसऱ्या कालखंडात पहिल्यासारख्या संभाजीराजांच्या तीव्र हालचाली बहुधा नजरेस येत नाहीत. या वेळीही स्वत: आपल्या फौजेचे आधिपत्य स्वीकारून पुन्हा पहिल्याप्रमाणे त्याने बादशहाशी युद्ध चालविले असते तर त्यांजवर विपरीत प्रसंग ओढवला नसता असे वाटू लागते. कारण बादशहाचा उद्योग उत्तरेत काय किंवा दक्षिणेत काय, कोणासही पसंत नसून सर्वत्र त्याच्या कृत्यांबद्दल नाराजीच उत्पन्न झालेली होती. पण शेवटी-शेवटी संभाजीराजांची पूर्वीची तडफ साफ मावळली, तेणेकरून उघड युद्धात मरण येण्यापेक्षा गुप्त छाप्यांत शत्रूस हस्तगत होण्याचा प्रसंग त्याजवर ओढवला. संभाजीराजे थोडेबहुत गाफील राहिल्यामुळे त्यांजवर एकाएकी झडप घालणे बादशहास शक्य झाले. अशाही जिवावरच्या प्रसंगात त्यांनी आपला वीर्यशाली बाणा बिलकूल न सोडता धैर्याने भीषण मृत्यु पत्करला, आणि एवढ्या कठोर प्रायश्चित्ताने आपली मागची सर्व पापे एकदम धुऊन काढली. अशी ही नऊ वर्षांची संभाजीराजांची कारकीर्द एकाबाजूने अत्यंत शोकपर्यवसायी, तर दुसऱ्या बाजूने विशेष अभिनंदनीय म्हटली पाहिजे.

नऊ वर्षांच्या या काळातील निरनिराळ्या घडामोडी, त्यात भाग घेणाऱ्या व्यक्ति व चहूकडे चाललेल्या त्यांच्या हालचाली यांची गुंतागुंत सोडविण्यासाठी कित्येक कालदर्शक टप्पे ध्यानात ठेवणे जरूर आहे. प्रत्येक प्रकरणाच्या आरंभी हे टप्पे दाखविण्यात येतील. तेव्हा प्रथमारंभी शिवाजीराजांचा मृत्यु झाल्यावर संभाजीराजांचे राज्यारोहण कशा रीतीने पार पडले तो भाग सांगितला पाहिजे, म्हणजे त्यावरून संभाजीराजांच्या परिस्थितीचा योग्य बोध वाचकांस होईल. या भागात खालील कालदर्शक प्रसंग लक्षात ठेवावे लागतात :

ता. 4.4.1680 रायगडावर शिवाजीराजांचा मृत्यु.

ता. 21.4.1680 राजारामाराजांची राज्यपदावर स्थापना.

ता. 16.1.1681 संभाजीराजांचे पन्हाळ्याहून रायगडावर आक्रमण, विरोधकांचा पाडाव व त्यांना राज्याभिषेक.

2. राज्यारोहण (20.7.1680), राज्याभिषेक (16.1.1681) :

संभाजीराजांचा जन्म ता. 14.5.1657 रोजी पुरंदरावर झाला. नंतर दोन वर्षांनी त्यांची आई सईबाई ता. 5.9.1659 रोजी वारल्यामुळे त्यांचे संगोपन आजी जिजाबाईने केले. शिवाजीराजांसारखेच त्यांचेही बालपण साहसात व धामधुमीत गेले. शायिस्ताखान व जयसिंह यांच्याशी शिवाजीराजांचे सामने झाले, ते... ते डोळ्यांपुढे पाहत होते. वयाच्या नवव्या वर्षी ते बापाबरोबर आगऱ्यास गेले आणि तेथे बादशहाच्या अटकेत पडून फळमेव्याच्या टोपलीत बसून बाहेर निसटले. एवढ्या विलक्षण साहसाचा परिणाम त्यांच्या मनावर होऊन त्यांस महाराष्ट्राबाहेरील जगाची चांगली ओळख झाली. शिवाजीराजांनी जो

उपक्रम अंगिकारला त्यातील खाचखळगे पुत्रास स्वानुभवाने नीट कळून यावेत अशीच शिवाजीराजांची भावना आरंभापासून व्यक्त होते. लहानपणापासून त्यांस शिक्षण देण्याची तजवीज केलेली होती. उमाजी पंडित संभाजीराजांचा शिक्षक होता.

स.1666 चे अखेरीस पितापुत्र सुखरूपपणे स्वदेशी परत आले. नंतर स.1668 मध्ये शिवाजीराजांचा बादशहाशी तह ठरला, त्यात संभाजीराजांस बादशहाचे पदरी सप्तहजारी मनसब मिळून ते पुढे दोन वर्षेपावेतो बऱ्हाणपुरानजीक मोगल छावणीत जाऊन राहिले. त्यावेळी शहजादा मुअज्जम बऱ्हाणपुरचा सुभेदार होता, तो केवळ बादशाही थाटाने चैनीत राहत असे. औरंगजेबाची स्वत:ची राहणी फार साधी होती, पण त्याचे मुलगे ऐषआरामात निमग्न असत. संभाजीराजांना याच दोन वर्षांत उत्तरेकडील थाटामाटाची व चैनीने राहण्याची चटक लागली असावी. बहुधा शहाजाद्याशी त्यांचा स्नेहही जुळला असावा. संभाजीराजांस बऱ्हाणपुरास असता शिकारीचा नाद विशेष लागला आणि अशा एका नादाच्या पायी दुसरेही कित्येक नाद संगतीने जडत गेले. बापाबरोबर उत्तर हिंदुस्थानात असताना तिकडील बादशाही बडेजाव, सरदार लोकांचा थाट व ऐषआराम यांची संभाजीराजांना पहिली ओळख झाली आणि त्याच्या वृत्ती थोड्याबहुत कलुषित होऊ लागल्या. बऱ्हाणपुरास असताना अशा विकारवशतेस पुष्टी मिळाली आणि त्यांचा स्वभाव छांदिष्ट व विषयी बनू लागला. मुलाची ही प्रवृत्ति शिवाजीराजांनी थोडीबहुत ओळखली असावी असे दिसते. कारण सन1672-73 पासून त्यांजवर जबाबदारी टाकून त्यांस राज्याचे कामात गुंतविण्याचा प्रघात त्यांनी घातला. त्या साली विजापुराशी शिवाजीराजांनी युद्ध सुरु केले, त्यात संभाजीराजांकडे मुख्य कामगिरी देऊन त्यांचे जोडीस अनाजीपंतास नेमले. त्या वेळेपासून संभाजीराजांचे वास्तव्य पन्हाळ्यास ठरविण्यात आले. स्वत: शिवाजीराजेही पुष्कळदा त्याच किल्ल्यावर राहून कारभार पाहत असंत. रायगडापेक्षा काही बाबतीत शिवाजीराजांना बाह्य प्रदेशांशी संबंध ठेवण्यास पन्हाळगड जास्त पसंत होता. मुख्यत: विजापूरचे राज्य ग्रासण्यास हा किल्ला सोयीचा असल्यामुळे आदिलशहालाही तो, ‘आपल्या हातात असावा’ अशी मोठी इच्छा असे. शहाजींच्या वेळी सिंहगडाचे महत्त्व मावळ प्रांतापुरते होते. रायगडाचा मुख्य विशेष ‘संरक्षण’ हा होता परंतु चालू कारभारास व लोकांच्या रहदारीस तो किल्ला गैरसोयीचा होता. म्हणून शिवाजीराजांपासून ताराबाई पावेतो पन्हाळा हीच एका अर्थाने छत्रपतींची राजधानी होती. तेथेच संभाजीराजांचा पुष्कळसा काळ गेला.

रायगडावर शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक समारंभ झाला, तेव्हा इंग्रजांसारख्यांचे व्यवहार पाहण्याचे काम संभाजीराजांना सांगण्यात आले होते. म्हणजे महत्त्वाच्या कामात मन घालून राज्याचे हिताहित पाहण्याची त्यांस बुद्धी यावी अशी व्यवस्था करण्यात शिवाजीराजांनी बिलकूल हयगय केली नाही. परंतु उत्तरोत्तर त्यांचे दुर्वर्तन शिवाजीराजांचे नजरेस येऊ लागले. ‘प्रभात’ नामक ‘91 कलमी’ बखरीत एक उल्लेख आहे तो असा.

‘‘संभाजीराजांवर इतराजी झाली. शृंगारपुरी ठेविले. पढवावयास उमाजी पंडित ठेविले होते. तैनातीस मावळे सरदार व स्वार होते. दिलेलखानाकडे राजकारण करून स्त्रीसहवर्तमान रातोरात निघोन गेले. उमाजी पंडितास पुढे बिदनुरास वकील म्हणून पाठविले.’’ सन 1678 च्या नोव्हेंबरपासून एक वर्ष संभाजीराजे मोगलांस जाऊन मिळाले होते. तेथून मोठ्या युक्तीने बापाने त्यांस परत आणले. याप्रमाणे विरुद्ध वागून प्रत्यक्ष शत्रूस मिळण्यासारखे वाईट कृत्य करण्यास संभाजीराजांस काय कारण झाले, त्याचा उलगडा होत नाही. बहुधा ते उच्छृंखल व दुर्वृत्त बनले, त्याचे बोभाटे शिवाजीराजांच्या कानावर येऊन त्यांनी त्यांचा निषेध केला, तो संभाजीराजांच्या मानी व रागीट स्वभावास सहन झाला नसावा. मुलाच्या दुर्वर्तनामुळे शिवाजीराजांची बुद्धी देखील कुंठित झाली आणि त्यांस मृत्युही विमनस्क स्थितीत आला.

मरणसमयी शिवाजीराजांनी राज्याची पुढील काहीएक व्यवस्था ठरवली नव्हती; आणि संभाजीराजांचा हक्कही नष्ट केला नव्हता. मात्र ते पन्हाळगडावर अटकेत होते, तरी ती अटक नजरकैदेसारखी असून, दक्षिणेकडील प्रदेशाचा कारभार त्यांनी पहावा आणि एखादे गैरकृत्य ते करतील तर त्यांस जनार्दनपंत हणमंत्याने अटकाव करावा एवढीच शिवाजीराजांची ताकीद होती. संभाजीराजांचा स्वभाव विश्वासघातकी किंवा आतल्या गाठीचा नव्हता. ते शूर, उदार, दिलदार, पण उतावळे व तामसी होते. लहर आली म्हणजे ते काय करतील याचा नेम नसे. भिन्न प्रकृतीच्या माणसांस सांभाळून त्यांचा उपयोग योग्य कामी करून घेण्याचे शिवाजीराजांचे कसब त्यांस बिलकूल नव्हते. म्हणूनच त्यांच्या इतर गुणांवर अंती पाणी पडले. लक्षात ठेवण्याचा मुद्दा असा, की ‘शिवाजीराजांच्या मृत्युनंतर आपण राज्याचे मालक’ ही संभाजीराजांची समजूत कायम असल्यामुळे रायगडावरील विपरीत प्रकार ऐकून ते चिडून गेले.

इकडे रायगडावर शिवाजीमहाराजांचा मृत्यु होताच संभाजीराजा पूर्णपणे अटकेत आहे अशा समजुतीवर सोयराबाई व अनाजीपंत यांनी संभाजीराजांस कळू न देता राजारामास गादीवर बसविण्याचा बेत रचला. शिवाजीराजांची उत्तरक्रीया राजारामाचे संनिध साबाजी भोसले शिंगणापुरकर याचे हस्ते करण्यात आली. मुद्दामच मृत्युची बातमी उघडपणे संभाजीराजांस कळविण्यात आली नाही. त्यांना बोलावणे गेले असते तर तीन-चार दिवसात ते रायगडावर येऊ शकले असते. मोरोपंत पिंगळे व अनाजी दत्तो बाहेर होते ते लगेच रायगडावर दाखल झाले. प्रल्हाद निराजी, रामचंद्र नीळकंठ व मुख्य लेखक बाळाजी आवजी अगोदरच तेथे होते. त्यांच्या विचारे सोयराबाईने ता. 21.4.1680 रोजी राजारामास गादीवर बसवून रायगडाचा बंदोबस्त केला. आवजी बल्लाळ याचे हाते पत्रे लिहवून ती तिने पन्हाळ्यास खंडोजी नाईक जासूद व गणोजी कावळा यांजबरोबर पाठविली. ती हिरोजी फर्जंद व सोनाजी नाईक बंकी यांचे नावची होती. पत्रात मजकूर असा होता की ‘संभाजीराजांचा बंदोबस्त पक्का करून सर्वांनी त्यांजबद्दल सावधगिरी ठेवावी.’ परंतु

शिवाजीराजांच्या मृत्युची बातमी दीर्घकाल गुप्त राहणे शक्य नव्हते. संभाजीराजांस ती ताबडतोब कळली. सोनाजी नाइकाने त्यांचा बंदोबस्त कडक केला म्हणून त्यास संभाजीराजांनी ठार मारले. हिरोजी फर्जंद घाईघाईने पळून चिपळुणास गेला म्हणून यावेळी निभावला. विठ्ठल त्रिंबक महाडकर पन्हाळ्यावर किल्लेदार होता, त्यास संभाजीराजांनी कैद करून किल्ल्याचा बंदोबस्त आपल्या हातात घेतला. हा प्रकार वेळीच रायगडावर कळू शकला नाही. हंबीरराव मोहिते कऱ्हाडचे बाजूस होता, त्यास संभाजीराजांनी वश करून घेतले. राज्यांतील कोणीही अधिकारी असो, शिवाजीराजांचा प्रत्यक्ष पुत्र समोर येऊन हुकूम करू लागल्यावर त्यास तोंडावर विरोध करण्याची छाती कोणास होईल! रायगडावरील मंडळींनी आपल्याविरुद्ध कट चालविलेला पाहून संभाजीराजांस अत्यंत आवेश चढला. ठिकठिकाणच्या अंमलदारांस त्याने गोड वचनांनी आपल्या बाजूस वळवले. राजापूर, कुडाळ कडील कमावीसदारांस पत्रे पाठवून पैका घेऊन पन्हाळ्यावर बोलावले. कारवारच्या बंदरात धान्य होते ते त्याने आपणाकडे आणवले. (ता.15.4.1680) रावजी सोमनाथाने त्यांचे हुकूम मानले नाहीत म्हणून त्यास काढून टाकले. रायगडावर अशाप्रकारचा नेट कोणीच दाखवला नाही. हिरोजी फर्जंद व जनार्दनपंत हणमंते यांस पकडून संभाजीराजांनी कैदेत घातले. ता. 27 एप्रिलच्या पत्रात राजापुरचे इंग्रजांनी आपल्या वरिष्ठांस कळविले की, ‘संभाजीने सर्व राज्यसूत्रे आपल्या हाती घेतली आहेत. ठिकठिकाणच्या सुभेदारास व हवालदारास त्याने आपल्यापाशी बोलावले आहे. कित्येकास त्याने कैदखान्यात घालून कित्येकास बरतर्फ केले आहे.’ शिवाजीराजांच्या मृत्युनंतर वीस दिवसातला हा प्रकार आहे.

इकडे अनाजी दत्तो व मोरोपंत पिंगळे रायगडाचा बंदोबस्त करून पन्हाळ्यावर जाऊ लागले. वाटेतच त्यास संभाजीराजांच्या कृत्यांची हकिकत समजून त्यांची गाळण उडाली, पुढे चालून जाण्याची छाती झाली नाही. पण संभाजीराजांना त्यांच्या हालचाली इत्थंभूत कळल्या. लगेच हंबीररावास पाठवून संभाजीराजांनी त्या दोघांसही पकडून पन्हाळ्यावर आणले. रायगडावरील उपक्रमात अनाजी दत्तो पुढारी होता, त्याचे पायात जड बेड्या घातल्या आणि तो व मोरोपंत या दोघांसही पक्क्या बंदोबस्ताने अटकेत ठेवले.

मे महिन्यात संभाजीराजांनी पन्हाळ्यावर आपला सर्व जम बसविला आणि जूनच्या आरंभी वीस हजार फौज बरोबर घेऊन तो रायगडावर चालून गेला आणि ता.18 रोजी तेथे पोहोचला. रायगडावर प्रवेश होण्यास त्यास बिलकूल प्रयास पडले नाहीत. ता12 जुलैच्या पत्रात इंग्रज व्यापारी लिहितात, ‘‘संभाजीच्या नावाची द्वाही राज्यात फिरली आहे. लोक बोलतात की ‘राजा उद्योगी व चौकस आहे. राजारामास प्रेमाने वागवितो.’ अनाजी दत्तो मात्र सोयराबाईचा कैवारी म्हणून कैदेच्या यातना भोगीत आहे.’’

अल्पावकाशातच संभाजीराजांनी रायगडावरील बंदोबस्त करून नंतर सिंहासनारोहणाचा विचार चालविला. तेव्हा त्याचे मेहुणे महादाजी निंबाळकर, गणोजी

शिर्के व हरजी महाडिक जवळ होते, त्यांनी संभाजीराजांस कळविले, ‘‘साहेब सिंहासनारूढ होणार आणि प्रधानांचे घरी चौक्या हे विहित नाही.’’ मोरोपंतानेही विनंती केली की,‘रायगडावरील कटात माझे अंग नव्हते,’ त्यावरून त्यास बंधमुक्त करून पदापन्न केले. नावाचा कारभार सांगितला. नंतर नागपंचमीचे दिवशी म्हणजे ता. 20.7.1680 रोजी संभाजीराजांनी सिंहासनारोहण केले. यथाविधि राज्याभिषेक समारंभ पुढे सुमुहूर्तावर माघ शु.7 तारीख 16.1.1681 रोजी झाला. अशारीतीने पहिले गडबडलेले वातावरण लवकरच निवळले. हिरोजी फर्जंद व अनाजी दत्तो यांसही कैदेतून सोडून संभाजीराजांनी पूर्वीच्या नोकरीवर रुजू केले. मात्र मोरोपंत पिंगळे त्याच साली म्हणजे स.1680 च्या ऑक्टोबरात मृत्यु पावला. त्याचे जागी संभाजीराजांनी त्याचा पुत्र निळोपंत याची नेमणूक केली. पहिला क्रोध मावळून संभाजीराजांचा कारभार चालीस लागला.

3. शहाजादा अकबराचे दक्षिणेत आगमन, दुर्गादास (1.6.1681) :

अकबर हा औरंगजेबाचा चौथा मुलगा. ता.11.9.1657 रोजी जन्मला. अर्थात संभाजीराजे व अकबर यांच्या वयात चारच महिन्यांचे अंतर होते. दोघांच्याही आया लहानपणीच निवर्तल्यामुळे त्यांजवर बापांचे प्रेम विशेष जडले. जन्मानंतर एक महिन्याने अकबराची आई दिलरासबानू मरण पावल्यामुळे बापाचा तो प्यार बनला. कोणातरी अनुभवी सेनापतीच्या हाताखाली आपल्या पुत्रास स्वारीवर पाठवून लष्करी व मुलकी विषयात शिक्षण देण्याचा क्रम बादशहांनी ठेवला होता, त्यास अनुसरून अकबरही चांगला हुशार झाला. बापाच्या मर्जीप्रमाणे वागून व हरएक कामात फत्ते मिळवून त्याने बाहेरचा लौकिक व बापाचा विश्वास संपादन केला. सन 1679 मध्ये औरंगजेबाने राजपुतांवर युद्ध सुरु केले त्याची व्यवस्था पाहण्यास त्याने अकबराची नेमणूक केली. या युद्धाचे प्रयोजन लक्षात आणणे जरूर आहे.

महाराजा जसवंतसिंहावर औरंगजेबाचा रोष झाला होता. अफगाणिस्तानात कामगिरीवर असताना तो राजा ता. 10.12.1678 रोजी मरण पावला. त्याचा वडिलमुलगा जयसिंह अगोदरच युद्धात मेला असल्यामुळे त्यास आता मुलगा नव्हता. पण त्याचे भावाचा नातू इंद्रसिंह गादीचा वारस होता, त्यास राज्य न देता मारवाडचे राज्य खालसा करण्यासाठी औरंगजेबाने लगेच फौजा रवाना केल्या आणि मागाहून युद्धाची व्यवस्था पाहण्याकरता आपण स्वत: अजमेरास जाऊन राहिला. जशवंतसिंह मरण पावला तेव्हा त्याच्या दोन राण्या गरोदर होत्या. अल्पावकाशातच त्या प्रसूत होऊन त्यांस पुत्र झाले. पैकी

एक मुलगा लवकरच मरण पावला आणि दुसरा जगून मोठा झाला, त्याचे नाव अजितसिंह. या अजितसिंहास मारवाडची गादी मिळवून देण्याचा उद्योग दुर्गादासाने अंगावर घेतला.

जसवंतसिंहाचा दिवाण अजकर्ण म्हणून होता, त्याचा मुलगा दुर्गादास (जन्म 1638), यजमानाबरोबर स्वारीत होता. जसवंतसिंह मेल्यावर त्याचे कुटुंबास दुर्गादासाने सांभाळून दिल्लीस आणले. जसवंतसिंहाची राणी प्रसूत होऊन मुलगा झाल्याची खबर औरंगजेबास कळली, तेव्हा त्याने त्या मुलास हस्तगत करण्याचे आटोकाट प्रयत्न केले. परंतु ते सर्व दुर्गादासाने निष्फल करून अजितसिंहाचा बचाव करून त्यास मारवाडात आणले आणि गुप्त जागी त्यास सुरक्षित ठेवून औरंगजेबाच्या फौजांशी निकराने सामना चालू केला. औरंगजेबाचा पुत्र अकबर हा बापाचा अत्यंत आवडता असून त्याजकडेच युद्धाची मुख्य कामगिरी बादशहाने दिली. दोन वर्षे युद्ध मोठ्या निकराने चालले. त्यात आणखी पुष्कळ राजपूत राजे सामील होऊन बादशहावर उठले. उदेपूरचा राणाही सामील झाला. पुढे उघड युद्ध चालू झाले तेव्हा राजपुतांनी समोरासमोर लढाई न करता डोंगरी प्रदेशाच्या आश्रयाने वेळीअवेळी झापे घालून मोगल फौजांस इतके हैराण केले की 'येथे आपला निभाव लागणे कठीण आहे' अशी अकबराची खात्री झाली. राजपुतांनी समेटाचे बोलणे करण्याकरता त्याजकडे आपले वकील पाठवले. त्यांच्यामार्फत अकबराच्या व प्रमुख राजपुतांच्या वारंवार गाठी पडून बोलणी झाली. त्या बोलण्यात औरंगजेबाच्या दुष्ट व कपटी राजनीतिचा उघड खल झाला. राजपुतांनी अकबरास समजावले की, 'बादशाहीला यत्किंचितही इजा पोहचविण्याची आमची इच्छा नाही. उलट पूर्वापार प्रघाताप्रमाणे आम्हास बादशहांनी प्रेमाने वागवावे, आमच्या राज्याचा अपहार करू नये, म्हणजे आम्ही बादशहाची सेवा निष्ठेने करण्यास सिद्ध आहोत. अकबर बादशहा थोर होऊन गेले, त्यांनी घालून दिलेले रिवाज यथायोग्य पाळले जावे.' हे म्हणणे अकबरास पटले. पूर्वीचा इतिहास त्याला अवगत होता. मोगल बादशाही हिंदुस्थानात चिरस्थायी होण्यास अकबराची उदार राजनीति कारण झाली. राजपूत राजांस त्याने स्नेहभावाने वागवून आपल्या बादशाहीचे आधारस्तंभ बनवले. जयपूर-जोधपूरचे राजे त्याचे अंकित बनून दूरदूरच्या ठिकाणी जाऊन बादशहाची नोकरी बजावू लागले. शंभर वर्षे पावेतो राजपूत राजांनी दिल्लीपतीची सेवा इमाने इतबारे बजावली. औरंगजेबास सिंहासन प्राप्त करून देण्यास मारवाडचा राजा जसवंतसिंह व जयपूरचा जयसिंह हेच पुष्कळसे कारण झाले. पण हिंदू धर्माचा पाडाव करण्याची दुर्बुद्धी धारण करून औरंगजेबाने राजपूत राजांचा उच्छेद आरंभला. अकबराने राजपुतांची राज्ये ज्यांची त्यांच्याकडे कायम ठेवून शिवाय त्यांजला बाहेरची कामे दिली. औरंगजेबाने ही व्यवस्था बदलली. राजपुतांची राज्ये खालसा करून ते प्रदेश बादशाहीत सामील करावे आणि हिंदुस्थानात मुसलमानी धर्माची वृद्धी करावी असा जो अट्टहास त्याने चालवला, तो त्याच्या पुत्रास अत्यंत अयोग्य वाटून त्याने बापास पत्रे लिहून त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. त्याच्या फौजेचे अत्यंत हाल होत होते. लढण्याची उमेद कोणांतच राहिली

नव्हती. तेव्हा सलोख्याने युद्ध थांबवून फौजा परत बोलवाव्या असा सल्ला अकबराने बापास दिला, परंतु तो औरंगजेबास बिलकूल पटला नाही. उलट त्याने पुत्राची निर्भर्त्सना करून भ्याड व नामर्द अशा कठोर शब्दांनी त्याची खरडपट्टी काढली, ती त्या मानी अकबरास अत्यंत झोंबली, आणि त्याचे मन बिथरले. राजपूत वकिलांच्या निदर्शनास हा प्रकार येताच त्यांनी अकबरास भर दिली की, 'तुम्ही तरी त्या थोर अकबराचेच वंशज आहात. त्याचे नावही तुम्ही धारण करता, तर ही सोन्यासारखी संधी चालून आली आहे. आम्ही आपले साह्य मनापासून करण्यास सिद्ध आहोत. औरंगजेबाने नीतिचे मार्ग सोडून कारभार चालवला आहे. तो हाणून पाडण्यातच राज्याचा व लोकांचा तरणोपाय आहे. सबब त्यास काढून तुम्हीच बादशाहीपद धारण करा. शहाजहान वगैरेंनी पूर्वी असेच केले.'

या उपक्रमात मुख्य पुढाकार दुर्गादासचा होता. त्याने अकबराचे मन वळवून राजपुतांचे साह्य त्यास मिळवून दिले. ता.1.1.1681 रोजी औरंगजेबास पदच्युत केल्याचा जाहीरनामा काढून अकबराने सिंहासनारोहण केले आणि बापास कैद करण्याकरता प्रचंड फौजेनिशी अजमेरवर चाल केली. हा प्रकार पाहून औरंगजेबाची पाचावर धारण बसली आणि केवळ कपटविद्येच्या बळावर त्याने तो कठीण प्रसंग निभावून नेला. मध्ये फक्त एका रात्रीचा अवकाश होता, तेवढ्यात औरंगजेबाने मुलाच्या नावाचे एक पत्र लिहून ते त्याच्या राजपूत सहायकांच्या हाती पडेल अशी तजवीज केली. पत्रात मजकूर असा की, 'शाबास तुझी की इतक्या शिताफीने तू सर्व राजपुतांना माझ्या तावडीत आणून सोडलेस. तू माझा पुत्र चांगला शोभशील. उद्या रणांगणावरच तुझी माझी भेट.' हे पत्र हाती पडताच राजपुतांची गाळण उडून ते अकबराने आपणास सफ्शेल फसविले असे समजून, रातोरात त्यास सोडून चालते झाले. दुसऱ्या दिवशी ता.16 जानेवारीस सकाळी लढाईस तोंड लागले, तेव्हा फारच थोडे लोक समरांगणावर हजर. तथापि दुर्गादासाने अकबरास अंतर दिले नाही. औरंगजेबाचे तावडीतून सुटण्यासाठी त्यांनी पोबारा केला आणि दक्षिणेत शिवाजीराजपुत्र संभाजीराजा प्रबल आहे, त्याच्याशी राजपुतांचे संगनमत करून औरंगजेबाचा डाव हाणून पाडावा असा विचार करून ते नर्मदेवर आले. त्यांचे मागोमाग बादशहाची फौज चालून आली. ता. 9.5.1681 रोजी नर्मदा पार होऊन अकबराने खालील पत्र संभाजीस पाठविले.

'राज्य करू लागल्यापासून हिंदूंस बुडवावे, असा औरंगजेबाचा निश्चय झाला आहे. राजपुतांशी यद्ध करण्याचे कारण हेच. सर्व लोक ईश्वराची लेकरे असून राजा हा त्यांचा संरक्षक आहे; म्हणून लोकांचा उच्छेद करणे बादशहास योग्य नाही. औरंगजेबाची कृत्ये मर्यादेबाहेर गेली आणि माझी खात्री झाली की 'लोकांचा आपण अशा रीतीने नाश केला तर हा देश आपल्या हातचा जाईल. अशा स्थितीत तुमचे राज्य बादशहाचे मुक्कामापासून दूर आहे' असे पाहून, मी तुमचेकडे येण्याचा निश्चय केला. दुर्गादास राठोड मजबरोबर आहेत. मजबद्दल आपले मन नि:शंक असू द्या. परमेश्वरकृपे मला राज्य मिळाले तर मी फक्त 'नावाचा धनी' राहणार, राज्य सर्व तुमचे असे समजा. आपण दोघांनी मिळून

बादशहाचा पाडाव करू. सुज्ञांस विस्तारे काय लिहावे.' ता. 11 मे 1681 बादशहाच्या फौजा पाठीवर असल्यामुळे पत्रोत्तर येईपर्यंत वाट न पाहता शहाजादा तसाच खानदेश बागलाणातून महाराष्ट्रात आला. खानजहान नामक सरदार बादशहाचा सुभेदार होता, त्यास त्याची खबर कळताच तो औरंगाबादेहून पुढे त्यास अडविण्यास गेला असता बागलाणच्या फौजदाराने त्यास कळविले की, 'अकबर पश्चिमेच्या वाटेने नाशकाकडे गेला.' लगेच खानजहान नाशकास गेला, तो त्यास कळले की आदलेच दिवशी अकबर तेथून निघून त्रिंबकच्या घाटाने कोकणात गेला. मराठी राज्यात शिरताच संभाजीराजांचे अधिकारी येऊन त्यास भेटले. रायगडाचे उत्तरेस पंचवीस मैलांवर नागोठण्याजवळ अंबा नदीचे काठी पाली येथे शहाजाद्यास त्यांनी आणून किल्ल्याच्या पायथ्याशी एक 'केंबळीघर' मोकळे करून त्यास राहण्यास दिले. दिल्ली, आग्रा येथील प्रचंड व ऐश्वर्यसंपन्न इमारतीत राहण्याची ज्यास सवय, त्या शहाजाद्यास या भिकारड्या कोकणी झोपडीत वसती करताना काय वाटले असेल याची कल्पना केली पाहिजे. मातीच्या भिंतीना सफेत कपडा मढविण्यात आला आणि शेणाने सारविलेली जमीन सतरंज्या घालून झाकण्यात आली. बरोबर लवाजमा काही फार नव्हता. चारशे घोडेस्वार, थोडे पायदळ, पन्नास उंट ओझ्याचे, एवढ्यानिशी अकबर ता. 9.6.1681 रोजी म्हणजे पावसाळ्याचे तोंडासच येऊन संभाजीराजांचा पाहुणचार घेऊ लागला. या ठिकाणास पुढे पातशहापूर असे नाव पडले. संभाजीराजांनी आपले तीनशे पायदळ शिपाई शहाजाद्याच्या तैनातीस पाठवून दिले.

पालीहून रायगडावर शहाजादा व संभाजीराजे यांजमध्ये निरोप जाऊ-येऊ लागले. पंधरा दिवसांनी संभाजीराजांनी नेताजी पालकर व हिरोजी फर्जंद यांस अकबराचे भेटीस पाठविले. त्याजबरोबर मध्ये हिरा बसविलेला एक मोत्याचा कंठा, एक जडावाचा तुरा व एक हजार होन अशी नजर त्याने अकबरास पाठविली. खूषखबर विचारून हिरोजी लगेच परत गेला. नेताजी पालकर त्याचे जवळ विचारपूस करण्यास राहिला. नेताजी पूर्वी कैक वर्षे मुसलमान होऊन बादशहाचे तैनातीत राहिला असल्यामुळे भाषा रीतिरिवाज वगैरे संबंधाने शहाजाद्याजवळ वागण्यास तो विशेष लायक होता. संभाजीराजांचे मनातून स्वत: त्याचे भेटीस जावे असे फार होते. परंतु पाली येथे अकबराने असलेल्या परिस्थितीत बादशाही थाटाचे वर्तन ठेवले त्यावरून संभाजीराजांचे मनात संशय येऊ लागला. तो दरबार भरवी. बादशाही रिवाजाप्रमाणे फर्माने काढी आणि दिवाण वगैरे नेमून कारभार करी. लवकरच त्याने जवळ दोन हजार पावेतो स्वारांची फौज जमवली. अशा वागणुकीने अविश्वास उत्पन्न होऊन संभाजीराजांनी त्याला कळविले की, 'माझ्या राज्यात तुम्हास राहणे असेल तर फौज वगैरे वाढवू नका. नाही तर दुसरीकडे निघून जा.' यावरून प्रथम संभाजीराजांस शहाजाद्याचा पुष्कळच वहीम आला की, न जाणो औरंगजेबाचा हा पुत्र आपणास मुद्दाम गोत्यात आणण्यासाठी आला नसेल कशावरून! पण संभाजीराजांची ही संशयनिवृत्ती हलकेहलके झाली. रायगडावरील फितुरासंबंधात शहाजाद्याने

संभाजीराजांना सावध केले. संभाजीराजे त्यास खर्चासाठी दररोज साठ होन (=रु.300) तनखा देऊ लागले. तथापि रायगडावरील फितुरात संभाजीराजे दुश्चित्त झाल्यामुळे त्यांस शहाजाद्याची भेट लगेच घेता आली नाही. पाच महिने झाल्यावर कार्तिक शु. 11 रविवारी ता. 13.11.1681 रोजी पालीस जाऊन त्यांनी अकबराची भेट घेतली. 'समागमे सेना समुदाय हशम देखील होते. शहाजाद्याबरोबर दुर्गादास होता. बहुत सन्मान केला.'

संभाजीराजांनी शहाजाद्याची एकदम गाठ घेऊन पुढील उद्योग ताबडतोब सुरु केला नाही यामुळे औरंगजेबास तयारी करण्यास अवधी मिळून त्याचा पाडाव होण्याची एक मोठी संधी फुकट गेली. दुर्गादास व अकबर यांस राजपुतांचा मोठा पाठिंबा होता. मराठ्यांचा लैकिक हिंदुस्थानभर दणदणत होता. स्वत: अकबर शूर व दिलदार असून दुर्गादासासारखा कल्पक व योजक पुढारी हाताशी होता. दक्षिणेत होती-नव्हती तेवढी फौज जमा करून हे सर्व एकदम औरंगजेबावर गेले असते तर त्यास अपयश येण्याचे काही कारण नव्हते. अशा बाह्य पराक्रमाने जेवढी संभाजीराजांची छाप महाराष्ट्रावर बसली असती, तेवढी रायगडावर बसून विरोधकास शिक्षा केल्याने बसली नाही. बिचकलेली मने एकदम एखाद्या अलौकिक कार्यात गुंतविणे हेच त्यास शांत करण्याचे उत्कृष्ट साधन होय. पण संभाजीराजांना बापासारखा एवढा पोच नव्हता. अकबर व दुर्गादास त्यास भर देत असताना ते घरच्याच कारभारात गुंतुन पडले. तेणेकरून औरंगजेबास अवकाश मिळाला. अजमेरहून ता. 31.7.1681 रोजी औरंगजेबाने अजमशहास अकबराचे पाठीवर रवाना केले, तो सप्टेंबरात बऱ्हाणपुरास येऊन 11 नोव्हेंबरास औरंगाबादेस आला. स्वत: औरंगजेब 8 सप्टेंबरास अजमेरहून निघून 13 नोव्हेंबरास बऱ्हाणपुरास पोचला. त्याचेबरोबर तिघे पराक्रमी पुत्र, नातू व सर्व मोठे सेनाध्यक्ष व बादशाहीचे समग्र सामर्थ्य दक्षिणेत गोळा झाले. बऱ्हाणपुरास पुढची व्यवस्था लावून ता. 22.3.1682 रोजी बादशहा औरंगाबादेस येऊन राहिला.

हिरोजी फर्जंद शहाजाद्याची भेट घेऊन रायगडास परत गेला, तेव्हा त्याची खात्री झाली की संधी मोठी नामी आलेली आहे, 'परंतु तिचा उपयोग करण्याचे कसब संभाजीराजास नाही. व्यसनी व लहरी राजाचे हातून राष्ट्रसंरक्षण होणे शक्य नाही' अशी रायगडावरील पुष्कळ जाणत्या मंडळींची भावना झाली होती. हिरोजी परत रायगडावर गेल्यानंतर सोयराबाई अनाजीपंत वगैरे मंडळींशी त्याचा विचारविनिमय झाला असला पाहिजे. पहिल्या एक-दोन महिन्यात संभाजीराजे व अकबर दोघेही आपल्या कुचंबणेच्या स्थितीत असताना रायगडावर एक गुप्त कट उभारण्यात आला. त्याचा उद्देश संभाजीराजांस काढून राजारामास गादीवर बसवावे असा होता. हा कट कदाचित शहाजाद्याचे कानावर गेला असेल, कदाचित त्याची संमतीही घेण्यात आली असेल. परंतु त्यानेच त्याची बातमी संभाजीचे कानावर घालून त्यास सावध केले, असे उल्लेख आढळतात. सन 1681 च्या ऑगस्ट महिन्यात संभाजीराजांच्या अन्नात विषप्रयोग झाला. त्यास त्याची माहिती आगाऊ

लागून त्याने ते अन्न कुत्र्यास व नोकरास घातले. दोघेही अल्पावकाशात मृत्यु पावले. हे पाहून संभाजीराजांचा क्रोध इतका अनावर झाला की अखेर पावेतो त्याची चित्तवृत्ति साफ अशी कधीच निवळली नाही. त्याने लगेच प्रमुख मंडळींस पकडून बेड्या घातल्या. 'सचिव अनाजी दत्तो, त्याचा बंधू सोमाजी, हिरोजी फर्जंद, बाळाजी आवजी यांस परळीखाली कैद करून मारले. कर्नाटकात श्यामजी नाईक पुंडे यास कैद करविले. महादेव अनंत व आणखी तीन इसम यांस हत्तीचे पायी बांधून ठार मारले.'

या प्रकरणात संभाजीराजांचा मुख्य रोष सावत्र मातुश्री सोयराबाई हिचेवर झाला. तिनेच हा सर्व व्यूह बनवला अशी त्याची खात्री होऊन, 'शिवाजीराजांसही विषप्रयोग करून तू ठार मारिले' असा त्याने तिजवर आरोप केला आणि तिला मृत्यूची शिक्षा फर्मावली. कोणी लिहितात विष देऊन मारले, कोणी म्हणतात उपाशी ठेवून हाल करून मारले. भिंतीत विटांनी चिणून मारले असाही प्रवाद होता. सोयराबाईची माहेरची शिर्के मंडळी होती, त्यांजवरही संभाजीराजांची वक्रदृष्टी झाली. कित्येकास त्यांनी ठार मारले व त्यांचे उत्पन्न व त्यांची संपत्ती सरकारात घेतली. तेव्हा त्या घराण्यातले काही लोक जीव वाचवण्यासाठी मोगलांचे पक्षास जाऊन मिळाले, ते कैक वर्षे तिकडेच राहिले. हा एकंदर प्रकार स.1681 च्या ऑगस्ट पासून पुढे तीन महिनेपावेतो रायगडावर चालू होता. वरच्यांशिवाय आणखी एकवीस इसम संभाजीराजांच्या क्रोधसत्रात प्राणास मुकले असा आशय इंग्रजी लेखांचा आहे. या कारणांमुळेच संभाजीराजांनी शहाजाद्याची भेट लगोलग घेतली नसावी. अशा क्रूर वर्तनाने त्याचा तात्पुरता वचक लोकांवर बसला, पण त्यांची अंत:करणे त्यास वश झाली नाहीत. शिवाजीराजांनी कष्टाने पैदा केलेली माणसे नाहीशी केल्याने राज्याचे नुकसान झाले. नवीन माणसे संभाजीराजांना तयार करता आलीच नाहीत.

संभाजीराजांचा अविश्वास व शिक्षासत्र अगदी त्याच्या अखेरपर्यंत चालूच होते. त्याचे सर्व तपशील आपणास उपलब्ध आहेत असे नाही. त्यावेळच्या कागदांत त्याच्या क्रोधाला बळी पडलेल्या इसमांचे अनेक उल्लेख ठिकठिकाणी वाचण्यात येतात. 'कार्तिक शु.2 (ता. 29.10.1684) मानाजी मोरे, गंगाधरपंत, वासुदेवपंत व रावजी सोमनाथ यांस संभाजीराजांनी कैद केल्याचे' वृत्त जेधे शकावलीत आहे. शेवटी-शेवटी प्रल्हाद निराजीलाही त्यांनी कैदेत घातले होते. सर्वांची सुटका त्यांच्या मृत्युनंतरच झाली.

4. प्रधानांच्या नेमणुका, कविकलश उर्फ कबजी :

जुनी मंडळी बहुधा आपल्या विरुद्ध आहेत अशी संभाजीराजांची समजूत होऊन त्याने कविकलश उर्फ कलुशा यास हाताशी धरून निकटवर्ती केले. संभाजीराजांच्या एकंदर

कारभारात या कलुशाचे महत्त्व विशेष आहे. मात्र त्याचे खात्रीलायक पूर्ववृत्त उपलब्ध नाही. हा कनोजा ब्राह्मण प्रयाग जवळचा राहणारा काशी येथे भोसल्यांचा क्षेत्रोपाध्याय होता. सन 1666 मध्ये आग्ऱ्याहून परत येताना संभाजीराजांचा व त्याचा प्रथम परिचय घडला, तो उत्तरोत्तर दृढ झाला. कविकलश (कवीमध्ये कलश, श्रेष्ठ) असा किताब त्यास होता, तो कदाचित शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकप्रसंगी त्यास मिळाला असेल. यावरून तो हिंदी भाषेत कवने करीत असावा आणि तो संस्कृत भाषा पढलेला पंडित होता असे दिसते. प्रचारात त्यास कविजी, कबिजी, कबजी असे लोक संबोधीत. 'कविकलश' याचा अपभ्रंश कलुशा होऊन ते नाव बखरकारांच्या लेखात यास दिलेले आढळते. त्याच्या सल्ल्याने संभाजीराजे वागत गेले आणि अंती त्याचा परिणाम विपरीत झाला, यावरून कलुशा म्हणजे 'कळलाव्या', 'कलिपुरुष' अशी त्याजबद्दल मराठे मंडळींची भावना झाली. 'केशवभट कबजी नावाचा हिंदुस्थानी ब्राह्मण मांत्रिक होता, त्याने संभाजीराजांस वश केले, तो सांगेल तसे करावे,' असे बखरीत उल्लेख आहेत. बोलण्यात गोड, दुसऱ्यावर छाप बसविणारा व मांत्रिक विद्या जाणणारा असल्यामुळे स्वकीयांबद्दल शंकित झालेल्या संभाजीराजांनी त्याजला जवळ आणले. कदाचित क्षेत्रोपाध्यायांची भांग-गांजासारखी परंपरागत व्यसने कलुशास असावीत आणि त्या बाबतीत संभाजीराजांची व त्याची पूर्वीची ओळख असावी असेही अनुमान करण्यास हरकत नाही. अलिकडे कलुशाची सरकारी मुद्रा प्रसिद्ध झाली आहे, तिजवरून त्याला जवळ आणण्यात संभाजीराजांचा हेतू काय असावा याचा थोडाबहुत अंदाज बांधता येतो. ती मुद्रा अशी :-

विधिरर्थिमनीषाणामवधीर्नयवर्त्मनां[1]।
शेवधिः सर्वसिद्धीनां मुद्रा कलशहस्तगा॥

अर्थ :- 'अर्थी' म्हणजे सेवकजन यांच्या मनीषा सफल करणारी, न्यायमार्गाची मर्यादा, सर्वसिद्धींचा ठेवा अशी ही मुद्रा कलशहस्तात वागत आहे. कित्येक कागदात त्याच्या मायन्यात खालील उपपदे लावलेली आहेत. 'आज्ञापत्र धर्माभिमान, कर्मकांडपरायण, दैवतैकनिष्ठाग्राहिताभिमान, सत्यसंघ, समस्त राजकार्यधुरंधर, विश्वासनिधि रा.रा.कविकलश.' ही उपपदे बहुधा औपचारिक असतात, तरी त्यांवरून आपणास सर्व सिद्धी वश आहेत ही कलुशाची व त्याच्या मालकाची भावना व्यक्त होते.

संभाजीराजांनी कलुशासाठी 'छंदोगामात्य' म्हणजे 'वेदशास्त्रात ज्याची गति आहे असा अमात्य' हे नवीन प्रधानपद उत्पन्न केले. थोडासा संकुचित अर्थ घेतला तर अथर्ववेदांतर्गत मांत्रिकविद्या जाणणारा हा कलुशा असून त्या विद्येच्या बळावर इष्ट हेतूंची सिद्धि संपादन करण्याकरता संभाजीराजांनी त्यास जवळ केले असे अनुमान होते. तांत्रिक विद्येतील अनुष्ठानादि प्रयोग करून दु:साध्य गोष्टी साध्य होतात असा संभाजीराजांचा विश्वास दिसतो. शिवाजीमहाराजांनी अशा धार्मिक कृत्यांस राजकारणात कधी महत्त्व दिले

नाही. असा हा कलुशा उत्तरोत्तर संभाजीराजांचा 'मुख्य सल्लागारच' बनला. संभाजीराजांची स्वत:ची मुद्रा अशीच खोचदार आहे ती लक्षात घेतली म्हणजे या उभयतांच्या कारभाराचे धोरण लक्षात येते. संभाजीराजांची मुद्रा अशी आहे :-

श्री शंभो: शिवजातस्य मुद्राद्यौरिव राजते।
यदंकसेविनो लेखा वर्तते कस्य नोपरि॥

अर्थ :- शिवपुत्र शंभूची मुद्रा आकाशाप्रमाणे शोभत आहे. या शंभूचा अंकाश्रय करणाऱ्यांचा पगडा कोणावर बसणार नाही?

असे हे दोन सेव्य सेवक शिवाजीमहाराजांनी स्थापिलेल्या नूतन मराठी राज्याचे संरक्षक बनले. पूर्वीच्या अष्ट प्रधानास दूर करून संभाजीराजांनी सर्व कामे कलुशास सांगितली अशी विधाने मागाहून लिहिलेल्या बखरींतून आढळतात, ती शब्दश: खरी नाहीत. संभाजीराजांनी अष्टप्रधानांची पदे त्यांजकडून काढली नाहीत. कलुशाकरिता 'छंदोगामात्य' ही नूतन पदवी बनवली. निळो मोरेश्वर पिंगळे यास त्याने पेशवाईवर नेमले, तो कारभार त्याने शाहूच्या आगमनापर्यंत केला. 'रघुनाथ नारायण हणमंते कर्नाटकातून येऊन भेटले, त्यास मुज्मू दिली.' तो सन 1683 च्या मे महिन्यात मरण पावला, तेव्हा अमात्यपद त्याचा पुत्र नारोपंत यास मिळाले. सचिवपद अनाजी दत्तोच्या पश्चात रामचंद्र नीलकंठास देण्यात आले. पंडितरायाचे काम मात्र मोरेश्वर रघुनाथाने सोडल्यावर दुसऱ्या कोणास दिल्याचे आढळत नाही. बहुधा त्याजवर दुसरी नेमणूक झाली नाही याचे कारण त्याच स्वरूपाचे काम कलुशा करू लागला. न्यायाधिशीवर प्रल्हाद निराजी असून मंत्रिपदावर दत्ताजी त्रिमळ पुढे शाहूच्या आगमनापर्यंत कायम होता. सेनापतीचे काम हंबीरराव मोहिते करीत असून त्याचे पश्चात महादाजी गोमाजी पानसंबळाने ते पद चालविले. परंतु तोही अल्पावकाशात मरण पावला, तेव्हा त्या पदावर संताजी घोरपड्याची नेमणूक संभाजीराजांनी केली. मिळून कटात प्रत्यक्ष सामील झालेले इसम सोडले तर इतरांचे पूर्वीचे कारभार ज्याचे त्याजकडे त्याने कायम ठेवले. निळो मोरेश्वराची रवानगी चंदीस झाल्यावर पेशवाई काही काळ त्याचा भाऊ गंगाधर मोरेश्वर यास देण्यात आली. ता. 23.3.1685 च्या कागदात गंगाधराचा शिक्का पेशवे म्हणून आहे. चिटणिसी खंडो बल्लाळास देण्यात आली.

संभाजीराजांनी छळ करून लायक माणसे मारली याजबद्दल चीड येऊन अधिकाऱ्यांनी संप केला अशातला प्रकार मुळीच झाला नाही.

रघुनाथपंत हणमंते यास शिवाजीमहाराजांनी कर्नाटकचे कारभारावर नेमले होते. तिकडील प्रदेशाचा बंदोबस्त चांगला ठेवून त्यातून मोठी उपज त्याने काळजीपूर्वक पैदा केली. पुढे शिवाजीमहाराजांच्या मृत्युनंतर संभाजीराजांस बाजूस सारण्याचा प्रयत्न रायगडावर झाला, त्यात पंतांचे अंग असल्याचा संशय संभाजीराजांस आला असावा. कारण सन 1680 च्या पौष महिन्यात 'रघुनाथ नारायण चंदीत धरविले आणि हरजी राजे

महाडिक व श्यामजी नाइक पुंडे यासी कर्नाटकचा कारभार सांगितला,' असे एक कलम शकावलीत आहे. पुढे हणमंते रायगडास आला आणि संभाजीराजांनी त्यास अमात्यपद दिले, यावरून त्याजवरील रोषाची निवृत्ति झाली असावी.

रघुनाथ नारायण हणमंते मोठे मनोरथ रचून कर्नाटकातून संभाजीराजांचे भेटीस आला. मोगलांचा प्रतिकार करून मराठी राज्याची वृद्धि करावी अशी त्याची मोठी आकांक्षा होती. येताना त्याने आपल्याबरोबर पाच हजार स्वार, दहा हजार पायदळ व तीस-चाळीस लाख होन द्रव्य संभाजीराजांकरता आणले. संभाजीराजांस त्यामुळे मोठा आनंद झाला. त्याच्या इतमामास योग्य अशा थाटाने, बिरवाडीस नदीकाठी भव्य मंडपात दरबार भरवून संभाजीराजांनी त्याची भेट घेतली. पंताने संभाजीराजांस थाटाची मेजवानी करून त्याचा व इतर मंडळींचा बहुमान केला. संभाजीराजांनीही पंतांचा सत्कार केला. संभाजीराजांच्या दुर्वर्तनाबद्दल एकांती जाऊन त्यांना पंताने उपदेश केला असता, तर संभाजीराजांनी कदाचित तो झिडकारला असता. परंतु प्रसिद्धपणे दरबार भरवून पंताने अनुभवी मंडळी व जुने मुत्सद्दी एकत्र केले. तेणेकरून संभाजीराजे आपले काम योग्य बजावू लागले, तर आपण सर्व त्याच्या हाताखाली काम करण्यास तयार आहोत असे पंताने संभाजीराजांस भासविले. समोर बसलेल्या प्रतिष्ठित व पराक्रमी व्यक्तींचे पुढारीपण आपणाकडे आहे, त्या पुढारीपणात विलक्षण जोखीम व जबाबदारी भरलेली आहे, व ती जबाबदारी मोठ्या शहाणपणाने तडीस नेली पाहिजे, असे अप्रत्यक्ष रीतीने संभाजीराजांस भासवून, त्याने सन्मार्गास लागावे, अशी ही धूर्तपणाची पंतांची योजना होती. पंतांनी दरबारात मंडळी बसली असताना, 'पुढील विचार काय?' म्हणून संभाजीराजांस प्रश्न केला. 'राज्याची दिवसेंदिवस वृद्धी व्हावी ते कमीच होत चालले ह्याचे कारण काय? लोक बेदील; कित्येक ब्राह्मण वगैरे सरदार लोक अन्यायी होते, तरी त्यांस बेड्या घालून किल्ल्यावर नेऊन ठेवावे, ते शिरच्छेद करून कर्ते मारले, असो. पुढे सबळ शत्रू औरंगजेब येऊन भिडला याचा विचार काय केला आहे? महाराज कैलासवासी झाले तोच हा प्रकार! महाराज काही घेऊन गेले नाहीत.' हे ताठ्याचे बोलणे संभाजीराजांस मुळीच रुचले नाही. त्याने विशेष वाटाघाट न करता वेळ मारून नेली, आणि रघुनाथपंतांस अमात्यपद दिले. पण अल्पावधीत कलुशाचे प्राबल्य वाढून, 'आपली आता येथे राहण्यात शोभा नाही' असे मनात आणून रघुनाथपंत संभाजीराजांचा निरोप घेऊन परत निघाला. पण फार दूर गेला नाही तोच वाटेत वलण येथे मरण पावला. तत्पश्चात एक महिन्याने त्याचा भाऊ जनार्दनपंतही देवरूख येथे ता. 28.6.1683 रोजी मरण पावला. लगेच चंदीचे कारभारावर संभाजीने हरजी राजे महाडिक यास पाठविले आणि त्याचे मदतीस निळो मोरेश्वर पिंगळे व निळो बल्लाळ चिटणीस यास बरोबर दिले.

पूर्वीच्या कर्तबगार माणसांस संभाजीराजांनी कसे नाराज केले या संबंधाने रावजी सोमनाथ या मुत्सद्द्याचे उदाहरण लक्षात ठेवण्याजोगे आहे. बुद्धिमान व राजनिष्ठ माणसे

ही जी राज्याची मुख्य शक्ती ती हळूहळू संभाजीराजांचे वेळी घटत गेली. शिवाजीमहाराजांचे वेळी रावजी सोमनाथ पुष्कळ वर्षे राजापूर-सावंतवाडी भागात हुशारीने वागून मराठी राज्यासंबंधीचे हेतू सिद्धीस नेत होता. राजापुरावर सन 1661 मध्ये शिवाजीराजांनी स्वारी करून सात इंग्रज व्यापाऱ्यांस कैद केले. ते प्रकरण वर्ष दोन वर्षे चालून इंग्रजांस शिवाजीराजांचा मोठा राग आला होता, त्या कामात रावजी सोमनाथ पंडित हाच शिवाजीराजांचे हुकूम अंमलात आणीत होता. इंग्रज कैदी सोनगडचे किल्ल्यावर अटकेत ठेवलेले होते ते रावजीने राजापुरास आणून मुक्त केले. त्यावेळच्या इंग्रजांच्या पत्रव्यवहारात रावजी पंडिताचे नाव वारंवार येते. राजापूर प्रांताची व्यवस्था लावल्यावर शिवाजीराजांनी कुडाळ हस्तगत करून तेथे रावजीस ठेवून दिले. बाजी घोरपडे व खवासखान यांच्या स्वाऱ्यांचे प्रकरणात रावजी सोमनाथ होता. शिवाजीराजांच्या राज्याभिषेकसमयी हा रायगडावर असून इंग्रजांनी शिवाजीमहाराजांच्या अधिकाऱ्यांस पोषाख दिले त्यात रावजी सोमनाथास रु. 70 चा पोषाख दिल्याचा उल्लेख आहे. शिवाजीमहाराजांच्या मृत्युचे वर्तमान संभाजीराजांना पन्हाळ्यावर समजताच त्यांनी रावजी पंडितास हुकूम पाठवून दक्षिण कोकणातील ठिकठिकाणचा वसूल आपल्याकडे मागविला, त्यावरून संभाजीराजांचे कारकीर्दितही तो दक्षिण कोकणचे कारभारावरच कायम होता असे स्पष्ट होते. शके 1606 ‘कार्तिक मासी रावजी सोमनाथ, मानाजी मोरे, गंगाधरपंत व वासुदेवपंत यांस कैद केले,’ यावरून संभाजीराजांचा रावजी सोमनाथावर रोष झाला हे सिद्ध आहे. त्यास ‘दस्त करून घर नागविले, अटकेत ठेवले. पुन: त्यावरी कृपाळु होऊन कार्यभाग सांगितला. पुढे संभाजी महाराजांवर संगमेश्वरास धामधूम झाली त्या उपरी राउजी पंतास वैकुंठवास जाला, राज्यातील कदीम सेवक बहुत दिवस कष्ट-मेहनत केली!’

संभाजीराजांनी कलुशाचे नादास लागून राज्य बुडविले असा जो सामान्य समज आहे त्यात थोडेसे तथ्य दिसते. राज्याच्या मुख्य घडामोडी संभाजीराजांनी आपल्या अष्टप्रधानांच्या विद्यमानेच सिद्धीस नेल्या. कित्येक नाजूक बाबतीत मात्र तो कलुशाचे सल्ल्याने वागे. सभोवारचे वातावरण संशयी झाल्यामुळे कोणातरी परस्थ इसमावर विश्वास टाकल्याशिवाय संभाजीराजांचे भागण्याजोगे नव्हते. हा एक औरंगजेबाचा हेर कपटबुद्धीने येऊन संभाजीराजांजवळ राहिला असा समज होता तोही खरा दिसत नाही. कदाचित अखेरच्या दिवसात औरंगजेबाने कलुशास फितूर करून संभाजीराजांस हस्तगत करण्याचा एखादा प्रयत्न केला असेल. पण कलुशा अखेरपर्यंत मालकाशी एकनिष्ठ राहिला आणि त्यांजबरोबरच त्याने दारुण शिक्षा भोगली, यातच त्याची प्रामाणिक सेवा व्यक्त होते. संकटकाळी त्याजकडून निभाव लागला नाही यामुळे त्यास जास्तच वैगुण्य आले.

येणेप्रमाणे छत्रपतींच्या आसनावर संभाजीराजांचे अधिष्ठान कायम झाले आणि कारभाऱ्यांनी योजलेली क्रांती विफल ठरली. येथून पुढे संभाजीराजांचा कारभार सुरु होऊन त्याने जे युद्धप्रसंग हाती घेतले त्यांचे वर्णन पुढील प्रकरणी करू.

प्रकरण 2
रणांगणावर

1682-1685

1.सिद्दिशी युद्ध; 2.संभाजीराजांपुढे बहादुरखानाची धावपळ; 3. पोर्तुगिझांशी झगडा, पूर्वप्रकोप; 4.पोर्तुगिजांना अद्दल; 5.वाडीकर सावंताचा संभाजीराजांस विरोध; 6.संभाजीराजांचा बादशहाशी पहिला सामना; 7.महाराष्ट्राच्या पिशाच्चभूमीत बादशहाची विवंचना; 8.बादशहाशी दुसरा निकराचा सामना.

जंजिऱ्याचा सिद्दी, गोव्याचे पोर्तुगीज व मोगल बादशहा या तिघांशीच मुख्यत: संभाजीने युद्धप्रसंग केले. त्यापैकी सिद्दिचे अधिष्ठान रायगड राजधानीस लागून होते. 'घरात जैसा उंदीर, तैसा महाराजांचे राज्यास सिद्दी' असे त्याचे वर्णन सभासदाने केले आहे. त्याच्याशी संभाजीचे व्यवहार कसे घडले ते प्रथम सांगू.

1. सिद्दिशी युद्ध (सन 1682) :

जंजिऱ्याचा सिद्दी हा बादशहाचा ताबेदार असून त्यास मुंबईकर इंग्रजांचा आश्रय असे. या आश्रयाच्या जोरावर तो रायगडास शह देऊ शके. त्याच्याशी व प्रत्यक्ष औरंगजेबाशी आणि गोवेकर पोर्तुगिझांशी संभाजीने कैक वर्षे निकराने सामना केला. त्यात शौर्य, धाडस, कंटकपणा इत्यादि संभाजीचे गुण चांगले व्यक्त झाले. त्याच्या युद्धांची व अनेक ठिकाणच्या मोहिमांची ऑर्म, मनूची वगैरे लेखकांनी भरपूर हकिकत लिहून ठेवली आहे तिजवरून शत्रूंस संभाजीची दहशत केवढी बसली होती हे दिसून येते. 'मद्य, वेश्या, मृगया इत्यादिकांच्या नादात पन्हाळा व विशाळगड यांच्या आसपास विलासमग्न राहून संभाजीने राज्याची पर्वा केली नाही,' असे जो बखरकारांचा सामान्य ग्रह नमूद आहे, त्याचा वस्तुस्थितीशी मेळ बसत नाही. त्याने नानाविध शत्रूंशी नेटाने सामना करून आसमंतात आपला दरारा बसविला. कोकणातले राजकारण त्याने चांगले ओळखले. मात्र बाह्य जगात चौफेर विस्तृत नजर टाकण्याची ऐपत त्याच्या बुद्धीत नव्हती. त्याचे सर्व पराक्रम कोकणातले असून, कोकणातच त्यास शेवटी मृत्यु आला.

दक्षिणेत येताच बादशहाने मनात प्रचंड मनोरथ बांधले. काबूलपासून कन्याकुमारीपावेतो एकछत्री सत्ता स्थापण्याचा पूर्वजांचा उद्देश सिद्धीस नेण्याची मोठी हाव त्याने धारण केली. एवढ्या प्रचंड बादशाहीची लष्करी व आर्थिक शक्ती आणि आपली असाधारण बुद्धिमत्ता यांच्या बळावर मराठ्यांचे राज्य साफ बुडवून साम्राज्याची कायमी करू अशी धमक त्यास वाटत होती. मागे राजपुतान्यावर नजर ठेवण्यास त्याने आपला वजीर आसदखान व नातू अजीमुश्शान यांस दक्षिणेच्या वाटेवर बंदोबस्तास ठेवले. संभाजी व अकबर यांच्या संचाराच्या वाटांवर नाक्यानाक्याने त्याने आपले हुशार सेनानायक नेमून दिले आणि त्यांच्या हालचालींची भरपूर माहिती रोजचे रोज मिळावी म्हणून भला मोठा हेरांचा तांडा सर्वत्र पेरून दिला. त्याची नजर चहूकडे सारखी खेळत होती. बंडखोर मुलाचा बंदोबस्त, मराठेशाहीचा विध्वंस, आदिलशाही व कुतुबशाही यांची समाप्ती असे नानाविध उद्देश त्याच्या मनात घोळत असून या समयी याची एकंदर तयारी एवढी दांडगी होती की, जणू काय हा आता 'समग्र पृथ्वीच पादाक्रांत करणार' अशीच सर्वत्र समजूत झाली. सुरत व मुंबईचे इंग्रज व गोव्याचे पोर्तुगीज यांजवरही शह बसविण्याचा बादशहाचा उद्देश होता. यासाठी त्याने प्रथम जंजिऱ्याचे सिद्दिस हाताशी धरले आणि त्याचे आरमार वाढवून त्याजकडून संभाजीवर चढाई करवली.

बादशहाचा एवढा मोठा आधार मिळताच तीनही आरमारी सत्ता संभाजीराजांस खाऊन टाकण्यास सिद्ध झाल्या. आपसात त्यांच्या वाटाघाटी सुरु झाल्या. त्यांपैकी इंग्रज मात्र सावध राहून मराठ्यांशी उघड वैर करण्याच्या भरीस पडले नाहीत. संभाजीराजांचा तिघांशीही निकट शेजार पडल्यामुळे त्यांची गय करणे शक्य नव्हते. अशा अडचणीत 'एकाशी मिटते घेऊन दुसऱ्यावर चढाई करावी' हा सामान्य रिवाज संभाजीराजांना उमगला नाही किंवा साधला नाही. सर्वांशी एकदम झगडा त्याने चालू केला. बादशहाच्या उठावणीचाच हा परिणाम होता. सिद्दिचे आश्रयस्थान जंजिरा, मुंबई व सुरत अशा तीन ठिकाणी होते. प्रसंगानुसार तो खाली गोव्यापावेतोही संचार करीत असे. सुरत येथे मोगल सुभेदार होता, त्यास बादशहाने हुकूम पाठवला की, सर्व हिंदूंपासून जिझिया कर सक्तीने वसूल करावा आणि इंग्रज वगैरे व्यापाऱ्यांकडून जकात घ्यावयाची ती जास्त घ्यावी. एवढा पाठिंबा बादशहाकडून मिळताच सिद्दिने संभाजीराजांच्या प्रदेशात दांडगाई सुरु केली. उघड्या दिवसात समुद्रात फिरत राहून तो बरसातीत मात्र इंग्रजांचे माजगाव बंदरात राही व तेथून कुर्ला व कल्याण प्रांतात चोरट्या स्वाऱ्या करून शिवाजीमहाराजांचे मुलुखास उपद्रव देई. मराठी मुलखातील लोकांस पकडून त्याने मुंबईस गुलाम म्हणून विकले. याबद्दल संभाजीराजांनी आपल्या वकिलास लिहून इंग्रजांकडे तक्रार केल्यावर इंग्रजांनी सिद्दिस धमकावणी देऊन पुन्हा मराठी मुलखास उपद्रव देणार नाही अशी त्यांजकडून लेखी कबुली घेतली. सन 1680 च्या ऑगस्ट महिन्यात दोनशे मराठे लोक खांदेरीस जात असताना त्यातल्या ऐंशी असामींची डोकी कापून घेऊन सिद्दी कासम मुंबईस गेला. त्याजबद्दल

संभाजीराजांनी लगेच आवजी पंडिताकडून इंग्रजांस जाब विचारला. तेव्हा या प्रकरणाची सर्व हकिकत आवजीने संभाजीराजांस भेटून कळवली. सन 1681 च्या उन्हाळ्यात सिद्दी कासम व संभाजीराजांचा नौकाधीश दौलतखान यांच्या कित्येक चकमकी होऊन पावसाळा सुरु होताच सिद्दी कासम सुरतेस गेला.

इतके होत आहे तो औरंगजेबाने मराठ्यांस जिंकण्याची कडेकोट तयारी केली; आणि त्याने सिद्दिला मदत पाठवून आरमारानिशी संभाजीराजांवर चालून जाण्याचा त्यास निकडीचा हुकूम केला. हे ऐकून संभाजीराजांनी आपली तयारी जोराने केली. त्याने सर्व आरमार लढाईस सज्ज केले. त्यात लहानमोठी दीडशे गलबते असून त्यावर पाच हजार कसलेले निवडक खलाशी होते. त्याचा मुख्य नाविक दौलतखान असून त्याचे हाताखाली मायनाक भंडाऱ्याचा पुत्र होता. शिवाय सिद्दी संबलचा मुलगा व पुतण्या सिद्दी मिस्त्री असे दोन दर्यावर्दी योद्धे सिद्दिचा पक्ष सोडून संभाजीराजांकडे आले, तेही दौलतखानाचे हाताखाली कसून काम करू लागले. इतक्यात शहाजादा अकबर संभाजीराजांकडे आला. त्यामुळे झगड्याचे स्वरूप जास्तच तीव्र झाले. सन 1681 च्या डिसेंबरात पनवेलपासून चौलपर्यंतच्या किनाऱ्यावरील मराठ्यांचा मुलुख सिद्दिने उद्ध्वस्त केला. लगेच संभाजीराजांनी शहाजाद्यास बरोबर घेऊन वीस हजार फौजेनिशी खुष्कीने जंजिऱ्यावर चाल केली. महाडचा देशपांडे ‘दादजी रघुनाथ प्रभू’ पूर्वी बेलवंडीच्या युद्धात प्रसिद्धीस आलेला संभाजीराजांचे पदरी असून त्यास पश्चिम किनाऱ्याची चांगली माहितगारी होती. संभाजीराजांनी त्यास वचन दिले की ‘तुम्ही सिद्दिचा पाडाव करून द्या म्हणजे तुम्हास अष्टप्रधानात एक पद देऊ.’ दादजीने आरमारासह जाऊन जंजिऱ्यास वेढा घातला. शिवाय संभाजीराजांनी खंडोजी फर्जंद नावाच्या आपल्या मर्जीतील एका इसमास जंजिऱ्यास पाठवले. संभाजीराजांशी आपले वैर आहे, असा बहाणा करून खंडोजीने सिद्दिची नोकरी पत्करली. परंतु खंडोजीचा कावा एका दासीच्या मार्फत सिद्दिस कळला. त्याबरोबर सिद्दिने खंडोजी व त्याचे दुसरे साथीदार यांस पकडून ठार मारले. त्यावेळी खुष्कीने व पाण्यातून मराठ्यांनी जंजिऱ्यावर संग्राम चालवून सन 1682 च्या आरंभी त्याचा पुष्कळ नाश केला. परंतु प्रत्यक्ष जंजिऱ्यावर मराठ्यांचा इलाज चालला नाही. सिद्दी कासमने त्या स्थळाचा बचाव फारच चतुराईने चालविला. तेव्हा जंजिऱ्याची खाडीच सर्व भरून काढून पायवाट सिद्ध करून त्या जलदुर्गावर चाल करण्याची शक्कल संभाजीराजांनी स्वीकारली. पण बादशहाच्या फौजा चालून आल्यामुळे संभाजीराजांनी जंजिऱ्याचे काम दादजी वगैरे मंडळींवर सोपवून आपण मोगलांवर चाल केली. दादजीने मात्र शिकस्तीने लढाई सुरु ठेवली. पुढे पाऊसकाळ आला आणि तुफानाच्या लाटांमुळे मराठ्यांचा इलाज न चालून त्यांना वेढा उठवावा लागला. त्यांचे दोनशे लोक सिद्दिच्या हातात पडले. पावसाळा कमी झाल्यावर पुन्हा संभाजीराजांनी माजगाव येथे सिद्दिच्या आरमारावर हल्ला केला. त्यातही संभाजीराजांचा पराभव झाला आणि त्याचा मुख्य नाविक सिद्दी मिस्त्री शत्रूचे हाती

सापडला. मराठ्यांचा निरुपाय होऊन त्यांनी आपली कित्येक जहाजे शत्रूचे हाती न लागावी म्हणून पाण्यात बुडवली. या प्रकरणात संभाजीराजांना कळून आले की, सिद्दिला मुख्य मदत गोव्याचे पोर्तुगीझ करतात. ती बंद पाडल्याशिवाय सिद्दिचा पाडाव होणार नाही. तेव्हा प्रथम त्याने पोर्तुगिझांकडे लक्ष दिले आणि सिद्दिवरील चढाई तूर्त बंद केली.

इंग्रजांनी मात्र संभाजीराजांस चिडविण्याचे धोरण स्वीकारले नाही. एक तर इंग्रजांस वरिष्ठांचा सक्त हुकूम होता की कोणाशी वैर उत्पन्न करू नये आणि संभाजीराजांनीही त्यांची कुरापत काढून पुष्कळ शत्रूंशी एकदम झगडण्याचा प्रसंग आणला नाही. उलट इंग्रजांशी आपला स्नेहभाव दृढ करण्याचे हेतूने त्यांनी आपला वकील त्यांजकडे मुंबईस पाठवला. संभाजीराजांनी इंग्रजांस असे कळवले की, 'मुंबई, वसई, दमण वगैरे ठिकाणे काबीज करण्याचा बादशहाने निश्चय केला आहे; तो तडीस गेला, तर आमच्या मुलुखात बहुत उपद्रव होईल; तेव्हा आपापल्या बचावापुरता आपला आमचा स्नेहसंबंध असणे इष्ट आहे. तुम्ही सिद्दी यास अगर मोगलांच्या आरमारास मुंबई बंदरात येऊ देऊ नये. याकामी आमचे आरमार तुम्हास मदत करील, आणि या गोष्टी तुम्हास कबूल असतील तर कबुली दर्शविण्यास आमच्या वकिलाबरोबर तुमचा एक वकील इकडेस पाठवा.'

याच वेळेस कर्नाटकात जिंजीनजीक शिवाजीमहाराजांनी जिंकलेल्या प्रदेशात मद्रासच्या इंग्रजांस कित्येक वखारी घालायच्या होत्या. त्याबद्दलची परवानगी संभाजीराजांकडून मिळवण्याविषयी मद्रासकरांनी मुंबईकरांस लिहिले होते. तेव्हा ही दोन्ही कामे साधून घेण्याकरता तारीख 20 डिसेंबर 1682 रोजी इंग्रजांचा वकील संभाजीराजांच्या वकिलाबरोबर रायगडास गेला. वाटेत ह्या वकिलांच्या गलबतावर मोगल जहाजांनी हल्ला करून त्यांस लुटले. पुढे वकील येऊन संभाजीराजांस भेटला. जिंजी प्रांतातील इंग्रजांची मागणी संभाजीराजांनी कबूल केली, पण बादशहाचा रोष होईल म्हणून त्यांनी संभाजीराजांशी कायम तह केला नाही. तहाचे कागद तयार होत असतानाच इंग्रज वकील एकदम निघून मुंबईस गेला.

यावेळी इंग्रजांच्या व्यवस्थेत मोठी बंडाळी उत्पन्न झाली, ती संभाजीराजांच्या पथ्यावर पडली. नाही तर सिद्दी, इंग्रज व पोर्तुगीझ यांचे त्रिकूट जमून ते संभाजीराजांना भारी झाले असते. सन 1683-84 मध्ये रिचर्ड केग्विन नावाचा एक इंग्रज गृहस्थ हिंदुस्थानात येऊन कंपनी विरुद्ध बंडावा करू लागला. 'मुंबई बेट इंग्लंडच्या राजाचे असून ते कंपनीच्या कबजात गेले' हा प्रकार पुष्कळांना आवडला नाही. केग्विनने इकडे येऊन दि. 27.12.1683 रोजी प्रेसिडेंटास कैद करून मुंबईचा ताबा घेतला आणि सिद्दी व मोगल यांचे आरमार बिनहरकत मुंबईस येऊन उतरे त्यास केग्विनने हाकलून दिले. ही गोष्ट संभाजीराजांच्या आयती हिताचीच झाली. केग्विनने संभाजीराजांशी स्नेह संपादण्याकरता सन 1684 च्या एप्रिलमध्ये आपले दोन वकील, कॅप्टन गेरी व ले. विल्किन्स यांना संभाजीराजांकडे पाठविले. राम शेणवी म्हणून एक दुभाष्या त्यांजबरोबर होता. या

वकिलातीचा सुपरिणाम होऊन संभाजीराजे व इंग्रज यांमध्ये दोन करार ठरले ते उभयतांसही चांगले फायदेशीर झाले. पुढे पन्नास वर्षेपावेतो इंग्रज लोक मराठ्यांचे वाटेस गेले नाहीत. रामचंद्रपंत अमात्य लिहितो, ''श्यामलाचे जागिरीचा देश जंजिरा आदिकरून दळवटून फन्ना केला. ताम्रांचा त्याचा विरोध घालून तिकडून उपराळा होणार तो राहविला.

2. संभाजीराजांपुढे बहादूरखानाची धावपळ (स.1681) -

शिवाजीच्या मृत्युसमयी मोगलांशी त्याचे युद्ध चालूच होते. औरंगजेबाच्या फौजा राजपुतान्यावर चालून गेल्या होत्या, त्या समयी त्याचा वडिलपुत्र शहाआलम दक्षिणेत होता, त्यास बादशहाने राजपुतान्यात बोलावले आणि त्याचे जागी खानजहान ऊर्फ बहादूरखान यास पुन्हा दक्षिणेत पाठविले. चांदवडजवळचा अहिवंत किल्ला शिवाजीराजांनी हस्तगत केला होता, त्यास बहादुरखानाने येताक्षणी वेढा घातला (जुलै 1680). पण पावसाळ्यामुळे वेढा उठवून तो जवळच छावणी करून राहिला. दसरा होताच संभाजीराजांनी मोगलांवर आपली फौज रवाना केली आणि सुरत, बऱ्हाणपूर वगैरे स्थळे लुटण्याची आवई घातली. त्याबरोबर बहादुरखान बागलाण सोडून परत गेला. इतक्यात त्यास बादशहाचा हुकूम आला की शहाजादा अकबर बंड करून निघाला आहे त्यास पकडून घ्यावे. औरंगजेब पदच्युत झाल्याची बातमी येऊन मुलखात खळबळ उडाली आणि मराठ्यांना जोर चढला. हंबीरराव मोहित्याने धरणगाव लुटून बऱ्हाणपुरास चाल केली, त्यावेळी मोगल फौजा बाहेर होत्या. बऱ्हाणपुरचा फौजदार गर्भगळीत झाला. तीन दिवस पावेतो हंबीररावाने बऱ्हाणपुरास मजबूत तट असल्यामुळे शहरावर त्यांचा इलाज चालला नाही. बहादूरखानास बातमी पोचताच तो फर्दापुरचे घाटाने धावत बऱ्हाणपुरचे बचावास आला. प्रवासात त्याच्या फौजेचे अत्यंत हाल झाले. खान आपल्यावर येतो असे कळताच हंबीरराव सर्व लूट सांभाळून चोपडे, एरंडोलवरून साल्हेरच्या आश्रयास गेला. खानजहानकडून त्याचा प्रतिकार झाला नाही, याबद्दल बादशहाने त्यास भारी ठपका दिला.

पुढे बहादूरखान मराठ्यांवर नजर ठेवण्याकरता औरंगाबादकडे परत येऊन बाभूळगावाजवळ मुक्काम करून असताना त्यास बातमी कळली की, 'संभाजीराजांची दुसरी मोठी फौज अहमदनगर पैठण मार्गाने चालून येत आहे.' त्याबरोबर खान औरंगाबादचे बचावास धावून गेला. तेथील सर्व धनिक भीतीने गांगरून गेले. अनुपसिंग राठोड म्हणून मोगलांचा अधिकारी शहरात होता, त्याने तटाचे आत राहून बंदोबस्त ठेवला आणि शहरवासी लोकही घरे बंद करून बचावाच्या तयारीत राहिले. इतक्यात बहादूरखान येऊन दाखल झाला (फेब्रुवारी 1681), तेव्हा सर्वांस धीर आला. औरंगजेबास बातमी

कळली तेव्हा त्याने एक नवीन मजबूत तट त्या शहरास बांधविला, तो पुरा होण्यास दोन वर्षे लागली.

यावेळी संभाजीराजांचे लोक लहान-लहान टोळ्यांनी चहूकडे फिरून मोगल प्रदेश उद्ध्वस्त करू लागले. जुलै 1681 मध्ये नेताजी पालकर बागलाणात शिरला आणि दसरा झाल्यावर बाहेर उच्छेद करू लागला. बहादूरखानाने त्याजवर आपले लोक रवाना केले. संभाजीराजांची बायको व मुलगी दिलेरखानाने पकडून अहमदनगरचे किल्ल्यात ठेवली होती, त्यांस सोडवून आणण्याचा प्रयत्न यावेळी (ऑक्टोबर 1681) संभाजीराजांनी केला. नंतर मराठी फौजा सोलापुरावर चालून गेल्या. त्यांचे पाठोपाठ बहादूरखानाने जाऊन सोलापूरचा बचाव केला. संभाजीराजांची दुसरी फौज साल्हेर-मुल्हेरकडे चालून गेली, तिचा पाठलाग शियाबुद्दिनखानाने केला. अशा रीतीने दीड वर्षेपावेतो संभाजीराजे व मोगल यांचा धावपळीचा झगडा चालू असताना खुद्द बादशहा दक्षिणेत आला आणि त्याने पुढील युद्ध स्वत:च्या देखरेखीने चालू केले.

3. संभाजीराजांचा पोर्तुगिझांशी झगडा, पूर्वप्रकोप :-

प्रथमपासूनच संभाजीराजांचे लक्ष पश्चिम किनारा कबजात ठेवण्याकडे विशेष असून त्याचे कित्येक तीव्र झगडे सिद्दी व पोर्तुगीझ यांच्याशीच घडून आले. अगदी थोडक्यात चुकले, नाही तर प्रत्यक्ष गोवे सुद्धा त्यांच्या हाती पडून पोर्तुगिझांचा समूळ उठावा तेथून होण्याचा योग आला होता. या झगड्यापूर्वी संभाजीराजे व पोर्तुगीज यांचे वाकडे येण्यास काय कारणे झाली ते प्रथम सांगितले पाहिजे.

शिवाजीराजांनी मराठ्यांची सत्ता स्थापन करून पश्चिम किनाऱ्याचा बंदोबस्त केला, येणेकरून पोर्तुगीज, सिद्दी व इंग्रज या पाश्चात्त्य सत्तांचा स्वैर संचार पुष्कळसा संपुष्टात आला, त्यामुळे यत्किंचित संधी मिळाली की ते मराठ्यांना त्रास देण्यात कमतरता ठेवीत नसत. रायगडावरील मराठ्यांची राजधानी म्हणजे जंजिऱ्याच्या सिद्दिवर मोठे दडपण उत्पन्न झाले. हा सिद्दी पुढे मोगल बादशहाचा दर्यावर्दी हस्तक बनला. धर्माच्या व व्यापाराच्या बाबतीत मराठ्यांचा उच्छेद करणे हे सिद्दी व पोर्तुगीझ या दोघांचेही नेहमीचेच उद्दिष्ट होते आणि या बाबतीत ते सदैव एकमेकांचे चांगले साह्य करीत. सन 1681 मध्ये शहजादा अकबर बापावर उठून कोकणात संभाजीराजांचे आश्रयास आला, तेणेकरून सर्वांसच बिकट परिस्थिति उत्पन्न झाली. अकबरास थारा देऊ नये, त्यास पकडून बादशहाचे हवाली करावा, त्याजवर फौजा चालून जातील, त्यांस आपल्या हद्दीतून जाऊ द्यावे, त्यास धान्य दारूगोळा वगैरे साहित्य पुरवावे आणि समुद्रखाड्यांच्या जलमार्गांनी त्या फौजांना जरूर लागेल ती मदत करावी अशाप्रकारचे सख्त हुकूम बादशहाने सर्वांना

सोडले. जो कोणी या विरुद्ध आचरण करील त्यास शत्रू समजून भरपूर शासन केले जाईल, अशी बादशहाची दरडावणी कळताच किनाऱ्यावरील जलसत्तांना बिकट स्थिती प्राप्त झाली. अकबरास संभाजीराजांनी पाली येथे आश्रय दिला आणि मोगलांशी युद्ध सुरु केले, तेव्हा त्यानेही सिद्दी, पोर्तुगीझ व इंग्रज यांना अशी तंबी दिली की तुम्ही मोगलांचे साह्य करू नये, त्यास सामान पुरवू नये, तटस्थ राहवे. नाहीतर याद राखून राहा, आमच्याशी गाठ आहे, तुमचा पुरेपूर सूड घेण्यास आम्ही कमी करणार नाही. अशाप्रकारे या दोन प्रबळ सत्तांच्या भांडणात वरील तिघांची त्रेधा उडाली. त्यास 'इकडे आड व तिकडे विहीर' अशी स्थिती प्राप्त झाली. त्यामुळे प्रत्येकाने वेळेवर योग्य दिसेल तसे आचरण करून प्रसंग निभावण्याचा मार्ग स्वीकारला. त्यातल्या त्यात इंग्रज सर्वथा तटस्थ राहिले. सिद्दी तर बादशहाचा नोकरच होता. त्याला सुरत वगैरे ठिकाणांहून सामान आणून मोगलांस पुरवणे भाग पडले. त्यामुळे संभाजीराजांनी त्याच्या जंजिऱ्यावरच घाला घातला आणि पोर्तुगिझांनी दोघांकडेही संधान ठेवले, म्हणून त्यांचा उपद्रव बंद केल्यावाचून बादशहाशी युद्ध चालविणे संभाजीराजांस अशक्य झाले. तथापि उभयतांचे वैमनस्य सडकून येण्याची आणखी कित्येक कारणे घडत गेली ती अशी :

1. कारवारचे बंदर शिवाजीने हस्तगत केले होते. त्या बंदराचे तोंडाशी अंजदीव नावाचे एक लहानसे बेट भरसमुद्रात नाक्यावर आहे. सिंधुदुर्गाप्रमाणेच तेथेही आपला जलदुर्ग बांधून किनाऱ्याचा बंदोबस्त ठेवावा अशी शिवाजीराजांची योजना होती. पोर्तुगिझांचे गोव्यास शह देण्याचे हे ठिकाण सोयीचे जाणून संभाजीराजांनी तेथे आपला सुभेदार पाठवून तटबंदी सुरु केली. त्याबरोबर गोव्याहून पोर्तुगीझ गव्हर्नरने लढाऊ जहाजे पाठवून अंजदीव हस्तगत केले. (ता. 17.4.1682) आणि तेथे आपला तट बांधला. अर्थात संभाजीराजांना ही गोष्ट झोंबली.

2. संभाजीराजांशी वैर वाढवू नये अशीच प्रथम पोर्जुगिझांची तीव्र इच्छा होती. फ्रन्सिस्को टाव्होरा, अल्वोरचा काउंट हा सन 1681 पासून 1686 पावेतो गोव्याचा मुख्य गव्हर्नर असून संभाजीराजे कदाचित गोवा हस्तगत करून आपला उठावा करतील या भीतीने शक्य तितक्या उपायांनी गोव्याचा बचाव करण्याचा त्याचा निर्धार होता. ता. 28.7.1682 रोजी त्याने संभाजीराजांस पत्र पाठवून त्यास नुकताच पुत्र (शाहू) झाला होता त्यासंबंधाने त्याचे अभिनंदन केले. येसाजी गंभीरराव नावाचा संभाजीचा वकील गोव्यास राहत होता, त्याचेमार्फत संभाजीने दारूगोळ्याची मागणी त्या गव्हर्नराकडे केली. त्या संबंधात टाव्होरा त्यास लिहितो, 'येसाजी गंभीरराव यांनी आपले पत्र आम्हास दिले. बिचोली व कुडाळ येथे आम्हास दारूगोळा तयार करणे आहे, त्यासाठी सोरागंधक वगैरे लागेल तो आम्हास योग्य किमतीने पुरवावा, कारवार-मलबार कडून दारूसामान व धान्यसामुग्री घेऊन आमची गलबते वेंगुर्ला व बांदा येथे येतील त्यांस अटकाव करू नये,' वगैरे मजकूर लिहिला तो कळला. त्यास आपले मर्जीप्रमाणे आम्ही आमचे अधिकाऱ्यांस

ताकिदी दिल्या आहेत. आपले अधिकारी मात्र अशा प्रकारचा स्नेहभाव आमच्याशी ठेवत नाहीत. उत्तर कोकणात त्यांनी आमची मालाची जहाजे अडकवून ठेवली आहेत, हे बरोबर नाही. ती सर्व जहाजे सोडून द्यावीत आणि आमचे मुलखास कोणत्याही प्रकारे उपसर्ग करू नये असा सख्त हुकूम आपण आपल्या सर्व अधिकाऱ्यांस अगत्य जाहीर करावा. आमची इच्छा आपल्याशी स्नेह कायम ठेवण्याची असता, आपले अधिकारी आम्हास तोशीस करतील तर, हा स्नेहभाव नेहमी टिकणे शक्य नाही, असे थोडक्यात आपणास सुचविणे आम्हास जरूर वाटते.' पोर्तुगिझांचे एक व्यापारी जहाज सुरतेस जात असता वाटेत चौलजवळ मराठ्यांनी पकडले आणि त्यावरील सर्व माल 'कासे' बंदरात नेऊन अडकवून ठेवला. त्याबद्दल गव्हर्नराने संभाजीराजांकडे तक्रार केली त्यावरून उभयतांचे वितुष्ट वाढतच गेले.

3) पोर्तुगीझ लोक हिंदुस्थानास येण्यापूर्वी परदेशाचा सर्व व्यापार मलबार व आफ्रिका या किनाऱ्यांवर राहणाऱ्या अरब व्यापाऱ्यांचे हातात असून हे अरब लोक दर्यावर्दी कामातही निपुण होते. त्यांची सर्व किफायत पोर्तुगिझांनी पटकावल्यामुळे त्या उभयतांचे कायमचे वैर जडले. संभाजीराजांना जेव्हा हल्ली सिद्दिचा व पोर्तुगिझांचा उपद्रव होऊ लागला, तेव्हा त्यांनी त्या अरबांस हाताशी धरून त्यांजकडून आपल्या बंदरातल्या वखारी घालविल्या. संभाजीराजांच्या आश्रयाने अरबांनी पोर्तुगीझ व्यापाऱ्यांचे नुकसान आरंभले, या कारणास्तव ते संभाजीराजांवर संतप्त झाले.

4) सन 1682 मध्ये मोगलांनी संभाजीराजांचा उत्तर कोकणातील प्रदेश हस्तगत करून त्याचे मुख्य ठिकाण कल्याण येथे ठाणे दिले. परंतु संभाजीराजांनी चहूकडून मोगल फौजांस घेरून कल्याणवर त्यांचा कोंडमारा केला असता पोर्तुगिझांनी आपल्या जहाजांतून धान्यसामुग्री आणून मोगलांचा बचाव केला. धान्य मिळाले नसते तर मोगल सेनापती रणमस्तखान याजवर कठीण प्रसंग गुदरला होता (डिसेंबर 1682). आपल्या हातचा डाव पोर्तुगिझांनी अशा रीतीने बुडविला हे पाहून संभाजीराजे प्रक्षुब्ध झाले आणि त्यांची चांगली खोड मोडण्याचा निश्चय त्यांनी मनात आणला.

5) शहाजादा अकबर संभाजीराजांचे आश्रयास पाली येथे आल्यावर पाठोपाठ मोगल फौजा चालून आल्याने त्यांचा प्रतिकार करण्यासाठी सुरतेपासून कारवारपर्यंतचा सर्व किनारा आपल्या कब्जात ठेवणे संभाजीराजांस भाग पडले. या किनाऱ्यावर दुसऱ्या कोणाची व्यापारी व लढाऊ जहाजे आपल्या परवान्याशिवाय फिरू नयेत असा बंदोबस्त करून संभाजीराजांनी सर्व जहाजांना आपले परवाने देण्यास सुरुवात केली. अर्थात पोर्तुगिझांचे स्वातंत्र्य नष्ट झाले आणि त्याबद्दल संभाजीराजांशी युद्ध करण्याचा त्यांचाही निश्चय झाला.

6) वरील बिघडलेल्या परिस्थितीत अकबराच्या करणीने आणखी भर पडली. तो गोव्याचे बाजूस जाऊन इराणला जाण्यासाठी पोर्तुगिझांची जहाजे मागू लागला. ती द्यावी

तर बादशहा चिडणार, न द्यावी तर संभाजीराजे चिडणार, अशा पेचात पोर्तुगिझ पडले असताना प्रथम संभाजीराजांनीच सन 1683 च्या उन्हाळ्यात चौल म्हणून जे रायगडजवळ पोर्तुगिझांचे मुख्य ठिकाण होते त्यास वेढा घातला, तेव्हापासून उभयतांचे उघड युद्ध सुरु झाले.

या युद्धात प्रथम चौलचा वेढा व मागाहून फोंड्याचा वेढा हे दोनच निकराचे पण अल्पकालीन संग्राम घडून आले. चौलच्या वेढ्यात संभाजीराजांस व फोंड्याच्या वेढ्यात पोर्तुगिझांना अपयश आले.

4. पोर्तुगिझांना अद्दल घडली (सन 1683-84) :

‘ज्येष्ठ व.11 (ता. 10.6.1683) रोजी संभाजीराजे स्वार होऊन राजापुरास गेले. फिरंग्यांसी बिघाड केला. रेवदंडियासी (चौलास) वेढा घातला’, अशी नोंद ‘जेधे शकावली’ची आहे. याचवेळी संभाजीराजांनी वसईपासून दमणपर्यंतच्या पोर्तुगिझ प्रदेशात आपल्या चपळ स्वारांच्या टोळ्या पाठवून तो जाळून लुटून फस्त केला. चौलच्या वेढ्याचे काम पेशवा निळोपंताकडे होते. त्याने ते स्थळ हस्तगत करण्याचे पुष्कळ प्रयत्न केले पण ते व्यर्थ गेले. ता. 8.8.1683 रोजी रात्री चौलच्या तटावर मराठ्यांनी निकराचा हल्ला केला, त्या प्रसंगात पोर्तुगीजांनी पुष्कळ मराठे कापून काढले. जवळच कोरलाईचा किल्लाही पोर्तुगीजांचा होता, त्याजवर मराठ्यांनी छापा घातला, त्यातसुद्धा पुष्कळ लोक जाया झाले, पण स्थळ हाती आले नाही.

उत्तरेकडील युद्धाची ही हकिकत झाली. आता खुद्द गोव्यास काय प्रकार झाला तो पाहू. यावेळी इटालियन प्रवासी मनूची गोव्यास होता. त्याने त्यावेळची हकिगत स्वत: पाहून लिहिलेली उपयुक्त आहे. औरंगजेब बादशहाची पत्रे घेऊन त्याचे वकील गोव्यास गव्हर्नर फ्रॅन्सिस्को टाव्होरा याजकडे आले, त्यामुळे गव्हर्नरास मोठा आनंद झाला. त्याने मनूचीकडून बादशहाच्या पत्राचे भाषांतर करवून घेतले.

सन 1683 च्या जानेवारीत शहाजादा अकबर दुर्गादासास बरोबर घेऊन ‘बांदा’ येथे आला. बांदा हे ठिकाण गोव्याचे हद्दीवर संभाजीराजांचे ताब्यात असून तेथे त्यांचा वाडा व बाग वगैरे होते. पोर्तुगिझांकडून जहाजांची सोय करून घेऊन आपण इराणास जावे असा अकबराचा बेत होता. त्यासाठी त्याने आपला वकील ‘अब्दुल रहीमखान’ यास गोव्याचा गव्हर्नर टाव्होरा याचे भेटीस पाठविले. ता. 17.1.1683 रोजी वकिलाची व गव्हर्नराची भेट झाली. भेटीत वकिलाने गव्हर्नरास सांगितले, ‘आमचे यजमानाचे व संभाजीराजांचे बिलकूल पटत नाही. म्हणून दख्खन सोडून बाहेर निघून जाण्याचा विचार त्यांनी केला आहे. या कामी आपले साह्य आम्हास पाहिजे. मी काही भारी जवाहीर बरोबर आणिले

आहे हे विकत घेऊन त्याची किंमत आम्हास द्या आणि आमच्या प्रवासाची सोय लावा.' यावर उभयतांचे बोलणे होऊन गव्हर्नर टाव्होराने वकिलास पत्राचा जबाब देऊन व आपला आशय कळवून परत पाठविले. या जबाबाची ता. 19.1.1683 असून त्यात असा मजकूर होता की, 'आपल्या वकिलानी पत्र आणून दिले ते वाचून संतोष झाला. आपणास प्रखर अडचणी व कष्ट सोसावे लागत आहेत त्यांची हकिकत वकिलांच्या तोंडून ऐकून आम्हास फार खेद होतो. त्यांनी कित्येक गोष्टी कळविल्या, त्यासंबंधाने शक्य ते इलाज आम्ही मोठ्या आनंदाने करू. सर्व विचार वकिलांपाशी बोललो आहोत, ते आपणास कळवितील. आपली कोणतीही कामगिरी करण्यास आम्ही हयगय करणार नाही.'

हे पत्र गव्हर्नराने लिहिले त्याच्या दुसऱ्याच दिवशी शेख महंमद नावाचा औरंगजेबाचा वकील गोव्यास दाखल झाला. त्यामुळे अकबरास साह्य करणे त्या गव्हर्नरास अशक्य होऊन बसले. पुढे अकबराने गव्हर्नरास कळविले, 'आम्हास मंगळूर येथे पोहोचवून द्या म्हणजे आम्ही तेथून पुढे मक्केस जाऊ.' तदनुसार ता. 13.2.1683 रोजी गव्हर्नराने पाच गलबते अकबरास देण्याचा हुकूम केला. पत्राचा जबाब गव्हर्नराने त्यास पाठविला, तो असा. 'आपले पत्र वाचून संतोष झाला. आपण आपला स्वत:चा हिरेजडित खंजीर आम्हास बक्षिस म्हणून पाठविला, त्याबद्दल आम्ही फार-फार आभारी आहोत. आपल्यासाठी सोबतच्या यादीप्रमाणे कित्येक चिजा वकिलांबरोबर पाठविल्या आहेत, त्यांचा स्वीकार व्हावा. सर्व बाबतींचा खुलासा वकिलांपाशी केला आहे. 'मंगळूर येथे आमची वखार आहे तेथून पाच गलबते आपणास देण्याविषयी हुकूम पाठविले आहेत. हे हुकूम घेऊन आपल्या माणसांनी पणजीतून आमचा पडाव घेऊन जावे आणि पुढील व्यवस्था लावावी. आपली माणसे येण्याचीच खोटी आहे, ती येताच पडाव निघेल.'

ही सर्व वाटाघाट औरंगजेबाचा वकील शेख महंमद गोव्यास बसला होता, त्यास कळली आणि त्याने लगेच बादशहास लिहून त्याजकडून गव्हर्नरास तंबी देवविली. शिवाय मोगल आरमाराचा प्रमुख जो जंजिरेकर सिद्दी याकूत त्यासही शेख महंमदाने लगेच खबर दिली की, 'अकबर असा पळून जात आहे त्यास अटकाव करावा.'

अकबर व औरंगजेब या दोघांची संधाने सांभाळण्यात गव्हर्नर टाव्होराची त्रेधा उडून गेली. मुख्यत: बादशहाचा कोप आपल्यावर होऊ नये ही त्यास मोठी विवंचना लागली आणि बादशहाची समजूत घालणारे पत्र त्याने ता. 12.4.1683 रोजी बादशहास लिहिले, त्याचा आशय असा :- 'आपलेकडून शेख महंमद आले ते दाखल झाले. त्यापूर्वीच आपले चिरंजीव शहजादा अकबर यांजकडून आमच्याकडे माणसे व पत्रे आली होती. त्यात त्यांनी असे कळविले होते की, 'या काफरांच्या राज्यातून निघून जाण्यास आम्हास साह्य करावे.' त्यानंतर जंजिरेकर सिद्दी याकूतखान यांनी आम्हास खबर दिली की, 'शहाजादा अकबर बादशहाची अवज्ञा करून पळून जात आहे त्यास आपण कोणतेही प्रकारे साह्य करू नये.' अशाच आशयाची पत्रे आम्हास आपले सरदार बहादूरखान व लुत्फुल्लाखान यांचीही

आली. शहाजाद्यांजवळ येथून पळून जाण्याचे काही एक साधन नाही. त्यांची इतकी हीनावस्था झाली आहे की पोटास पाहिजे म्हणून त्यांनी आपले काही जवाहीर सुद्धा आमचेकडे विक्रीस पाठविले आहे. या संबंधात आम्ही त्यांचे काहीच साह्य केलेले नाही. आपले चिरंजीव ते; त्यांनी आमच्याकडे काही विचारले आणि आम्ही त्यांचा अपमान केला, तर तिकडूनही आपला रोष आम्हावर झाला असता. आमचे आश्रयास कोणी असा मोठा गृहस्थ आला, तर त्याचा अपमान करणे आमच्या लौकिकास कसे बरे शोभेल? त्यांच्या बंडखोरीचा आपणास राग येणे साहजिक आहे, तरी पण आम्हास असे वाटते की 'या शूर व उमद्या राजपुत्राचे अन्याय पोटात घालून त्यास आपण क्षमा करावी' आणि त्यांचा उपयोग आपण आपल्या शत्रूंना जिंकण्याकडे करून घ्यावा. आपली आज्ञा लिहून येईल तर आम्हीसुद्धा त्यांजकडे मध्यस्थी करून आपल्याशी त्यांचा समेट करून देऊ. आपल्यासारख्या थोरांस हाच मार्ग उचित आहे.'

असे समजुतीचे पत्र बादशहास लिहिल्यावर या पुढे अकबराला साह्य करण्याची सोय गव्हर्नरास बिलकूल राहिली नाही. मात्र तो चहूकडील बातमी शहाजाद्यास कळवून त्यास सावध ठेवी. ता. 16.4.1683 चे जंजिऱ्याच्या सिद्दी याकुताचे त्यास पत्र आले, त्यात तो सिद्दी शहाजाद्यास पकडण्यास राजापुरास आल्याची बातमी होती, ती गव्हर्नराने बांदा येथे शहाजाद्यास कळवली. त्याबरोबर शहाजादा बांदा सोडून पोर्तुगीझ हद्दीत बिचोली येथे येऊन राहिला. सन 1683 च्या सप्टेंबरात त्याचा मुक्काम बिचोलीस होता. तेथून पुढे मंगळुरास जावे तर सिद्दी आपणास पकडील या भीतीने त्याने तो बेत बदलून गोव्यातूनच पोर्तुगीझ जहाजातून इराणास जावे, अशा इच्छेने त्याने गव्हर्नराकडे जहाजांसाठी विनंती केली. ती अर्थातच गव्हर्नरास मान्य करता आली नाही. ता. 23.10.1683 च्या पत्रात गव्हर्नर शेख महंमद यास लिहितो, 'शहाजाद्यांनी मागितलेली जहाजे आम्ही दिली नाहीत, तेव्हा त्यांनी एक खासगी जहाज लहानसे विकत घेतले आणि ते राजापुरास नेऊन तेथून मक्केस जाण्याचा विचार केला. त्यासाठी ते येथून राजापुरास गेले. पण प्रत्यक्ष जाऊन ते गलबत पाहिल्यावर ते सुरक्षित पोहोचणार नाही अशी खात्री वाटल्यावरून त्यांनी त्या जहाजाने जाण्याचा आपला बेत रहित केला असे समजते. हल्ली ते मराठ्यांचे राज्यात आहेत.'

पुढे संभाजीराजे व शहाजादा यांचे फिरून भांडण झाले. उभयतांचा विचार एकदम जाऊन बादशहाचे छावणीवर हल्ला करावा असा बेत ठरला होता. त्यासाठी संभाजीराजांनी खर्चास रक्कम मागितली. तेव्हा शहाजाद्याने काही जवाहीर संभाजीराजांस दिले. तथापि तयारी होण्यास विलंब लागू लागला, तेव्हा शहाजादा नाराज होऊन निकराने संभाजीराजांस सोडून वेंगुर्ल्यास गेला. तेथे त्याने एक जहाज खरेदी केले आणि आता प्रवास सुरु करणार तोच संभाजीराजांचा प्रधान कविकलश त्याचे भेटीस जहाजावर गेला आणि म्हणाला, 'आपण असे त्रागा करून निघून आल्याने संभाजीराजांस फार दु:ख होत

आहे.’ त्यांचे आपणास असे कळविणे आहे की ...आपण परत या, आपले ताब्यात आमची सर्व फौज देतो. आपण उभयता बादशहावर चालून जाऊन त्यांचा पाडाव करू. जय मिळविल्यावर मग आपण पाहिजे तिकडे खुशाल जा.’ हा प्रकार ता. 23.11.1683 च्या सुमारचा आहे. यानंतर शहाजाद्याने संभाजीराजांच्या भीमगड किल्ल्यावर प्रयाण केले. परंतु पुढील प्रकार सांगण्यापूर्वी याचवेळी संभाजीराजांनी गोव्यावर स्वारी केली ती हकिकत प्रथम सांगितली पाहिजे.

बादशहाने आपल्या वकिलामार्फत पोर्तुगीझ गव्हर्नरास पत्र पाठविले त्यात असा मजकूर होता की ‘संभाजीराजांचा मुलुख तुम्ही खुशाल जिंका. तो आम्ही तुम्हास बहाल करू. त्यास आपल्या मुलुखातून हुसकून द्या. दारूगोळा वगैरे बिलकूल काही त्यास पुरवू नका. तुम्ही जर काही युक्ती करून त्यास पकडाल किंवा ठार माराल तर आमचे मोठेच काम तुम्ही केलेसे होईल.’ अशा रीतीचे प्रोत्साहन मिळाल्यावर गव्हर्नर स्वस्थ का बसेल? आधी बादशहाकडून आपल्याकडे वकील आला यातच गव्हर्नरास मोठे भूषण वाटले. मनूचीने मात्र त्यास बजावले की, ‘तुम्ही बादशहाच्या शब्दावर बिलकूल भरवसा ठेवू नका. बादशहापेक्षा मराठेच तुम्हास पुष्कळ चांगले. सह्याद्रीची भिंत मध्ये आहे म्हणून तुमचा बचाव होत आहे. संभाजीराजांशी वैर धरून तुमचे क्षणभरही चालणार नाही.’ असे सांगून मनूचीने एकंदर हिंदी राजकारणाची माहिती गव्हर्नरास सांगितली, पण ती त्याला फारशी पटली नाही.

कोकणात पोर्तुगिझांनी संभाजीराजांचा उच्छेद चालविल्यामुळे ते त्यांजवर अत्यंत चिडून गेले होते आणि त्यांची चांगली खोड मोडण्याची त्यांची तयारी चालू असताना शहाजाद्याने गोव्याचा आश्रय पत्करला हेच उभयतांच्या वितुष्टाचे मुख्य कारण झाले. गोव्यास जहाजे बांधण्यासाठी सुतार, लोहार वगैरे पुष्कळसे शिल्पी लोक शहाजाद्याकडून गोव्यात गेले, त्यांजबरोबर संभाजीराजांचेही अनेक हेर निरनिराळे वेष घेऊन गोव्यात उतरले आणि त्यांनी गोव्यातील अंत:स्थितीची इत्थंभूत माहिती काढून आणली. उत्तरोत्तर मराठ्यांचा जमाव गोव्यात मोठा झाला, तो पाहून यात काहीतरी कृत्रिम आहे असे मनूचीने ओळखून गव्हर्नरास सावध केले. इकडे संभाजीराजांच्या हेरांनी गव्हर्नरास तोंडघशी पाडण्याच्या हेतूने अशी भर दिली की, ‘संभाजीराजांनी फोंड्यावर पुष्कळ द्रव्यसंचय केला आहे, तुम्ही हल्ला केल्यास तो संचय तुम्हास प्राप्त होईल.’ त्यावरून गव्हर्नराचे तोंडास पाणी सुटून त्याने फोंड्यावर स्वारी करण्याचा निश्चय ठरविला; आणि गोव्यात होते नव्हते तेवढे लोक जमवून व पादऱ्यांनासुद्धा हत्यारे देऊन युद्धास सिद्ध केले. संभाजीराजांना बातमी लागण्यापूर्वीच आपण इकडचा बेत उरकून घ्यावा असा गव्हर्नराचा बेत ठरला. त्यासाठी त्याने गोव्यातील हिंदी लोकांस जहाजात घालून ता. 29 ऑगस्ट रोजी तेरेखोल खाडीच्या लगतचा संभाजीराजांचा प्रदेश लुटून जाळण्याकरता रवाना केले. पण अशा बाजारबुणग्यांच्या हातून संभाजीराजांचे मुलुखास काही एक इजा पोचली नाही.

संभाजीराजांच्या हालचालींची व बलाबलाची माहिती गव्हर्नरापेक्षा मनूचीलाच जास्त कळत होती. राजापुरास फ्रेंच व्यापारी होते, त्यांजकडून संभाजीराजांची गुप्त कारस्थाने मनुचीस कळली, तेव्हा त्याने पुन्हा गव्हर्नरास बजावले की, ‘फोंड्यावर हल्ला करण्याच्या नादात तुम्ही पडू नका. आपण होऊन मराठ्यांची कुरापत काढू नका. बेताबाताने वागून निभाव करून घ्या.’ परंतु गव्हर्नरास मोगल बादशहाच्या पाठिंब्याची मोठी आशा होती. शहाआलम जंगी फौजेनिशी निघाला होता, ‘अशा संधीत इकडून आपण उठावा केला की फोंडा आपणास कायमचा मिळेल’ अशा समजुतीने गव्हर्नराने फोंड्यावर हल्ला करण्याचा निश्चय केला, आणि अकबराचे तयार झालेले जहाज वेंगुर्ल्यास पाठवून ता. 17.10.1683 रोजी आठशे युरोपियन, आठ हजार कानडी पायदळ व पाच मोठ्या तोफा घेऊन गोव्याहून त्याने प्रयाण केले. पाचवे दिवशी तो तटाचे पायथ्याशी येऊन दाखल झाला. फोंड्याचा हा तट जलदुर्ग आहे.

चार दिवस त्याने फोंड्यावर तोफांचा सडकून मारा केला, तेव्हा तटास एक लहानसे खिंडार पडले, त्यातून पोर्तुगीज लोक आत प्रवेश करीत असताना संभाजीराजांच्या लोकांनी आतून मोठ्या आवेशाने लढून आणि पुष्कळ लोक मारून तो हल्ला साफ मोडून काढला. इतक्यात पोर्तुगीझांच्या हल्ल्याची बातमी संभाजीराजांस चौल येथे कळून ते अशा वेगाने धावून आले की बाहेरून हे व आतून किल्ल्यातले लोक या दोघांच्या चिमट्यात पोर्तुगिझ सापडून त्यांजवर आणीबाणीची वेळ येऊन गुदरली. पावसाने त्यांची दारू भिजून बंदुका चालेनात. बहुतेकांचा संहार झाला आणि मोठी नामुष्की पदरात घेऊन गव्हर्नर टाव्होराने ता. 1.11.1683 रोजी खाडी ओलांडून स्वत:चा जीव बचावून शिकस्तीने गोवे गाठले. हा नसता उपद्व्याप करून घेतल्याबद्दल बाहेर तोंड दाखविण्याची सुद्धा त्यास लाज वाटून तो एका धर्मगुरुच्या मठात कैक दिवस लपून बसला. गोव्यात घरोघर दु:खशोकाची दाट छाया पसरली.

संभाजीराजांनी लगेच लगट केली असती तर गोवे शहर तत्क्षणी त्यांचे कब्जात आले असते. त्यांनी फोंड्याच्या मजबुतीची व्यवस्था करून मग गोव्यावर चाल केली. गोव्याच्या उत्तरेकडचा बार्देश व दक्षिणेकडचा साष्टीचा प्रदेश त्यांनी प्रथम हस्तगत केला आणि गोव्यात उतरण्याकरता कुंभारजुवे व सेंट इस्टोव ही दोन तटबंदीची ठिकाणे गोव्यापासून दोन मैलांवरची ता. 24.11.1683 रोजी संभाजीराजांनी जिंकून घेतल्यानंतर जवळची सर्व गलबते वेठीस आणून खुद्द गोवा राजधानीत प्रवेश करण्याची पूर्ण तयारी केली. हे पाहून गोव्याचे अधिकारी व तज्जातीय लोक अत्यंत भयभीत झाले आणि संत झेव्हियरच्या मुख्य व भव्य मंदिरात जमून ईश्वराची करूणा भाकू लागले. कैक दिवस त्यांनी अहोरात्र भजन व प्रार्थना चालविल्या. त्यातील मतलब असा की ‘परमेश्वरा, हे राज्य तुझे आहे, तूच ते निर्माण केलेस आणि आता तुलाच त्याची लाज राखणे आहे.’ शेवटच्या रात्री गव्हर्नर व सर्व मठवासी यांनी मंदिरात प्रार्थना म्हटल्यावर मेणबत्त्या पेटविल्या आणि त्या साधूचे थडगे

उघडून राजदंड व राजाची सनद ही गव्हर्नराने पुढे ठेवली आणि साधू झेव्हियरच्या अद्भुत शक्तीच्या व कृपेच्या द्वारे गोव्याचे रक्षण व्हावे अशा उद्देशाने 'सर्व राज्याचा भार पोर्तुगालच्या राजाच्या नावे साधूच्या हवाली केला आहे' अशा मजकुराचे दानपत्र गव्हर्नराने त्यास अर्पण केले. नंतर साधू झेव्हियरच्या चित्राकडे वळून अश्रुपूर्ण नेत्रांनी व दु:खित नि:श्वासांनी त्याने करुणा भाकली. शौर्य धैर्याचे उपाय सर्व हरले. आता फक्त ईश्वरी कृपाच काय करील ते खरे अशा भावनेने त्याने संकटनिवारणाचा हा शेवटचा उपाय योजला. तोच काय चमत्कार झाला पहा, आपला राजदंड व दानपत्र वेदीवर ठेवून तो गव्हर्नर त्या पवित्र स्थानापासून दूर होतो-न-होतो, तोच आनंदी तोफांचा गडगडाट बाहेरून ऐकू येऊ लागला आणि बातमी आली की 'मराठे सेंट इस्टोव्ह बेट सोडून परत गेले.' हा चमत्कार पाहून गोव्यातील पोर्तुगिझांची खरोखरच अशी भावना झाली की साधू झेव्हियरने आपल्या अद्भुत प्रेरणेने राज्याचा बचाव केला. पण वास्तविक प्रकार घडला तो असा :-

गव्हर्नराने मनूचीस भेटून विनंती केली की तुम्ही जाऊन संभाजीराजांस भेटा आणि त्यांजबरोबर तह ठरवून आमचा बचाव करा. मनूचीने जाऊन संभाजीराजांची भेट घेतली. जवळ दुर्गादास होता. त्या वेळी संवाद झाला त्यात संभाजीराजे म्हणाले, 'पोर्तुगालच्या राजाचा हुकूम नसताना गव्हर्नराने आमच्यावर युद्ध चालविले याबद्दल आम्हास अत्यंत त्वेष आला आहे.' आपली भवानी तलवार दाखवून ते पुढे म्हणाले, ''ही पहा माझी तलवार, हिनेच मी आपल्या बंडखोरांची डोकी कांपली. हा माझा विश्वासू गृहस्थ बरोबर घेऊन गव्हर्नराकडे जा आणि तह ठरवा.'' या संवादात राजकारणापेक्षा संभाजीराजांचा आवेशच जास्त व्यक्त होतो. संभाजीराजे त्या इसमाबरोबर एक हजार लोक गोव्यात पाठविणार होते, पण मनूचीने मध्यस्थी करून ते मना केले. संभाजीराजांच्या वकिलाची व गव्हर्नराची भेट झाली, पण तह लगेच सिद्धीस गेला नाही. संभाजीराजांनी गोवे प्रांताच्या चौथाईची कायम मागणी केली ती गव्हर्नर मान्य करीना. अशा वाटाघाटीत कालहरण झाले ते गव्हर्नराच्या पथ्यावर पडले. तापलेल्या तव्यावर भाकरी भाजून घेण्याची त्वरा संभाजीराजांनी केली नाही. वेंगुर्ल्यास सिद्दिचे आरमार आले होते ते गव्हर्नराने आपल्या मदतीस बोलावले. इतक्यात औरंगजेबाची पत्रे गव्हर्नरास आली की, 'तुम्ही घाबरू नये, आमची फौज तुमचे बचावास येत आहे.'

कार्तिक व.7 (ता. 1.11.1683) चा जेधे शकावलीत उल्लेख. 'संभाजी राजे बांद्यास गेले. गोवेकरांनी कोटास वेढा घातला होता, त्यांसी लढून वेढा उठविला. तेथे येसाजी कंक व त्याचे लोक व कृष्णाजी यांनी युद्धाची शर्थ केली. मार्गशीर्ष मासी कुंभारजुवे घेतले. साष्टी बार्देश मारिला.' यावरून वरील सर्व प्रकार 17 ऑक्टोबरास गव्हर्नराने फोंड्यावर चाल केल्यानंतर एक महिन्याचे आत-बाहेर घडले हे सिद्ध आहे.

'शहाआलम आपल्यावर चालून येतो आहे' अशी निकडीची बातमी आल्याने ता.26.11.1683 रोजी संभाजीराजांना एकदम गोव्यातून परत पाय काढणे भाग पडले

आणि गोव्याचा बचाव झाला. या बनावाने संभाजीराजांची मोठी निराशा झाली, एवढेच नाही तर अकबर व दुर्गादास हेही मोठ्या फिकिरीत पडले. पोर्तुगिझांशी युक्तीने तह करून अकबराचा बचाव करण्याची कामगिरी संभाजीराजांनी कलुशावर सोपवली आणि आपण स्वत: त्वरेने शहाआलमवर चालून गेले. कलुशाने लगेच वेंगुर्ल्यास जाऊन अकबर व दुर्गादास यांस गुप्त रीतीने सह्याद्रीच्या अवघड भागी भीमगडावर आणले. हा भीमगड किल्ला फोंड्याच्या उत्तरेस 25 मैलांवर संभाजीराजांच्या ताब्यात होता, तो या कठीण वेळी फार उपयोगास आला. तह ठरविण्यात कलुशास अकबराचाही उपयोग चांगला झाला. कलुशाने आपला हस्तक 'राय कीर्तिसिंह' यास गोव्यास पाठवले. ता.29.11.1683 रोजी कीर्तिसिंहाने गोव्यास येऊन गव्हर्नराची भेट घेतली. काही बोलणे होऊन गव्हर्नराने आपला वकील मॅनुएल सरैव्हा अल्बुकर्क यास वाटाघाटीसाठी कीर्तिसिंहाबरोबर भीमगडास पाठविले. तेथे एक-एक कलमाची चर्चा अकबराचे विद्यामाने होऊन ता. 7.1.1684 रोजी मुख्य बाबती कायम झाल्या. तरी उभयपक्षी मसुद्यातील शब्दांची चर्चा होऊन सह्या होण्यास ता. 4.2.1684 चा दिवस उगवला. या तहाचा मतलब उपलब्ध आहे तो असा :-

1. युद्ध सुरु झाल्यापासून जे प्रदेश, किल्ले, जहाजे, तोफा, सामान वगैरे हस्तगत केले असेल, ते उभयतांनी एकमेकांस परत करावे.

2. एकमेकांनी पकडलेले कैदी परत करावे.

3. वसई व दमण या तालुक्यात गावखंडी व चौथाई या दोन बाबतींचा वसूल पोर्तुगिझांनी संभाजीराजांस द्यावा आणि संभाजीराजांनी त्या प्रदेशातील परचक्राचे निवारण करावे.

4. उभयतांना एकमेकांचे प्रदेशात व्यापारनिमित्त संचार करण्याची मोकळीक असावी.

5. पोर्तुगिझांनी आपल्या हद्दीतून बादशहाचे फौजेस दारुगोळा व धान्यसामुग्री वगैरे पोहोचू देऊ नये.

या तहासंबंधाने जेधे शकावलीतला उल्लेख अतिसंक्षिप्त आहे, तो असा:- 'माघ शु.1 (ता.7.1.1684) कविकलश अकबरास घेऊन भीमगडास गेले, फिरंग्यांशी सल्ला केला. ज्येष्ठ शु.15 (ता.18.5.1684) कबजी रायगडास आले.'

फोंडा येथे झालेल्या युद्धात शिवाजीचा विश्वासू सरदार येसाजी कंक व त्याचा पुत्र कृष्णाजी यांनी पराक्रम केल्याबद्दल संभाजीने त्यांचा परामर्ष घेतला, त्या संबंधाचे पत्र ता. 23.6.1685 चे संभाजी व पेशवा निळो मोरेश्वर याच्या शिक्क्याचे उपलब्ध आहे ते असे :- 'पत्र नियत पारितोषिक माा येसजी कंक सरनोबत व कृष्णाजी यसजी कंक पदातिनायक. मशारनिल्हेनी व मानिलेचे पुत्र कृष्णाजी कंक या दोघांनी फोंड्याचे स्वारीस फिरंग्यांसी गाठी पडली तेव्हा बहुत कस्त केली, आणि गनीम मारून काढिला. ते वख्ती दोघांलाही जखमा लागोन चकचूर झाले. कठिण जखमा राजश्री स्वामींनी दृष्टीने पाहिल्या आणि घरासी जावया आज्ञा दिली. त्यावर कृष्णाजी कंक याच्या जखमा फुटून घरी मयत झाला.

हल्ली येसाजी कंक हे हुजूर येऊन आपले वर्तमान विदित केले, त्यावरून स्वामी कृपालु होऊन, हे कामाचे मदाने स्वामिकार्यावरि तत्पर आणि यांचा पुत्रही स्वामीकार्यावरी मयत झाला. फोंड्याचे बक्षीस द्यावयाचे होते, म्हणून पारितोषिक होन पातशाही प्रत्येकास एक सहस्र मिळून दोन सहस्र होन रास, येणेप्रमाणे एकसाला ये वर्षी पारितोषिक द्यावयाचा नियत केला असे.' ह्यातील संस्कृत शब्दांचा भरणा लक्षात ठेवण्याजोगा आहे. या पत्रावरून संभाजीच्या कर्तव्यदक्षतेची साक्ष पटते.

5. वाडीकर सावंताचा संभाजीराजांस विरोध (स.1685-86) :-

अशाप्रकारे संभाजीराजे व पोर्तुगीझ यांजमध्ये तह कायम झाला, तरी संभाजीराजांच्या मनातून पोर्तुगिझांची खोड मोडण्याचा विचार गेला नव्हता. संभाजीराजांनी गव्हर्नरास कळवले, 'युद्धाचे कामी आम्हास खर्च फार आला आहे, तरी एक लाख होनांची पोक्त नजर आम्हास पाठवावी आणि अंजदीव बेट तुम्ही घेतले आहे ते आम्हास परत द्यावे.' या मागण्या गव्हर्नराने झिडकारून दिल्या आणि संभाजीविरुद्ध वाडीकर सावंताशी मिलाफ केला. गव्हर्नराने सावंतास कळवले, 'तुम्ही आम्ही शेजारी. संभाजी अत्यंत क्रूर आहे, अनीतिने वागतो. त्याचा पाडाव करण्यातच तुमचा व आमचा फायदा आहे.' अशा रीतिने शिवाजीमहाराजांच्या आश्रयाखाली आलेला सावंत यावेळी संभाजीराजांवर उलटला आणि पोर्तुगिझांस सामील झाला. त्या उभयतांचा हा तह ता.8.2.1685 रोजी पुरा झाला, त्यात खालील कलमे होती:-

1) उभयतांनी आरमाराने व खुष्कीने एकमेकांच्या सल्ल्याने संभाजीराजांशी युद्ध चालवावे. बांद्यापासून अंकोल्यापावेतोचा प्रदेश हस्तगत होईल, त्यातला तिसरा हिस्सा सावंतास व दोन हिस्से पोर्तुगिझांस मिळावा.

2) त्याचप्रमाणे कुडाळपासून चौलपर्यंतचा प्रदेश जिंकण्यास पोर्तुगिझांनी आपल्या आरमाराने खेमसावंतास मदत करावी. जो प्रदेश हस्तगत होईल, त्यातले दोन हिस्से सावंतास व एक हिस्सा पोर्तुगिझांस मिळावा.

3) लूट पैदा होईल, तिजपैकी आरमाराचा खर्च भागून राहील ती सावंतास देण्यात यावी.

4) सावंताचे मदतीस पोर्तुगीझ आरमार जाईल. शिवाय दारुगोळा वगैरे सामान सावंतास लागेल ते पोर्तुगीझ पुरवतील.

5) मोगल बादशहाकडे शिफारस करून सावंताचे लोकांस त्याचे पदरी नोकरी देवविण्याची खटपट पोर्तुगीझ करतील.

6) पोर्तुगिझांचे राज्यात सावंतास धर्माचाराचे स्वातंत्र्य राहील.

7) पोर्तुगिझांनी परभारे संभाजीराजांशी तह करू नये. तसेच सावंताने संभाजीराजांचे राज्यात वावरणाऱ्या इंग्रज, फ्रेंच, डच वगैरे युरोपियनांस त्रास देऊ नये.

8) सावंतास खर्चाची जरूर लागल्यास युद्ध सुरु झाल्यावर पोर्तुगीझ सरकार त्याची निभावणी करील.

संभाजीराजांविरुद्ध हा उठावा बादशहाने केलेला असावा. वरील तह झाल्याबरोबर ता.12.2.1685 रोजी सावंताने संभाजीराजांवर मोहीम सुरु करून वेंगुर्ल्याचे खाडीत आरमार नेऊन पुष्कळ लूट पैदा केली. ते वर्तमान समजताच संभाजीराजे त्वरेने कोकणात उतरून सावंतावर चालून गेले, तेव्हा काही काळपावेतो सावंतास आळा बसला. ता.24.1.1686 च्या कागदात गव्हर्नर कळवतो, 'कुडाळकर खेम सावंतासी स्वतंत्र तह करून आम्ही संभाजींस सडकून तंबी दिली आहे. गोवा प्रांतात आता एक फोंड्याशिवाय दुसरे ठिकाणी संभाजीराजांचा अंमल राहिलेला नाही. उत्तर कोकणातला कमानदुर्ग वगैरे वसईजवळचा प्रांत संभाजीराजांकडे गेलेला आम्ही परत घेतला.' अशेरीचा किल्ला पूर्वी पोर्तुगिझांकडे असून अलिकडे संभाजीराजांनी काबीज केला होता, तोही त्यांनी सन 1687च्या ऑक्टोबरात परत घेतला. उत्तरोत्तर संभाजीराजांचा पाय खालावत चालला. कविकलश व पेशवा निळोपंत यांचे वैमनस्य येऊन दरबारात दोन पक्ष झाले त्यांनीच संभाजीराजांस ग्रासले.

6) बादशहाशी पहिला सामना :-

कालानुक्रमासाठी थोडे मागे गेले पाहिजे. सन 1681 पासून चार वर्षे पावेतो संभाजीराजांनी बादशहाशी नेटाने सामना केला, त्याच्या विवेचनाच्या सोयीसाठी दोन पोटभाग पाडता येतात. पहिला सन 1683 च्या पावसाळ्यापर्यंतचा झगडा विशेष तीव्र आहे. कारण संभाजीराजे व अकबर या दोघांनी आपली शिकस्त करून दाखविली. दुसऱ्या पोटभागात अकबराने विशेष भाग घेतला नाही.

हसनअली म्हणून औरंगजेबाचा एक सरदार राजपुतान्यातील युद्धात लौकिक मिळवून त्याच्या पसंतीस उतरला होता, त्यास बादशहाने सन 1681 मध्ये संभाजीराजांवर रवाना केले आणि त्याजबरोबर चौदा हजार उत्कृष्ट स्वारांचा जमाव दिला. जुन्नरपासून कल्याणपर्यंतचा संभाजीराजांचा उत्तर कोकणातील प्रदेश काबीज करावा असा त्यास बादशहाचा हुकूम होता. कारण संभाजीराजे त्यावेळी जंजिऱ्याच्या सिद्दिशी लढत असल्यामुळे उत्तर कोकणचा भाग मोकळा होता. हसनअलीखान नाणेघाटाने कोकणात उतरू लागला. मराठी फौजेने त्यास अडवले, ती धुडकावून हसनअलीने पुढे येऊन कल्याण काबीज केले (ता. 30.1.1682). हसनअलीच्या हाताखाली 'दलपत बुंदेला' हा राजपूत

सरदार होता, त्याने लिहिलेल्या यावेळच्या हकिगती उपलब्ध आहेत. हसनअलीने पुढे तीन-चार महिने चहूकडे बराच उच्छेद केला, पण पाऊसकाळ आला तेव्हा तो घाट चढून परत वर आला. त्याचे मदतीस बहादूरखान हा पेडगावावर छावणी करून राहिला होता, आणि दोघांसही बादशहाची ताकीद होती की जरूर पडेल तिकडे चाल करून संभाजीराजांचा मुलुख हस्तगत करावा. मोगलांची पाठ वळताच कल्याण परत मराठ्यांनी घेतले.

हसनअली प्रथम चालून आला तेव्हा संभाजीराजे जंजिऱ्याचे मोहिमेवर होते. त्या ठिकाणी दहा हजार फौज ठेवून ते सन 1682 च्या फेब्रुवारीत रायगडावर आले. त्यांस भीति होती की कल्याणहून हसनअली आपल्या राजधानीवर चालून येईल. म्हणून त्यांनी चौल, नागोठाणे इत्यादि ठिकाणी बंदोबस्तास फौजा ठेवून दिल्या. घाटावरही त्याने साताऱ्यापावेतो नाक्यानाक्यांनी फौजांच्या रांगा बनविल्या. पुढे बादशहा स्वतःच औरंगाबादेस येऊन बसला. लगेच त्याने पुत्र अजमशहा व दिलेरखान यास दक्षिणेस नगरकडे आणि शियाबुद्दिन व दलपत बुंदेला यास नासिककडे मराठ्यांचे प्रदेश व किल्ले काबीज करण्यास रवाना केले. शियाबुद्दिनने रस्त्यातील ठाणी घेऊन सन 1682 च्या एप्रिलात रामसेज किल्ल्यास वेढा घातला, त्या ठिकाणचा संग्राम विशेष स्मरणीय आहे.

रामसेज किल्ला नासिकच्या उत्तरेस सात मैलांवर असून तेथील किल्लेदाराने मोगलांशी मोठ्या चतुराईने सामना करून किल्ला हातचा जाऊ दिला नाही. किल्ल्यावर तोफांचा मारा पोचावा म्हणून शियाबुद्दिनखानाने समोरच्या डोंगरावर एक उंच सज्जा तयार केला. परंतु त्यापासून काही उपयोग झाला नाही. 'गनिमाने धमधमे बांधोन बहुत लगट केला. परंतु केसो त्रिमल पेशवे यांनी त्रिंबकगडी राहोन सामानाचा पुरवठा केला. हरभांतेने मदत केली. सहा महिने किल्ला भांडविला. किल्ला हाती न ये, करिता शाब्दीखानास (शहाबुद्दिनखानास) बादशहांनी परत बोलावून नेला.' मराठ्यांनी किल्ल्यातून बाहेर मोगलांवर अनेक वेळा हल्ले करून त्यांचा मोड केला. रामसेजचा किल्लेदार व हवालदार यांनी अद्वितीय पराक्रम केला. बादशहा इतका चिडून गेला की शियाबुद्दिनखानास परत बोलावून त्याचे जागी त्याने बहादुरखानास पाठवले. दलपत बुंदेला तेथे होताच. मोगलांनी अनेकवार किल्ल्यावर मोठमोठे हल्ले निकराचे चढवले, ते सर्व मराठ्यांनी मोडून काढले; आणि किल्ल्यावरून दगड, बाण, आगीचे गोळे वगैरे मोगलांवर फेकून त्यांची दाणादाण करून सोडली. शेवटी नाइलाजाने मोगल फौजेस वेढा उठवून परत जावे लागले (ऑक्टोबर 1682). यामुळे बादशहास अत्यंत खेद झाला. इतक्यात सेनापती हंबीरराव मोहिते दहा हजार फौज घेऊन रामसेजच्या मदतीस चालून येत असताना परतलेल्या मोगलांना आढळला. त्यांची लढाई होऊन हंबीररावाचा पराभव झाला.

संभाजीराजांपुढे आपला इलाज चालत नाही असे पाहून औरंगजेबास जास्तच त्वेष चढला. डोकीवरचे पागोटे जमिनीवर रागाने आपटून तो बोलला, 'संभाजीचा पाडाव करीपर्यंत मी हे पागोटे पुन्हा घालणार नाही,' (ता. 30.7.1682). असे बोलून त्याने

संभाजीराजांचा नायनाट करण्याचे अजब प्रयत्न चालू केले. विजापूरच्या आदिलशहाची मदत संभाजीराजांस येत असे ती बंद करून, उलट त्या शहाने मिरजेच्या बाजूने संभाजीराजांवर चाल करावी, अशा विचाराने औरंगजेबाने आपले वकील विजापुरास पाठवून शहाच्या मदतीबद्दल त्यास मोठी रक्कम देऊ केली. पण हा घाट जुळून आला नाही. संभाजीराजांचा पाडाव झाला की बादशहाची गदा आपणावर येणार हे आता सर्वांस उघड दिसत होते. म्हणून आदिलशहाने इत:पर संभाजीराजांनाच साह्य केले. सबब औरंगजेबाने पुत्र अजमशहास विजापुरचे बाजूचा बंदोबस्त राखण्यासाठी मुद्दाम रवाना केले आणि रुहुल्लाखान व मुइझुद्दिन यास नगर प्रांतात ठेवून तेथून संभाजीराजांवर नजर ठेवण्याची व्यवस्था केली. तसेच शियाबुद्दिनखानास जुन्नरास बदलून, रणमस्तखानास खाली कोकणात रवाना केले. मिळून फक्त सावंतवाडी, गोवा वगैरे दक्षिणेकडील द्वार खेरीज करून इतर सर्व बाजूंनी संभाजीराजांच्या राज्यास बादशाहाचा वेढा पडला आणि दक्षिणेचे मोकळे द्वारही पोर्तुगिझांनी अडवून धरावे अशी तजवीज झाल्यामुळे संभाजीराजांना प्रथम पोर्तुगिझांशीच झगडा करावा लागला. सन 1682 च्या पावसाळ्यात या सर्व तजविजी पुऱ्या होऊन उघाडी होताच मोगल फौजा चवताळून बाहेर पडल्या. नोव्हेंबर महिन्यात रणमस्तखानाने उत्तर कोकणात प्रवेश करून तेथील मुख्य ठिकाण जे कल्याण ते हस्तगत केले. हे वर्तमान संभाजीराजांस समजताच त्यांनी निळोपंत मोरेश्वर पिंगळे व रूपाजी भोसले यांस कल्याणचे बचावास पाठवले. पण रणमस्तखानाने पुढे येऊन त्यांचा पराभव केला. संभाजीराजांची दुसरी एक फौज नासिकचे बाजूस चालून गेली तिचा समाचार खानजहानने घेतला. इतक्यात बादशहास खबर लागली की शहाजादा अकबर मोठी मराठी फौज घेऊन बेदरच्या बाजूस चालून आला आहे. त्याजवर बादशहाने नातू मुइझुद्दिन व खानजहान यांस पाठविले. ते ताबडतोब गोदावरीवर आपल्या फौजा एकत्र करून नांदेडवरून बेदरकडे चालून गेले. इतक्यात पाथरीजवळ बादशहाचे हत्ती चारणीस होते ते संभाजीराजांच्या लोकांनी पळवून नेल्याची बातमी आली. तेव्हा खानजहान तसाच बेदरकडून मागे फिरला, त्यामुळे मराठ्यांची व त्याची मोठ्या धावपळीची लढाई कैक दिवस चालली आणि खानजहानने बादशहाचे हत्ती सोडवून आणले. यावेळी मराठी फौजा गोवळकोंड्याच्या हद्दीतून चांद्यापावेतो दौडत गेल्या. त्यांच्याशी टिकाव धरण्यात खानजहानचे व त्याच्या लोकांचे अतोनात हाल झाले. हा प्रकार सन 1683 च्या उन्हाळ्यातला आहे.

रणमस्तखानाने कल्याण हस्तगत केले, पण तेथे त्यास व फौजेसाठी खाण्याचे अत्यंत प्रयास पडले. बादशहाने रुहुल्लाखानाबरोबर साहित्य पाठविले आणि सुरतेहून सामानाची जहाजे आणवली, तेव्हाच खानाचा निभाव कल्याणास थोडाबहुत झाला. हसनअलीखान बहादुरगडाहून परिंड्याकडे चालून जात होता, त्यास संभाजीराजांची फौज भेटली. फलटणजवळ उभयतांचा सामना होऊन हसनअली जखमी झाला. इकडे शहाजादा अजम

आदिलशाही मुलखात चालून गेला होता, त्याने धारूर येथे मुक्काम केला. त्या ठिकाणी जनानखाना बंदोबस्तात ठेवून त्याने संभाजीराजांच्या मुलखावर चाल केली. संभाजीराजांची फौज हुलकावण्या दाखवीत त्याच्याशी लढत राहिली, परंतु तिजपैकी एका टोळीने अकस्मात येऊन धारूर येथे शहाजाद्यांच्या जनानखान्यावर छापा घातला. दारा शेखोची मुलगी 'जहानजेब उर्फ जानी बेगम' ही अजमशहाची बायको तेथे छावणीत होती आणि तिच्या बंदोबस्तास अनिरुद्धसिंह हाडा हा राजपूत सरदार होता. मराठे चालून आलेले ऐकताच छावणीत एकदम हाहा:कार उडाला. त्या कठीण प्रसंगात बेगमेने आपला पडदा काढून टाकून घोड्यावर बसून, होती नव्हती तेवढी फौज जमवून मराठ्यांशी मोठ्या त्वेषाने सामना केला. त्यावेळी थोडा वेळपावेतो मोठ्या रक्तपाताचा संगाम घडून आला. अनिरुद्धसिंहाने लढाईची शिकस्त केली. त्याचे 900 लोक कापले गेले. मराठ्यांचेही पुष्कळ लोक पडले. बेगम पुढे मोर्च्यातच होती. अशा रीतीने तिने मराठ्यांस मागे हटवून आपला बचाव केला. अनिरुद्धसिंहाला जखमा लागल्या होत्या, तरी जिवाची पर्वा न करता जो पराक्रम त्याने गाजवला त्याबद्दल बेगमेने आपल्या गळ्यातला मौल्यवान मोत्याचा कंठा त्याचे गळ्यात घालून त्याचे कौतुक केले. हा प्रकार सन 1683 च्या मार्च महिन्यात घडला. त्यावेळी अजमशहा नीरेच्या काठी होता, त्याला बायकोच्या पराक्रमाची हकिगत ऐकून धन्य वाटले. जून महिन्यात बादशहाने त्याला आपलेजवळ औरंगाबादेस बोलावले. रहुल्लाखान व रणमस्तखान कल्याण प्रांतात होते, त्यांनाही बादशहाने आपल्याकडे बोलावून घेतले. ते कोकणातून तिटवालाच्या घाटाने नगरकडे येत असताना एका लहानशा अवघड वाटेशिवाय त्यांस दुसरा मार्ग नव्हता. त्यांच्या हालचालींची बरोबर माहिती मराठ्यांस होती. त्यांच्या टोळ्या घाटात लपून बसल्या. रहुल्लाखानास त्या टोळ्या आढळताच त्यांजवर त्याने बाणांची वृष्टी केली. त्या प्रसंगात मराठ्यांचा जो मुख्य सेनानायक होता, त्याच्या मुलास जखमा लागून तो विव्हळत पडलेला रहुल्लाखानाचे हातात सापडला. खानाने त्यास औषधोपचार करून 'तू कोणाचा कोण?' म्हणून माहिती विचारली. पण त्या वीर्यशाली बच्चाने आपले नाव सुद्धा सांगितले नाही. त्यास सोडविण्यासाठी मराठ्यांनी दोन लाख पावेतो दंड देण्याची इच्छा दर्शवली, परंतु खानाने ती रक्कम स्वीकारली नाही. पुढे त्या मुलाचे काय झाले त्याचा खुलासा मिळत नाही. बहुधा बादशाही कैदेतच त्यास आयुष्य कंठावे लागले असेल. अशी पहिली चकमक झडून पुन्हा खान वाट चालू लागला तो मराठ्यांच्या पस्तीस हजार लोकांनी डोंगरातले घाट व वाटा सर्व अडवून ठेवलेल्या त्यास आढळल्या. रणमस्तखानही तशाच दुसऱ्या अवघड वाटेत सापडला. त्यास रहुल्लाजवळ पोचता येईना. उपासमार होऊ लागली. वसई वगैरे बंदरात पोर्तुगिझांची ठाणी होती त्यास नानाप्रकारची लालूच देऊन रहुल्लाने जहाजातून काही थोडी पोटगी आणवली. त्याने बादशहाकडेही मदत पाठवण्याबद्दल विनवण्या केल्या. पण बादशहाला त्याची दया आली नाही. तो म्हणाला, 'तुमचे जवळ आठ हजार स्वार आहेत ते

काय थोडे झाले! मराठे सेनापतीचा मुलगा जवळ अडकवून ठेवला आहे त्यास सोडून आपला बचाव करून घ्या.' अशा प्रकारची बादशाही उमरावांची दुर्दशा संभाजीराजांनी उडवली.

7) महाराष्ट्राच्या पिशाच्चभूमीत बादशहाची विवंचना :-

कल्याण, औरंगाबाद, चांदा, बेदर, फलटण व खाली रायगड एवढ्या विस्तृत टापूत प्रचंड सामर्थ्य धारण करणाऱ्या बादशहाशी संभाजीने वर सांगितल्याप्रमाणे जो एक वर्षपावेतो विलक्षण सामना केला त्यास इतिहासात थोडीच तोड सापडेल. खेदाची गोष्ट इतकीच की या झगड्याच्या हकिगती कोठेही मराठी कागदावर नमूद नाहीत. कागदशाईची गाठ पडण्यास त्या धामधुमीत कोणास सवडच आली नसेल. संभाजीराजांच्या कारकीर्दिची माहिती आपणास अल्पस्वल्प मिळते, ती फक्त परकी लेखांतून. इंग्रज, पोर्तुगीजांच्या ऐकीव हकिकती किंवा बादशाही अखबारा हेच काय ते आपले मुख्य आधार आहेत. मराठीत फक्त एक चिटणिसी बखर, ती सुद्धा संभाजीराजांनंतर सव्वाशे वर्षांनी लिहिलेली आहे. एखाद्या बिकट प्रसंगाची हकिकत महिना पंधरा दिवसांच्या अवकाशाने ऐकीव माहितीवरून लिहिल्यास तिचे स्वरूप किती विकृत होते हे आज आपण जाणतो. मग अडीचशे वर्षांपूर्वीच्या शेकडो मैलांच्या टापूत पराक्रम गाजविणाऱ्या मराठे वीरांच्या हकिकती आज आपणास कशा व कितीशा कळणार? 'बादशाही अखबारा' तर पुष्कळशा अविश्वसनीयच वाटतात. सारांश, संभाजीराजांच्या कारकीर्दिचा व अकबराच्या हालचालींचा खरा व भरपूर इतिहास आपणास उपलब्ध नाही हे लक्षात ठेवले पाहिजे.

एक गोष्ट खरी की एवढा पराक्रम बादशहा आपले प्रचंड सामर्थ्य संभाजीवर खर्च करीत असताना एका वर्षात त्यास काहीच परिणाम दिसून येईना. उलट अनेक ठिकाणी मराठ्यांनी मोगलांस गाठून त्यांचा फन्ना उडविला. अशा सर्व गोष्टी पाहून औरंगजेबाची खात्री झाली की संभाजराजांना जिंकणे वाटले होते तितके सोपे नाही. आपले सैनिक कुचराई करतात असा त्याचा समज होता तो आता साफ खोटा ठरला अशा पद्धतीने युद्धाचा पार येणार नाही असे त्यास कळून चुकले आणि काही नवीन मार्ग ठरवण्याकरता त्याने सन 1683 च्या पावसाळ्यात आपल्या ठिकठिकाणच्या सर्व सेनानींना वाटाघाटीसाठी आपल्याजवळ आणले. पण नवीन असे तो तरी काय ठरविणार? त्याच्या मनाची स्थिति भ्रमिष्टासारखी झाली. अकबर तर उघड त्याच्याशी लढतच होता. वडिलपुत्र शाहआलम मराठ्यांस मिळून आहे अशी वार्ता सर्वत्र उठली होती. कोणावर भरंवसा ठेवावा आणि कोणावर ठेवू नये असे त्यास होऊन गेले. मे महिन्यात तर त्याचा असा काही काळ गेला, की स्वत:च्या जीविताचा सुद्धा त्यास भरंवसा वाटेना. केव्हा मारेकरी येऊन आपला जीव

घेतील अशी भीति पडून त्यास चैन पडेना. मराठे म्हणजे केवळ सैतान होत. त्यांच्या या पिशाच्चभूमीतून आपण एकदा कसेतरी निघून जावे असाही त्याने अल्पकाळ निश्चय केला. परंतु मागे दक्षिणेत राहून संभाजीराजांपुढे ठासून उभा राहण्यास कोणी कबूल होईना. वडिलपुत्रास त्याने विनविले, 'तू ही कामगिरी अंगावर घे.' तेव्हा तो म्हणाला, 'अफगाणिस्तानात अमीरखान आहे त्यास इकडे बोलावून माझे हाताखाली द्या म्हणजे मी हे काम पत्करतो.' त्यामुळे 'न कर्त्याचा वार शनिवार' अशी गत झाली. अमीरखानास हालवला तर अफगाणिस्तान हातचा जाणार, अशी विवंचना बादशहास पडली. पाश्चात्त्यांच्या लेखात बादशहाच्या या मन:स्थितीचे सुंदर चित्र पाहावयास मिळते.

ता. 19.6.1683 च्या पत्रात सुरतेचा एक इंग्रज लिहितो, 'बादशहाचे चित्तास भ्रम झाला आहे. क्षणोक्षणी त्याचे मन बदलते. सगळे उमराव त्याजवर नाखूष झाले आहेत. आता त्याचे डोळे मिटतील तरच निभाव आहे. नाहीतर काही तरी अपाय त्यास होणार खास. पदरचे बहुतेक लोक शहाजादा अकबरास अनुकूल आहेत.' त्यानंतर 2 ऑक्टोबरचे पत्र, 'बादशहा केव्हा काय करील याचा नेम नाही. तो इतका चिडखोर बनला आहे की स्वत: तो कोणाचे काही ऐकून घेत नाही. रात्रंदिवस डोळ्यांपुढे अकबर उभा. अजमशहा, त्याची बायको जानी बेगम व दिलेरखान यांचा ओढा अकबराकडे आहे असे बादशहाचे मनाने पक्के घेतले असून त्यांस त्याने नाहक शिक्षा केल्या आहेत. कोणासही क्षणाचा भरवसा वाटत नाही. राजपूत राजे अकबरास साह्य करून बादशहाची उचलबांगडी करणार असा रंग दिसत आहे. कदाचित इतक्यात बादशहाला मृत्यु येईल तर सर्वत्र गोंधळ उडण्याचा संभव आहे. मनूची वगैरे माहितगार लेखकांचे सुद्धा असेच उद्गार आहेत. भीमसेन लिहितो, 'अजमशहा व दिलेरखान यांस बादशहाने नगरच्या बाजूस बंदोबस्तास पाठविले होते. ते अकबरास सामील आहेत असा संशय येऊन बादशहाने त्यांस निकडीचा हुकूम पाठवला की, 'तुम्ही असाल तसे ताबडतोब माझ्या भेटीस या.' त्यांना येण्यास विलंब लागला, त्यावरून बादशहाचा क्रोध अनावर होऊन त्याने दिलेरखानास कडक शिक्षा केली. ईश्वरदास नागर लिहितो, 'बादशहाकडून अजमशहास बोलावण्याचे पत्र येताच तो रात्री दिलेरचे तंबूत त्याचे भेटीस गेला. तेथे त्यांचे चार तास खलबत झाले. ही गुप्त गोष्ट हेरांनी लगेच बादशहास लिहून कळवली. पत्र वाचताच त्याने अजमशहास कामावरून दूर केले आणि त्याच्या हाताखालची सर्व मंडळी आपल्याजवळ बोलावली. ते अहमदनगरास दाखल झाले. यामुळे अजमशहा बापावर अत्यंत संतापून गेला. त्याने लगेच जवळचे सर्व नोकर काढून टाकले आणि कोणाची भेट न घेता एकटाच घरात दु:ख करीत बसला. दिलेरखानाने तर विष घेऊन प्राणत्याग केला. नंतर बादशहाने स्वत: अजमशहाकडे जाऊन त्याची समजूत केली. (ता. 20.9.1683).

दिलेरखानाचे चरित्र वाचकांसमोर आहेच. हा रोहिला सरदार दाराचे हाताखाली वाढला. औरंगजेब दक्षिणेतून चालून गेला, तेव्हा दिलेरने दाराचा पक्ष सोडून ऐन लढाईत

औरंगजेबाचे साह्य केले. तेव्हापासून औरंगजेब बादशहाची सेवा जर कोणी अत्यंत निष्ठेने केली असेल तर ती या दिलेरखानानेच होय. त्याच्यात सांगण्यावरून जयसिंहासारखे सरदार बादशहाच्या मर्जीतून उतरून अप्रतिष्ठा पावले. शहाआलमचे व दिलेरखानाचे तर उघड वितुष्ट होते. सारांश, दिलेरखानासारख्या एकनिष्ठ व हुशार सरदारास अपेष्टा चुकविण्यासाठी विषप्राशन करावे लागले हाच प्रकार त्या बादशहाच्या नेकीवर उत्कृष्ट टीका होय. अशा दुर्नितिने मोगल बादशाही बुडाली.

8) बादशहाशी दुसरा निकराचा सामना (सन 1683-85) :-

एक वर्षाच्या मोहिमेत काहीच लभ्यांश झाला नाही असे पाहून बादशहाचे मनास अत्यंत उद्वेग उत्पन्न झाला. सन 1683 च्या पावसाळ्यात त्याने आपले सरदार समक्ष वाटाघाटीसाठी औरंगाबाद येथे जवळ बोलावले हे वर सांगितलेच आहे. प्रथम त्याने रूष्ट सरदारांच्या व कुचराई करणाऱ्या पुत्रांच्या समजुती काढल्या आणि एकंदर मोहिमेची पुन्हा एक नवीन व्यवस्था ठरवून प्रत्येकाचे कार्यभाग नीट वाटून दिले. पोर्तुगिझांकडून पश्चिम किनाऱ्याने बादशहाचे साह्य होत असे ते तोडण्यासाठी संभाजीने चौल व गोवे याजवर चाल केली. शिवाय अकबराचाही उद्योग गोव्याचेबाजूने परदेशी जाण्याचा दिसल्यावरून यावेळी बादशहाची मुख्य मोहीम कल्याणचे बाजूस उत्तर कोकणात न होता सावंतवाडीचे बाजूस दक्षिण कोकणात झाली. त्या बाजूस संभाजीराजांचा कोंडमारा करून त्यास घेरून घ्यावे असा विचार बादशहाने ठरवून 15 सप्टेंबरचे सुमारास वडिलपुत्र शहाआलम यास पूर्ण तयारीनिशी दक्षिणेस रवाना केले आणि स्वत: त्यांचा पाठपुरावा करण्यासाठी आणखी दक्षिणेस अहमदनगर येथे नोव्हेंबर महिन्यात आपला मुक्काम केला.

पोर्तुगीझ व सावंत, संभाजीराजांवर उठले असताना त्याच संधीत उत्तरेकडून त्याजवर शहाआलम रामघाटाने कोकणात उतरण्यासाठी निघाला. दुसरी फौज घेऊन शियाबुद्दिनखान पुण्यावर चालून गेला. त्याने खाली कोकणात उतरून निजामपूर लुटले (ता.27.12.1683). औरंगजेबाचा पुत्र अजमशहा यास त्याने नासिकच्या बाजूस बागलाण-खानदेशकडून अकबरावर नजर ठेवण्यासाठी पाठवले. विजापूर-गोवळकोंडा राज्यांची मदत संभाजीस येईल तर ती बंद करण्यासाठी बादशहाने त्या बाजूस खानजहान यास नेमले. तसेच त्याने गोवेकरांसही आश्वासन दिले की, ‘तुम्ही संभाजीराजांशी कसून युद्ध करा, आमची फौज तुमचे मदतीस येत आहे.’ शहाआलमच्या फौजेस धान्य, दारूगोळा वगैरे लागेल ते सामान पुरविण्याची जबाबदारी पोर्तुगिझांनी पत्करली. कदाचित शहाआलमचा निभाव न लागला तर त्यास लगोलग मदत पोहोचविण्यासाठी दुसरा हुशार सरदार हसनअलीखान म्हणून होता, त्यास बहादूरगडाहून बादशहाने रवाना केले. तोही

बेळगावच्या अलिकडे येऊन शहाआलम यास सामील झाला. हसनअलीचे आघाडीवर रणमस्तखान व दाउदखान खुरेशी हे दोन नामांकित शूर सरदार बादशहाने नेमून दिले होते. म्हणजे कोणीकडूनही आता संभाजीराजांस निसटून जाण्यास बिलकूल अवकाश मिळू नये अशी कडेकोट तयारी करण्यात आली. रणमस्तखान व दाउदखान यांनी शहापूर संपगाव वगैरे संभाजीची ठाणी हस्तगत करून लूटही पुष्कळ पैदा केली. सन 1683 च्या डिसेंबरात शहाआलम रामघाटाने खाली सावंतवाडीचे प्रदेशात उतरला. डोंगराळ प्रदेशातून मार्ग काढताना त्याच्या सैन्यास अतोनात अडचणी सोसाव्या लागल्या. वर घाटाचे तोंडाशी हसनअली मुक्काम करून बंदोबस्तास राहिला. संभाजीराजे त्यावेळी थेट गोव्यावर चालून गेला होता. म्हणून घाटातच मोगलास अडविण्यास तो परत येऊ शकला नाही. शहाआलम चालून आल्याची खबर लागताच त्याने पोर्तुगिझांशी लढणे थांबवले. तेही इतके जेरीस आले होते की, संभाजीराजांशी त्यांचा समेट जुळण्यास विलंब लागला नाही. हे समेटाचे काम कलुशाकडे सोपवून संभाजीराजे गोव्याचा वेढा लगबगीने उठवून शहाआलमचे मुकाबल्यास त्वरेने परत आले. उभयतांची एक जंगी लढाई होऊन असंख्य लोक प्राणास मुकले, पण त्या योगाने निकाल लागला नाही. ता.13.12.1683 रोजी संभाजीराजे प्रथम रायगडाकडे परत फिरले. बहुधा शियाबुद्दिनखान रायगडावर जाईल अशी धास्ती त्यांस वाटली असावी. शहाआलम मात्र संभाजीराजांस अडवू शकला नाही. यावेळी अकबर डिचोली येथे मुक्काम करून होता. ता. 15.1.1684 रोजी साठ हजार पायदळ, चाळीस हजार स्वार, वीस हजार उंट व 1900 हत्ती अशी फौज घेऊन शहाआलम डिचोलीवर चालून आला. तीन दिवसांनी मोगलांची 120 गलबते वरील फौजेसाठी धान्य सामुग्री घेऊन गोव्यास दाखल झाली. परंतु संभाजीराजांच्या धास्तीने गोवेकरांनी हे साहित्य शहाआलमास मिळू दिले नाही. त्यांनी शहाजाद्यास कळविले, 'आम्ही तुम्हास धान्य पोहोचविले तर संभाजी आमचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाही.' शहाजाद्यास आपल्या शक्तीची एवढी घमेंड वाटत होती की वरील उत्तराने तो अत्यंत चिडून गेला आणि पोर्तुगीज प्रदेशाची नासधूस करू लागला. हा आता प्रत्यक्ष गोवेसुद्धा हस्तगत करतो अशी अल्पकाळ लोकांची समजूत झाली. त्याने चवताळून संभाजीराजांची स्थळे कुडाळ, बांदा, डिचोली, मालवण ही जाळली आणि वेंगुर्ल्याचे व्यापारी बंदर लुटले. पण इतउत्तर त्यास नाइलाजाने माघारच घ्यावी लागली. अकबर पळून फोंड्यास गेला.

शहाआलमची फौज फार मोठी होती व सुरतेहून गलबतांनी आणलेले धान्य त्यास मिळाले नाही. म्हणून त्याचे अतिशय हाल होऊ लागले. संभाजीराजांची नजर चहूकडे सारखी फिरकत होती. ता. 3.1.1684 रोजी त्याने वाईच्या देशमुखास खालील पत्र लिहिलेले आढळते. 'सुलतान माजम व शबदीखान गनीम दोहीकडून कोकणात उतरला. याप्रसंगी हशमांचे बहुतच प्रयोजन आहे. याकरिता संताजी येसाजी यांस नौसंचणी हशमाचा जमाव करावयाबद्दल वरघाटे पाठवले असे. हे सांगतील तिहे प्रमाणे हशमाची

नौसंचणी करून पाठवून देणे. तुम्हासंगे हशमाचा पोख्ता जमाव झाला तरी गनिमाचा काय गुमान लागला, बुडविलाच जातो. आजीवरी स्वामीने तुमचे चालविले ते सार्थक या दिवसात करून आपला मजुरा करून घेणे, म्हणजे स्वामी तुम्हावरी संतोषी होतील. आपले समाधान असो देणे.

या आज्ञेप्रमाणे हशम जमा होऊन मोगलांचा बराच प्रतिकार झाला. मार्च महिना येऊन उन्हाळा सुरु झाला. शियाबुद्दिनखान रायगडाकडे गेला होता तो संभाजीराजांचा प्रदेश उद्ध्वस्त करीत शहाजाद्यास मिळण्यासाठी दक्षिणेकडे चालला. पण संभाजीराजांनी त्यांची गाठ पडू दिली नाही. शहाजाद्याच्या फौजेतील माणसे व जनावरे अन्नाविणे तडफडून मरू लागली. जंजिऱ्याच्या सिद्दिने काही थोडे धान्य पोहोचवले ते कितीसे पुरणार! तेव्हा शहाजादा परत फिरून रामघाटाने वर येऊ लागला, त्यावेळी त्या अडचणीच्या जंगलात मरीचा रोग उत्पन्न होऊन त्याचे तिसरा हिस्सा लोक मृत्युमुखी पडले. घोडे, उंट, हत्ती वगैरे जनावरे तर इतकी मेली की दुर्गंधीने सर्व प्रदेश दूषित होऊन लोक गुदमरून गेले. जनावरे मेल्यामुळे सर्वांनाच पायी चालण्याची पाळी आली. उन्हाने व तहानेने लोकांवर प्रेतकळा आली. एप्रिलात पुत्राची ही वाताहत बादशहास कळली. तेव्हा लगेच त्याने रुहुल्लाखानाबरोबर नवीन सरंजाम पाठवला. तो आल्यावर लोक हलके-हलके घाट चढून वर आले. मोगलांची ही दुर्दशा पाहून संभाजीराजांच्या लोकांनी चोरटे हल्ले करून त्यांच्या विपत्ती वाढविण्यास कसूर केली नाही. अशाप्रकारे भयंकर हाल सोसून, पदरात नामुष्की घेऊन आणि होते नव्हते ते सर्व गमावून बादशहाचा हा युवराज ता. 18.5.1684 रोजी अहमदनगरास पित्याजवळ दाखल झाला. मिळून एवढ्या मिन्नतवारीने केलेल्या प्रचंड तयारीपासून एक वर्षात संभाजीची काही थोडी गावे जाळण्यापलिकडे बादशहास जास्त काही करता आले नाही.

संभाजीराजांपुढे आपला इलाज चालत नाही असे पाहून बादशहा फार नाराज झाला. या साली अत्यंत कडेकोट तयारीने चहूकडून मोगल फौजा संभाजीराजांचे राज्यात घुसल्या असता महत्त्वाचा विजय असा त्यास एकही मिळाला नाही. एकदा कोकणात संभाजीराजांचे काही प्रमुख सेनानायक व लोक मिळून 112 इसम मोगलास हस्तगत झाले, त्यांची बादशहाने साफ कत्तल उडविली. इतका तो चिडून गेला होता. युद्धात पाडाव झालेल्या कैदी लोकांस विशेष कारणाशिवाय ठार मारण्याचा रिवाज कोठेच नसतो. अशारीतीने संभाजी व अकबर आपापल्यापरी युद्धात करीत असताना बादशहा एवढा मोठा घोळका बरोबर घेऊन महाराष्ट्रात बसल्याने त्याचा खर्च फार वाढला, सर्व मुलुख बेचिराख झाला. त्याचा बोजही दिवसेंदिवस जात चालला. तेव्हा निदान खर्च तरी परभारे निघावा अशा हेतूने महाराष्ट्रातून आपले लक्ष तूर्त काढून त्याने विजापूर व गोवळकोंडा ही राज्ये काबीज करण्याचा विचार ठरवला.

प्रकरण 3
घसरपट्टी

1.अकबराचे भग्न मनोरथ; 2.दुर्गादासाचे उत्तरचरित्र; 3. संभाजीराजांचे बाह्य प्रदेशात आक्रमण; 4.विजापूर-गोवळकोंड्याचा पाडाव; 5.हंबीररावाचा मृत्यु, हीनावस्था; 6.मातब्बरखान, कल्याण व उत्तर कोकण; 7.हरजी राजाचा कर्नाटकातील उद्योग.

1) अकबराचे भग्न मनोरथ (सन 1683-88) :-

शहाजादा अकबर व त्याचा साथीदार दुर्गादास केवढ्या उमेदीने संभाजीराजांकडे आले हे मागे सांगितलेच आहे. मनुष्य जोडण्याची कला व परिस्थिती ओळखण्याचे चातुर्य जर संभाजीराजांना असते तर औरंगजेबावर मात करण्यास ही उत्कृष्ट संधी आली होती. दुर्गादासाच्या अनुपम स्वार्थत्यागाने सर्व राजपुतांचे सामर्थ्य त्यास उपलब्ध झाले होते. दक्षिणेत असतानासुद्धा बादशहाचे दरबारातील वाटाघाटींची व घडामोडींची खडान्खडा बातमी अकबरास कळत होती. त्याची सख्खी बहीण झीनतुन्निसा बेगम बादशहाजवळ मुखत्यारीने वागत असून उभयतांची समजूत करून गोडी करून देण्याचा तिचा प्रयत्न अखेरपर्यंत सारखा चालू होता. शिवाजीराजे व संभाजीराजे यांजबद्दल ज्या बेगमेला आस्था वाटत होती, ती हीच होय आणि हिनेच पुढे संभाजीराजांच्या वधानंतर येसूबाई व शाहू यांचा परामर्ष घेतला. या बेगमेचा व अकबराचा अंतस्थ पत्रव्यवहार असून त्यातले थोडे बहुत तात्पर्य संभाजीराजांना कळत होते. असे असताना त्याजकडून शहाजाद्याला पाठबळ मिळाले नाही. उलट बादशहाचे उद्योग सफल होत गेले. लवकरच अकबराला कळून चुकले की, आपण शिवाजीपुत्राच्या आश्रयास येऊन फसलो, मात्र. अडचणीच्या जागेत येऊन पडल्यामुळे बापाच्या तावडीतून निसटून जाण्याचा मार्गही त्यास मोकळा राहिला नाही. उत्तर हिंदकडे जाण्याचे सर्व मार्ग बादशहाने रोखून धरले होते, तेव्हा एक तर कोकणातील दुर्गम प्रदेशात कुचंबून मरावे किंवा जलमार्गाने इराणाकडे पळून जावे याशिवाय दुसरा मार्गच उरला नाही. सुमद्रातून जाण्यात सुद्धा सिद्दी व पोर्तुगीझ हे बऱ्याच अंशी बादशहाचे कार्यकर्ते होते. अर्थात ते आपणास पकडून बापाच्या हवाली करतील ही

मोठी भीती अकबरास होती. तथापि तेच साहस त्याने पत्करले. पण ते सिद्धीस जाण्यास तीन-चार वर्षे का लागली, ते आता सांगितले पाहिजे.

उदेपूर, जोधपूर व इतर ठिकाणचे राजपूत राजे औरंगजेबाच्या धर्मच्छलास इतके त्रासले होते की ते केवळ अकबर उत्तरेत केव्हा जातो याची वाट पाहत होते. पूर्वीच हा बेत सिद्धीस जायचा, पण औरंगजेबाच्या कपटविद्येने आपण फसून शहाजाद्यास फशी पाडले याजबद्दल त्यांना अत्यंत खेद वाटू लागला. ही गोष्ट अकबरास दक्षिणेत आल्यावर कळली आणि त्याने कसेतरी एकदा उत्तरेत निघून जावे, अशी सूचना ते करू लागले. त्यासाठी एकदा कोठेतरी बादशहाची चांगली खोड मोडली पाहिजे असे अकबराने मनात घेतले आणि त्यासाठी त्याने संभाजीराजांस वारंवार सुचविले की जुन्नर, अहमदनगर, औरंगाबाद अगर बऱ्हाणपूर अशा एखाद्या महत्त्वाच्या स्थळावर एकदम मोठ्या फौजेनिशी जोराने हल्ला करून ते हस्तगत केले की डाव लगेच उलटेल. सबब, इतर हलक्या गोष्टी बाजूस ठेवून एकदम मोठ्या प्रकरणास हात घाला असा त्याचा संभाजीराजांना आग्रह होता. म्हणजे शिवाजीने ज्याप्रमाणे शायिस्ताखानाने कैक वर्षे चालविलेला डाव मोठ्या कल्पकतेने परत त्याच्या अंगावर उलटून दिला, तशापैकी अचाट कृत्य करण्याची ही शहाजाद्याची सूचना होती. पण असे साहसी कृत्य सिद्धीस नेण्याचे सामर्थ्य संभाजीराजांत नव्हते आणि त्यांनी ते अंगावर घेतलेच नाही. बादशहाचा एक सडकून पराभव झाला की उत्तरेची वाट मोकळी होऊन दिल्लीचे तख्त मिळण्यास विलंब नाही असा अकबराचा तर्क होता. आपण एकत्र बसून शांतपणे सर्व गोष्टींचा विचार करू या असे त्याने संभाजीला कळवले, पण ते त्याने बिलकूल मनावर घेतले नाही. दिल्लीच्या ऐष आरामात बादशहाचा 'प्यार' म्हणून वाढलेला हा पंचविशीचा तरुण शहाजादा गवताच्या जंगली झोपडीत राहून अगदी वैतागून गेला. खाणेपिणे सुद्धा त्यास त्या भिकार कोकणात काय मिळणार! बिचारा एकटा प्राणी वनवासात पडलेला. बायकामुले तर बापाने दूर अडकवून ठेवली होती. येथे त्यास संगत काय! तर टीचभर लंगोटी लावलेल्या नोकरांची. नाही आपली भाषा, की पोषाख की धर्म; मग ना गाणे- ना बजावणे ऐषआराम वगैरे चैनीचे तर नावच नको. अशा संकटमय स्थितीस तो अगदी कंटाळून गेला असला तर नवल नाही. येऊन जाऊन त्याला समाधान काय ते कलुशाकडूनच थोडेसे मिळे. दोघेही उत्तरेत वागलेले, एकमेकांशी समक्ष बोलू शकत. कलुशा सुद्धा एकपरी अकबरासारखाच परदेशात वनवासी होता. त्याच्या हालचालींवर संभाजीराजांची नजर कडक असे. अशा स्थितीत त्यांना ही आशा होती की हा 'अकबर बादशहा होईल तर आपणास त्याकडून मोठी बढती मिळेल.' उलटपक्षी संभाजीराजांस वाटे की महाराष्ट्राचा सुरक्षित डोंगराळ प्रदेश सोडून मुद्दाम दूरच्या उघड्या प्रदेशात बादशहाशी सामना करण्याचे साहस अंगावर का घ्या? जर का आपला पराभव झाला तर महाराष्ट्रही हातचे जाऊन प्राणास मात्र मुकण्याची पाळी येणार! अकबराने मुद्दाम खुलासेवार पत्र लिहून संभाजीराजांस कळवले, 'हे कविजी आपणास उत्कृष्ट व विश्वासू

गृहस्थ लाभले आहेत. त्याला कोणाची दृष्ट न लागो म्हणजे झाले. त्यांचा आपण उत्तम पाठपुरावा करा, म्हणजे आपले मनोरथ सर्व सिद्धीस जातील.' अशा स्तुतीमुळे संभाजीराजांचे मन मात्र कलुशाबद्दल जास्तच साशंक होऊ लागले. स्वत:चा निश्चय करण्याची पात्रता अंगी नसली की असे प्रकार घडतात. अकबराचा थोडासा पत्रव्यवहार 'मॉडर्न रिव्ह्यू'त सर जदुनाथांनी प्रसिद्ध केलेला, वाचण्यालायक असून त्यावरून त्याच्या परिस्थितीची अटकळ होते.

'कवि कलश यास, 13 मार्च 1682 रोजी मी जैतापुरास पोहोचलो. पत्र पावताच तुम्ही येऊन मला भेटा. शत्रू नजीक येत आहेत. कोण वेळेस काय होईल याचा नेम नाही.'

त्यानंतरचे कवि कलश यास पत्र- 'तुमचे पत्र पोचून मजकूर कळला. पाचाड येथे तुम्ही आल्याचे समजले. मोगलांशी तह करण्यास माझी हरकत नाही. परंतु तह करावा असे मला वाटत नाही. तुमच्या भेटीची जरूर आहे. पुष्कळ राजकारणे ठरविता येतील. ही राजकारणे पावसाळ्यातच केली पाहिजेत. तह होत आहे असे समजून स्वस्थ बसू नका. पावसाळा संपल्यावर भीमगडचे काम हाती घ्यावे. नीट विचार करून काय करणे ते करा.' - ता. 18 ऑगस्ट 1682.

त्यापुढचे पत्र- 'तुमची प्रकृति बरी नाही हे कळले. तह करणे किंवा न करणे हे केवळ संभाजीच्या व तुमच्या मर्जीवर आहे. परंतु तहाच्या बोलण्यावर विश्वास ठेवून स्वस्थ बसणे मात्र योग्य नाही. विजापूरच्या कामाचे काय झाले ते कळवावे.' - 11 सप्टेंबर 1682.

पुढील पत्र संभाजीराजांस आहे ते असे :-

'कवि कलश हे तुमचे फार उत्कृष्ट व विश्वासू नोकर आहेत. त्यांजबद्दल तुमच्या इतर प्रधानांस वैषम्य न वाटो म्हणजे झाले. काही झाले तरी तुम्ही त्यांचे संरक्षण केले पाहिजे. तुमच्या लिहिण्यावरून तुम्ही हल्ली खेळणा किल्ल्याकडे गेला आहात असे मी समजतो. तुमची इच्छा असेल तर मीही तुम्हास येऊन मिळतो.'

कवि कलश यास पत्र- 'तुमची दोन पत्रे पोचली. 2 जानेवारी 1683 रोजी तुम्ही माझ्या भेटीस येणार म्हणून लिहिले ते कळले. आमच्या शास्त्राप्रमाणे हे दिवस 'अशूरा' असून भेटीस योग्य नाहीत. पुढे कोणता तरी दिवस नेमून लिहून पाठवा, म्हणजे त्या दिवशी मी साखरप्याहून निघून मलकापुरास येतो. पत्रोत्तर ताबडतोब पाठवावे.'

आणखी एक पत्र- 'तुमचे पत्र पोहोचले. 1 जानेवारीस ग्रहणाचे स्नानासाठी तुम्ही कोल्हापुरास जाणार असून 16/17 तारखेला मलकापुरात येऊन मला भेटा म्हणून लिहिले ते समजले. मीही साखरप्याहून निघून त्या सुमारास तेथे येतो. तुम्ही तेथे येऊन भेटण्यास चुकू नये. नंतर तेथून तुम्हास कोल्हापुरास जाता येईल. कळावे.'

अशा रीतीने अकबर व संभाजी यांचे व्यवहार चालू होते. त्यात संभाजीने तरी मुद्दाम अकबरास तोंडघशी पाडले अशातला भाग नाही. अकबराची विचारसरणी त्याला पटे आणि तदनुसार बाहेर वारंवार भूमका उठत की आता अकबर व संभाजी सुरतेवर चालून

जाणार. लागोपाठ दोन-तीन वर्षे ही दहशत सुरतेच्या इंग्रजांस पडलेली आढळते. पण काही-ना-काही कारणाने संभाजीने अशी एखादी मोठी स्वारी हाती घेतली नाही ही गोष्ट खरी. शिवाजीसारखी काही अद्भूत करामत संभाजीचे अंगी असेल अशा उमेदीने अकबर इकडे आला पण त्यात त्याची मोठी निराशा झाली.

दीड वर्ष मोठ्या संकटात काढल्यावर अकबर अगदी त्रासून गेला. संभाजी त्याच्यासाठी काहीच हालचाल करीना! तेव्हा महाराष्ट्र सोडण्याचा निश्चय करून तो सन 1682 च्या डिसेंबरात बरोबर जे काय राठोड सोबती होते ते घेऊन बाहेर पडला. प्रथम त्याचा विचार गोवळकोंड्याच्या शहाकडे जाण्याचा होता. पण तिकडून त्यास अडविण्यास फौज आल्याचे कळताच तो दक्षिणेस सावंतवाडीच्या हद्दीत बांदा येथे गेला. तेथून त्याने आपला एक विश्वासू कामदार रहीमखान यास बरोबर नजराणे वगैरे देऊन गोव्याच्या गव्हर्नराकडे पाठविले आणि विनंती केली की आपण आम्हास मंगलोरहून आपल्या जहाजातून अरबस्तानात पोहोचवून द्यावे. त्यावर पोर्तुगीझ अंमलदाराने त्यास पाच हजाराचा परवाना देऊन मंगलोरास जाण्याची सिद्धता करून दिली. (3.2.1683). परंतु बादशहाचा वकील शेख महंमद म्हणून गोव्यात होता त्याने मोगल आरमाराचा नाविक जंजिऱ्याचा सिद्दी यास ताबडतोब कळवून दिले की, ‘शहाजादा असा पळून जात आहे, त्यास पकडून परत आणा.’ त्याचप्रमाणे सिद्दी याकूत मार्च-एप्रिलात आपली जहाजे घेऊन राजापुरास आला आणि शहाजाद्याचे पाळतीवर राहिला. तेव्हा स्वत:च्या खासगी महागिरीतून निघून जाणे त्यास धोक्याचे वाटून शहाजाद्याने पुन्हा गोव्याचे सरकारास विनंती केली की ‘तुम्ही आपल्या व्यापारी जहाजातून मक्केचा यात्रेकरू म्हणून मला पोहोचवून द्या.’ ही गोष्ट अर्थातच पोर्तुगीझ अधिकाऱ्याने अमान्य केली कारण बादशहाचे गुन्हेगारास पळवून लावल्याबद्दल बादशहाने त्यास शिक्षा केली असती. अशा रीतीने शहाजाद्याचा नाइलाज झाला. तेव्हा त्याने बिचोलीस जाऊन डच अधिकाऱ्याची भेट घेतली. (सप्टेंबर 1683). पण त्यातही काही निष्पन्न झाले नाही. बिचोली व डिचोली ही नावे एकाच स्थळाची होत. ते संभाजीराजांचे ताब्यात होते.

अशा रीतीने आणखी एक वर्ष फुकट गेले आणि बाहेरची मदत मिळत नाही अशी अकबराची खात्री झाली. तेव्हा त्याने स्वत:च एक जहाज दुसऱ्याच्या नावाने खरेदी करून त्याला बाहेर जाण्याला सुरतेचा परवाना मिळविला. ते जहाज राजापुरास पोहोचले. शहाजादाही तेथे गेला. पण पाहतो तो ते एक लहानसे होडगे असून भर समुद्रातून दोन हजार मैलांचा प्रवास करण्याच्या योग्यतेचे आहे असे त्यास वाटले नाही. म्हणून ते त्याने रद्द केले. नंतर तो पुन्हा बिचोलीस जाऊन राहिला. तेथे त्याने स्वत:चे घर बांधले. संभाजीराजांची सुद्धा तेथे रहण्याची एक इमारत होती. काही काळ तेथे राहिल्यावर संभाजीराजांनी त्यास खास वचन दिले की ‘आपण दोघेही मोठी फौज घेऊन बादशहावर चालून जाऊ.’ त्याबद्दल शहाजाद्याने स्वत:चे थोडेबहुत जवाहीरही संभाजीराजांस दिले.

परंतु त्यावेळी संभाजीराजांचे पोर्तुगिझांशी युद्ध चालू होते म्हणून त्यास तेथून निघता येईना. तेव्हा 'या राजाने नुसत्या थापा देऊन आपणास साफ फसविले,' असे शहाजाद्यास दिसून आले. यास्तव अत्यंत वैतागून ता. 8 नोव्हेंबरच्या सुमारास वेंगुर्ल्यास एक जहाज खरेदी करून तो स्वत:च बाहेर निघाला. ते जहाज हाकारणार इतक्यात कवि कलश व दुर्गादास त्यास येऊन जहाजावर भेटले. त्यांनी त्यास गळ घातली की, 'तुम्ही असे विना आश्रय निघून जाऊ नका. संभाजी महाराजांचा खरोखर निश्चय झाला आहे की 'आता लगेच बादशहावर चालून जायचे.' त्यांनीच आम्हांस तुमच्याकडे पाठविले आहे. एकदा आपणास युद्धात जय मिळाल्यावर मग आपण पाहिजे तिकडे मर्जीप्रमाणे जा. परंतु आता असे एकाकी जाऊ नका.' इतका आग्रह पाहून शहाजादा जहाजावरून उतरून वेंगुर्ल्यात येऊन राहिला.

याच संधीत अकबराचे काही नोकर एका होडीत सामान भरून नेत होते त्यांस सिद्दी याकूतने पकडून कैद केले. इकडे पोर्तुगीझ गव्हर्नराने संभाजीराजांच्या फोंडा किल्ल्यास वेढा घातला होता, तो संभाजीराजांच्या माऱ्यापुढे त्यास उठवावा लागला (1 नोव्हेंबर). लगेच पुढे जाऊन संभाजीराजांनी पोर्तुगिझांचा काही प्रदेश हस्तगत केला, इतक्यात बातमी आली की 'बादशहाचा वडिलपुत्र शहाआलम मोठ्या फौजेनिशी आपल्यावर चालून येतो आहे, त्याबरोबर संभाजीराजांनी अकबरास मध्यस्थीस घालून कवि कलशाचे मार्फत घाईघाईने पोर्तुगिझांशी तह उरकून घेतला. (20.1.1684). नंतर अकबर व कवि कलश जैतापुरावरून 20 फेब्रुवारीस मलकापुरास आले. यापुढील एक वर्ष शहाजाद्याने मलकापूर, साखरपे या ठिकाणी काढले. कवि कलश त्यास येथे वारंवार येऊन भेटे. मलकापुरास कवि कलशाची पागा ठेवलेली होती. विशाळगड, संगमेश्वर पावेतो तो वारंवार जात येत असे. त्याची व शहाजाद्याची एकत्र बोलणी होत, परंतु एखादे साहस अंगावर घेण्याची सूचना कलुशाने संभाजीराजांस केली तरी ती त्याला मान्य होई असे नाही. असा तर्क होतो की काही विशिष्ट बाबतींपलिकडे संभाजीराजे कवि कलशाचे सांगण्यास बिलकूल मान देत नसे. जितका तो जास्त आग्रह करी तितका संभाजीराजांस जास्त संशय येई. शहाजाद्याला संभाजीराजांकडून काही सुद्धा साह्य झाले नाही. खर्चही बहुतेक तो आपला आपणच चालवीत असे. या ठिकाणी असताना त्याची समजूत घालून त्यास घेऊन जाण्यासाठी औरंगजेबाकडून माणसांवर माणसे आली. 'तुमचे सर्व अपराध माफ करून पुन्हा पूर्वीप्रमाणे कृपा करू' असे बापाने काकुळतीस येऊन त्यास अनेकवार कळवले, पण पुत्राचा विश्वास बापावर मुळीच बसला नाही. बापास पदच्युत केल्याचा जाहीरनामा काढून, नाही-नाही तसली तिखट पत्रे त्याने लिहिली ही गोष्ट बापाचे अंत:करणातून कधी जाणारी नव्हती. अकबराने आपल्या एका विश्वासू नोकराबरोबर ता. 12.4.1685 रोजी दोन सुंदर घोडे बापाला नजर म्हणून पाठविले. पण बादशहाने त्या नोकराची भेट देखील घेतली नाही. सन 1684 च्या अखेरीस इंग्रज व्यापाऱ्यांकडून एक अशी वदंता उठली की

अकबर व संभाजी पंचवीस हजार स्वारांनिशी सुरतेवर चालून जात आहेत. पण पुढे ती वदंताच ठरली. तरीन नावाचा बादशहाचा एक अफगाण सेनापती अहमदनगर येथे लष्करात भरतीसाठी लोक जमवून ते तो गुप्त रीतीने अकबराकडे रवाना करी. हा प्रकार बादशहास कळताच त्याने तरीनला देहान्त शिक्षा केली (जानेवारी सन 1685). अब्दुश्शकूर नावाचा एक बादशहाने काढून लावलेला सेनानी दोनशे उझबेक शिपाई जमवून अकबरास मिळाला. असे प्रकार चालूच होते. गुजरातच्या मार्गाने आगऱ्यास प्रयाण करण्याची तयारी अकबराने केली आहे अशी बातमी औरंगजेबास लागली तेव्हा त्याने ता. 20.7.1685 रोजी अहमदाबादचा सुभेदार करतलबखान यास हुकूम पाठविला की, 'अकबर त्या बाजूस आढळल्यास एकदम पकडून घ्यावा. बिलकूल हयगय करू नये.'

सुरत भडोचच्या बाजूने गुजरातेतून राजपुतान्यात जाण्याचे अकबराचे प्रयत्न कसोशीने चालले होते, म्हणूनच बादशहास त्याची एवढी मोठी धास्ती पडली. सन 1685 च्या आरंभी औरंगजेबाच्या फौजा विजापूरवर चालून गेल्या असे पाहून अकबर व संभाजीराजे यांनी एकवार भडोचकडे जाण्याचे साहस केले. उत्तर हिंदुस्थानात प्रवेश झाल्यास ठीकच, नाही तर निदान सुरतेहून इंग्रजांचे जहाजांच्या आश्रयाने मक्केस अगर इराणात जावे असा हा अकबराचा प्रयत्न होता. यासाठी तिकडे आगाऊ लोक पाठवून सिद्धता करण्यात आली. प्रथम भडोच शहरात बंडावा होऊन बंडखोरांनी शहराचा ताबा घेतला आणि तेथे अकबराची द्वाही फिरवली. नंतर सन 1685 च्या ऑक्टोबरात संभाजीराजांनी मोठी फौज घेऊन भडोचवर स्वारी केली आणि तेथून व प्रांतोप्रांती अकबराचे नावाने वसूल घेऊन पुष्कळ संपत्ती लुटून रायगडास आणली. परत येताना बादशहाच्या फौजा त्याचे पाळतीवर होत्या. नासिकजवळ संभाजीराजे येताच त्याची एक टोळी गंगास्नानाचे निमित्ताने दूर जाऊन मोगलांस मिळणार होती. संभाजीराजांना त्याची बातमी लागून त्याने दुसरी एक टोळी गंगास्नानाचे निमित्ताने पहिलीवर पाठवली. या दुसऱ्या लोकांनी पहिल्या मंडळींशी स्नेह दाखवून त्याजवर एकाएकी हल्ला करून त्यांचा फडशा उडविला. संभाजीराजे परत आल्यावर मग अकबर बापाच्या फौजांस चुकवून गुजरातेत जाण्यास निघाला. परंतु त्याच्या हालचालींची सर्व सूक्ष्म बातमी औरंगजेबास लागून त्याने मऱ्हामतखान अहमदनगरास होता त्यास ताबडतोब अकबरावर रवाना केले. चाकणजवळ त्यांची गाठ पडून अकबर पराभव पावून परत विशाळगडाकडे आला. अशा रीतीने उत्तरेत जाण्याचे त्याचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले. ईश्वरदास नागर म्हणून जो औरंगजेबाजवळ राजपूत सरदार होता, त्याचा व दुर्गादासाचा पत्रव्यवहार असून त्याने आपल्या इतिहासात अकबराच्या हालचालींची हकिकत दिली आहे. तो लिहितो - 'शिरवळच्या ठाणेदाराने बादशहास कळविले की अकबर उत्तर हिंदुस्थानात जाण्याच्या तयारीत आहे. त्यावरून बादशहाने अजमशहास तीस हजार फौज देऊन अहमदनगरच्या बाजूस रवाना केले. त्याने अकबराचा पाठलाग केला. अकबर मोठ्या संकटातून जीव वाचवून साल्हेर येथे पोहोचला. लगेच त्या बाजूस

अजमशहा आला तेव्हा अकबर कोकणात माहुलीस गेला. माहुलीहून तो पळत-पळत पन्हाळ्याचे बाजूस आला असताना पुन्हा त्याची बादशाही फौजेशी लढाई झाली. तेणेकरून उत्तर हिंदुस्थानात राजपुतांच्या आश्रयास जाण्याची अकबराची आशा साफ खुंटली आणि सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांखेरीज बाहेर कोठेही सुरक्षित आश्रयस्थान त्यास राहिले नाही.'

पुढे अकबराचे मन वळवून त्यास जवळ आणण्याचे काम बादशहाने आपली मुलगी झीनतुन्निसा बेगम हिला सांगितले. तिने सय्यद मुहम्मद या गृहस्थाबरोबर अकबरास पत्र पाठवून जबाब मागितला. त्यावर अकबराचे उत्तर आले की, 'मी क्षमेची याचना करतो आणि आपले आश्वासन असल्यास भेटीस येतो.' असा जबाब आल्यावर बादशहाने त्यास सर्व अपराध माफ केल्याचे फर्मान पाठवून ताबडतोब येण्याविषयी लिहिले. परंतु त्याचा काहीएक उपयोग झाला नाही. एक महिन्याने बादशहास बातमी आली की, अकबरास कोठेही अभयस्थान न मिळून तो माहुलीस गेला. तेथे पुन्हा त्याने फौज जमवली आणि शहापुरास जाऊन तेथून जव्हारच्या मार्गाने तो सुरतेस गेला. जव्हारच्या जमीनदाराने त्यास सांगली मदत केली आणि तो दमणला गेला. तेथून पुढे गुजरातेत जाणार, तो अजमशहा त्याचा पुढील मार्ग अडवून बसला, त्यामुळे त्यास पुढे जाता आले नाही. त्यानंतर लवकरच दुर्गादासाने अकबरास एका जहाजातून इराणास रवाना करून दिले आणि तो स्वत: परत जोधपुरास गेला. एका गुप्त पत्रावरून ही बातमी पुढे बादशहास कळली. झियाउद्दिन मुहंमद म्हणून शहाजादा शुजा याच्या पदरचा एक गृहस्थ अकबराजवळ होता तो व आणखी 45 मंडळी बरोबर घेऊन अकबर सन 1687 च्या फेब्रुवारी महिन्यात राजापूर येथे एका इंग्रजी गलबतावर चढला आणि प्रथम मस्कतला जाऊन तेथून प्रवास करीत तो ता. 24.1.1688 राजी इस्फाहान येथे इराणच्या शहापाशी पोचला. त्याने आश्रय देऊन त्यास खुरासानात ठेवले. तेथेच तो पुढे सन 1704 च्या नोव्हेंबरात मरण पावला. हा अकबर व त्याचा दोस्त संभाजी दोघेही अपेशी ठरले!

अकबराचे पुढील वृत्त जरी मराठ्यांशी संबद्ध नाही तरी इराणातून त्याने केव्हा तरी आपल्या बापास पत्र लिहिले ते ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत मननीय असून त्यात औरंगजेबाच्या दक्षिणेतील स्वारीचे दोष चांगले दाखविलेले आहेत. या आपल्या पुत्रास कोणत्या तरी युक्तीने परत आणले पाहिजे, नाही तर हा इराणच्या शहाची मदत घेऊन केव्हा हिंदुस्थानावर स्वारी करील याचा नेम नाही, अशी धास्ती औरंगजेबास एकसारखी वाटत असून पुत्रास आपणाकडे बोलावण्यासाठी त्याने माणसे व पत्रे पुष्कळ पाठवली. त्यात त्याने मुलाची आर्जवे करून आपले प्रेम व्यक्त केले. अशा एका पत्रास खालील जबाब अकबराकडून आला. 'बाबा, तुमचेच उदाहरण मी नेहमी डोळ्यांपुढे ठेवले आहे. इतके चांगले उदाहरण दुसऱ्या कोणाचे सापडणार? ज्या राजपुतांनी अकबर, जहांगीर व शहाजहान यास मनापासून साह्य केले, त्यांचा आश्रय मी केला यात वाईट ते काय केले?

जसवंतसिंग तुमच्या भूलथापांस भुलला नसता तर तुम्ही आज हिंदुस्थानचे बादशहा नसता. असे हे राजपूत लोक आपल्या राज्याचे खांब होते. पूर्वी फौजेत राजपूत शिपाई पाहिजे असले म्हणजे एकाचे ठिकाणी शंभर उमेदवार पुढे येत. हल्ली तुम्ही तीन-तीन वर्षे डांगोरा पिटूनही दहा-पाच माणसे देखील जमा होत नाहीत, हा परिणाम कशाचा? आज तुमचे अंमलदार इतके आहेत, पण एकाची तरी तुमच्यावर खरी भक्ती आहे काय? फौजेतील सर्व लोक दरिद्री झाले आहेत. कोणापाशी हत्यार नाही. एक कवि किंवा ग्रंथकार तुमच्या अमदानीत निपजला नाही. व्यापारी व धनिक म्हणून आहेत त्यांची दिवसाढवळ्या लूट होते, त्यांचे खून पडतात. रयत तर धुळीस मिळाली. विजापूर गोवळकोंडा येथील राज्यांचा दक्षिणेचा प्रदेश जो पूर्वी तुम्हासच अत्यंत संपन्न व स्वर्गतुल्य वाटत होता, तो आता ओसाड, कंगाल व निर्धन बनला आहे. विजापूर औरंगाबाद वगैरे शहरे केवढी धनाढ्य, विस्तृत व शोभिवंत होती, पण तेथे धुळीशिवाय जास्त काय आहे तुम्हीच सांगा. ह्या सर्वांचे कारण काय तर तुमचा परधर्मद्वेष. तुम्ही हिंदूंवर जिझिया बसविला, त्याने लोक सर्व तुमच्यावर उठले, जाळपोळ व लूट करू लागले, त्यानेच देश धुळीस मिळाला.

‘तुमच्या राज्यात एक तरी प्रकार असा आहे काय की ज्याची मला तारीफ करता येईल. थोर-थोर पुरातन घराणी सर्व नामशेष झाली. सर्वच लुच्चांचा बाजार भरला आहे. सगळा राज्यकारभार हलकट लोकांच्या हातात आहे. हातात जपमाळ, काखेत कुराण आणि डोक्यास मोठेसे पागोटे असले म्हणजे त्यावर तुमचा पूर्ण भरवसा. अशी मंडळी तुमच्या राज्याचे आधारस्तंभ!

‘असा सर्व राज्यांचा नाश झालेला मला पाहवेना, तेव्हा अत्यंत कष्टाने मी देशत्याग करून इकडे आलो. आता मी शांत आहे. परमेश्वर तुम्हाला दीर्घायुष्य देवो. मीच परत येऊन राज्य करावे म्हणता, तरी तुम्ही राज्य सोडून मक्केस चालते व्हा, म्हणजे मी येऊन दाखवितो कसे राज्य करावयाचे ते. आजपर्यंत काय करामत होती, ती सर्व तुम्ही करून दाखवलीत. आता वृद्धापकाळी परमार्थसाधनच तुम्हास योग्य आहे. जास्त लिहून तुम्हास त्रास होईल म्हणून पत्र पुरे करतो.

2) दुर्गादासाचे उत्तर चरित्र :-

दुर्गादासाने अकबरास बिलकूल अंतर दिले नाही हा त्याचा थोरपणा होय. अकबरास दूरदेशी पोहोचवून दिल्याबरोबर लगेच दुर्गादास परत मारवाडात गेला आणि तेथे त्याने बादशहाशी जास्तच निकराचा झगडा चालविला. बुंदीचा शूर सरदार दुर्जनसाल त्यास सामील झाल्याने राजपुतांचा जोर वाढला. त्यांनी बादशहाच्या सरदारांची त्रेधा उडवून दिली. बादशहाच्या बहुतेक फौजा दक्षिणेत गुंतल्या असल्यामुळे राजपुतांचे तिकडे चांगले

फावले. ‘शुजायतखान’ नावाचा एक हुशार सुभेदार यावेळी गुजरातच्या कारभारावर असून त्याच्याचकडे मारवाडचा कारभार होता. त्याने साम-दामाने वागून मारवाडचा डाव बादशहाचे अंगावर येऊ दिला नाही.

पण मारवाडच्या कारभाराची बादशहास विशेष काळजी वाटण्यास आणखी एक कारण झाले. सन 1681 मध्ये शहाजादा अकबर जेव्हा दुर्गादासासह दक्षिणेत पळून आला, तेव्हा अकबराची दोन अल्पवयी मुले त्याने मागे राठोड सरदारांच्या ताब्यात ठेवून दिली होती. एक मुलगा बुलंद अखतार व मुलगी सखियतुन्निसा. ‘गिरिधर जोशी’ नावाचा दुर्गादासाचा एक विश्वासू नोकर होता त्यास त्याने या मुलांची निगा ठेवण्यास नेमले. त्यांना नुसते सुखरूपच ठेवले असे नव्हे, तर त्यास इस्लामी धर्माचे व इतर योग्य शिक्षण देऊन हुशार करण्याची सर्व काळजी दुर्गादासाने घेतली. परंतु ही आपली नातवंडे आता मोठी झाली, ती आपल्या शत्रूंच्या हातात राहावीत आणि त्यांस आपल्या धर्माचे योग्य शिक्षण मिळू नये याजबद्दल औरंगजेबास दक्षिणेत मोठी खंत वाटू लागली. त्याने शुजायतखानास सारखी टोचणी लावली की, ‘कसेही करून ही दोन मुले सोडवून आमचेकडे पाठवा.’ ईश्वरदास नागर म्हणून एक हुशार गृहस्थ औरंगजेबाजवळ असून त्याचे दुर्गादासाकडे वळण होते. त्याने राजपुतान्यात जाऊन मध्यस्थी करून बादशहाची व दुर्गादासाची गोडी करून दिली. ईश्वरदासानेच त्यावेळचा काही इतिहास लिहून ठेवला आहे.

आपल्या अपराधांची क्षमा करून जोधपूरचे राज्य पूर्ववत चालविण्याचे बादशहाचे लेखी आश्वासन दुर्गादासाने शुजायतखानाचे मार्फत आणविले. अकबराच्या मुलीस घेऊन दुर्गादास शुजायतखानास भेटला. नंतर खानाने तिला ईश्वरदासास बरोबर देऊन दक्षिणेत रवाना केले. बादशहाचा मुक्काम सोलापुराजवळ ब्रह्मपुरी येथे असताना सन 1696 मध्ये ती नात त्यास येऊन भेटली. भेटताक्षणी तिला बादशहाने विचारले, ‘आजपावेतो परधर्मीयांच्या सहवासात राहिल्यामुळे तुला इस्लामी धर्माचे शिक्षण काहीच मिळाले नसेल. तर प्रथम त्या धर्मग्रंथाचा अभ्यास केला पाहिजे.’

त्यावर नात बोलली,

‘दुर्गादासांनी माझी नुसती तबियतच उत्कृष्ट ठेवली इतकेच नाही, तर अजमेरची एक विद्वान मुसलमान शिक्षकीण नेमून त्यांनी मला धर्माचेही शिक्षण पूर्ण दिले आहे. मला सर्व कुराण तोंडपाठ येते.’

हे ऐकून बादशहाला दुर्गादासाच्या हुशारीची धन्यता वाटली आणि त्याने नातीस विचारले, ‘दुर्गादासास याबद्दल काय बक्षीस देऊ ते सांग.’

ती म्हणाली, ‘ईश्वरदासांना विचारा, त्यांनाच सर्व ठाऊक आहे.’ बादशहाने लगेच ईश्वरदासास आत आपल्याकडे बोलावले आणि त्याने सांगितल्याप्रमाणे दुर्गादासास मेडत्याची जागीर व काही नक्त नेमणूक करून दिली. ईश्वरदासासही त्याने बक्षिसे वगैरे देऊन संतुष्ट केले.’

बादशहाचे नातीस मुसलमानी धर्माचे शिक्षण मिळावे म्हणून दुर्गादासाने युद्धाच्या प्रचंड अडचणीच्या काळातही एवढी दक्षता ठेवली! याच्या उलट बादशहाने काय केले पहा. अजितसिंह जन्मास आला तेव्हा दुसरा एक खोटा मुलगा बादशहाने उभा करून 'हाच खरा अजितसिंह' असे त्याने जाहीर केले आणि त्यास मुसलमानी धर्माची दीक्षा देऊन 'मुहंमदीराज' असे त्यास नाव दिले. हेतू असा की अशा रीतीने जोधपूरचे राज्य इस्लामी धर्मात आणावे, परंतु बादशहाचा हा बेत सफल झाला नाही. खरा अजितसिंह मारवाडात जाऊन वाढीस लागला.

'औरंगजेबाची नात परत आली, परंतु नातू आला नाही' याबद्दल त्यास मोठा खेद वाटला. ईश्वरदासास त्याने लगोलग परत पाठवून दुर्गादास व बुलंदअखतार यांस घेऊन येण्याची आज्ञा केली. दुर्गादासाने कळविले, 'प्रथम जोधपूरचे राज्य अजितसिंहाचे हवाली करा म्हणजे मग मी बुलंदअखतार यास बादशहाकडे पाठवितो.' प्रत्यक्ष बादशहाचा नातू आपल्या हातात असून त्याचे नावाने पाहिजे ती उलाढाल करण्याची ताकद दुर्गादासास होती. असली जादू हातातून सहजासहजी सोडण्याइतका दुर्गादास खुळा नव्हता. पुढे या संबंधाची वाटाघाट आणखी वर्ष-दोन वर्षे चालली. इकडे अजितसिंहही मोठा होऊन युद्धास कंटाळून गेला होता. सबब, थोडी बहुत तडजोड करून दुर्गादास बादशहाचे नातवास बरोबर घेऊन अहमदाबाद सुरत वरून ब्रह्मपुरी येथे बादशहाचे भेटीस आला. नातवाची भेट झाली, पण दुर्गादासास मात्र बादशहाने दरवाज्यापाशी आल्यावर सांगितले की, 'तलवार बाहेर ठेवून हात बांधून आत या.' हे ऐकताच दुर्गादासास संताप आला आणि लगेच त्याने तलवार म्यानातून काढली. त्याबरोबर बादशहाने त्यास तलवारी सकट आत येण्याची परवानगी दिली. भेट झाल्यावर बादशहाने दुर्गादासास तीन हजारी मनसब, एक हिरेजडीत कट्यार व एक लाख रुपये बक्षीस देऊन परत जाण्यास रजा दिली. पण एवढ्याने हा झगडा संपला नाही. बादशहाने अजितसिंहास जोधपूरचे राज्य परत दिले नाही, तेव्हा पुन्हा दुर्गादासास घेऊन अजितसिंहाने बादशहाशी झगडा केला आणि स्वपराक्रमाने जोधपूरचे राज्य परत मिळविले, तोच इकडे दक्षिणेत औरंगजेब मृत्यु पावला. जोधपूरचा किल्ला फार वर्षे मुसलमानांचे ताब्यात होता, तो अजितसिंहाने गंगेचे पाणी आणून शुद्ध केला आणि नंतर तेथे त्याने वास्तव्य केले. यापुढचेही अजितसिंहाचे चरित्र मोगल बादशाहीस उपद्रवकारक झाले, तो प्रकार निराळा सांगण्याजोगा आहे. औरंगजेबासारख्या प्रचंड बादशहाशी मारवाडी राजपुतांनी जो पंचवीस वर्षे झगडा केला तो मराठ्यांच्या झगड्यांइतकाच इतिहासात स्मरणीय आहे आणि त्यातही दुर्गादासाचे चरित्र मोठे उज्ज्वल आहे. अद्यापि त्याजबद्दल खालील वचन राजपुतात सर्वांमुखी रूढ आहे -
''ए माता पूत एसा जिन, जेसा दुर्गादास.'

3) बाह्य प्रदेशात संभाजीराजांचे आक्रमण (सन 1684-85) :-

मोगलांच्या पहिल्या चढाईची हकिकत मागे दिली आहे. सन 1684 चा पावसाळा संपताच पुन्हा बादशहाने संभाजीराजांवर मोहीम सुरु केली. ता.21.9.1684 रोजी त्याने शियाबुद्दिनखानास रायगड जिंकण्यास रवाना केले. पुढील जानेवारीत खान बोरघाटातून कोकणात उतरून रायगडाजवळ आला. पाचाड जाळून त्याने पुष्कळ लूट पैदा करून माणसे पकडून घेतली. असा मोठा विजय मिळवून परत आल्याबद्दल बादशहाने खानास 'फिरूजजंग' हा किताब दिला. (ता.26.3.1685). खानाच्या या स्वारीसंबंधाने जेधे शकावलीचे उल्लेख बरेच निराळे आहेत ते असे - 'ज्येष्ठ शुद्ध 15 (18.5.1684) कबजी रायगडास आले. कार्तिक शु. 11 (7.11.1684) कोथळागड मोगलांनी घेतला. शाहबुद्दिन खान पुण्याहून दौंड करून बोरघाटे उतरोन गांगोलीस आला. कविकलशे जाऊन भांडण दिले. फिरोन घाटावरी घातला.'

बादशहाच्या सगळ्या सेनानायकात हा शियाबुद्दिन फिरूजजंग विशेष हुशार व कल्पक होता. मराठ्यांकडील बातम्या व संभाजीराजांची अव्यवस्था त्यास अंतस्थ रीतीने कळत होती, आणि याचा उत्कृष्ट उपयोग त्याने बादशहास करून दिला. त्याने संभाजीचे पुष्कळसे सरदार फितवून आपल्या बाजूस आणले. अशांची कित्येक नावे दिलेली आढळतात. परंतु नुसत्या व्यक्तींच्या नावावरून त्यांच्या कुटुंबांचा बोध होत नाही. बरीचशी मंडळी सन 1685 चे आरंभी संभाजीराजांकडून फुटून येऊन मोगलांस मिळाली. कोडाणा ऊर्फ सिंहगड तानाजी मालुसरे याने घेतल्यापासून मराठ्यांकडे होता. तो सन 1684 चे डिसेंबरात मोगल सरदार अब्दुल कादर याने जिंकून घेतला. मात्र संभाजीराजांच्या फौजा काही स्वस्थ बसल्या नव्हत्या. त्यांनी मोगलांचे राज्यात सारखा धुमाकूळ घातला होता. खानदेशात मुलुखगिरी करून त्यांनी ता. 5.2.1685 रोजी धरणगाव लुटले व त्याचा बराच भाग जाळून टाकला. मराठी फौज काही मोठी नव्हती, पण त्या वेळी औरंगजेबाच्या फौजा सर्व विजापूरावर गेल्यामुळे हा प्रदेश मराठ्यांना मोकळा सापडला, त्याची त्यांनी वाटेल तशी नासाडी केली. इकडे यावेळी संभाजीराजांच्या विरुद्ध बंडावे होऊन तो पदच्युत झाला किंवा मारला गेला, अशा कंड्या सर्व देशात उठल्या त्यांचा निर्देश इंग्रजांच्या पत्रव्यवहारात आढळतो. 'संभाजीराजा व्यसनाधीन होऊन बेफामपणे वागू लागला' असा त्या लोकांचा रोख दिसतो. 'पोर्तुगिझांशी किंवा शहाआलमशी लढण्यात त्याने स्वत: भाग घेतला नाही. हाताखालच्यांनीच काय ते पराक्रम केले' असे ते लेखक म्हणतात, ते सर्वस्वी विश्वसनीय दिसत नाही. संभाजीराजे चहूबाजूस जागरूक राहून बादशहावर प्रहार करीत होते, म्हणूनच औरंगजेबाने त्याचा नाद सोडून विजापूर गोवळकोंड्याकडून संभाजीराजांस मदत पोहोचे ती बंद करण्याकरता तिकडची मोहीम प्रथम हाती घेतली.

सन 1685 च्या आरंभीच हुशार सरदारांचे हाताखाली दहा हजार मराठ्यांची एक टोळी रायगडाहून अशा तडफेने उत्तरेकडे गेली, की बाहेर त्यांचा मागमूस लागण्यापूर्वी बऱ्हाणपूर सुद्धा सातमाता म्हणजे सप्तशृंगाचा मुलुख त्यांनी जाळून लुटून उद्ध्वस्त केला. औरंगजेबाने अहमदनगराहून खानजहानास सहा हजार फौज देऊन पाठलागास पाठविले, परंतु खानजहान व मराठे यांच्यामधले अंतर सहा दिवसांहून कधी कमी पडले नाही. शेवटी बऱ्हाणपुरचे संरक्षणकरता बादशहाने आपला चौथा मुलगा कामबक्ष यास बारा हजार फौजेनिशी पाठविले. मनूची म्हणतो, 'अशा रीतीने संभाजीराजांस जिंकणे तर बाजूसच राहिले; पण उलट संभाजीराजांनीच बादशहास पुरे पुरे केले. बादशहाच्या फौजेस जाणारे धान्य व सामान लुटावे; उंट, घोडे, खेचरे वगैरे जनावरे पकडून न्यावी; जो कोणी पुढे येईल त्यास कापून काढावे; आपल्या उपयोगी असेल ते ठेवून बाकीच्याचा नाश करावा. एखादा मोठासा सरदार कब्जात आला, तर त्याजकडून भला मोठा दंड उकळून मग त्यास सोडावे. अशा रीतीने त्यांजवळ इतके सामान जमे की ते घेऊन जाण्यास अडचण पडे म्हणून ते ठिकठिकाणी मोठेमोठे बाजार भरवून ते सामान विकीत. अशा बाजारात मूळचे मालक किंमत भरून आपला माल सोडवून घेत.' अशाप्रकारे यावेळी निदान सतरा मोठी धनसंपन्न शहरे मराठ्यांनी लुटली.

येणेप्रमाणे तीन वर्षांची सख्त मेहनत फुकट जाऊन बादशहाची पहिली हिंमत पुष्कळच खचली आणि त्याची खात्री झाली की, 'शिवाजीराजांच्या मरणाबरोबर मराठ्यांचे तेज लयास गेले नाही, त्याचा मुलगा पाणीदार आहे, युद्ध करून तो आपल्या हाती लागावयाचा नाही.' तेव्हा बादशहाने आपला मोर्चा विजापूरकडे फिरविला. अर्थात त्यासाठी मोगल फौजेवर दाब ठेवण्याकरता संभाजीराजे पन्हाळा ते विशाळगड यांचे दरम्यान राहू लागले. त्यावेळी बारद्वारी नावाची एक जागा संभाजीने आपणासाठी किल्ल्यावर तयार केली, ती संभाजीराजांची खूण म्हणून अद्यापि तेथे दाखविली जाते.

4) विजापूर-गोवळकोंड्याचा पाडाव (सन 1685-87) :-

औरंगजेब दक्षिणेत आल्यापासून विजापूरच्या मुलखात त्याची फौज उद्योग करीत होतीच. औरंगजेब जितका परधर्माचा तितकाच स्वधर्मी शिया पंथाचा द्वेष करी. त्याच्या हाताखालचे मोठमोठे कामगार व सेनापती शियापंथी होते, तथापि त्या पंथाचा द्वेष त्याच्या मनात अत्यंत होता. 'शियांना मारणारी' असे कित्येक कट्यारींचे त्याने नाव ठेवले होते. पत्रव्यवहारात शियांचा उल्लेख आला तर त्यास एखादी तरी शिवी दिल्याशिवाय तो कधी राहत नसे. त्याच्या हाताखालचे शियापंथी कामदार कसेतरी त्यास फसवून वेळ मारून नेत. विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतान शिया पंथी होते, तेव्हा त्यांचा नाश करायचा हा

धार्मिक मतलब त्याने धारण केला. शेख-उल्-इस्लाम नावाचा एक विद्वान व थोर पुरुष त्याजपाशी होता, त्याने ही राज्ये जिंकू नयेत म्हणून औरंगजेबाची पुष्कळ विनवणी केली. ते औरंगजेबाने ऐकले नाही. तेव्हा तो शेख बादशहास सोडून चालता झाला. बादशहाने काकळूत करून बोलावले असतानाही पुन्हा त्याचे तोंड बघण्यास तो आला नाही. ही दोन राज्ये जिंकण्याचा तीस-चाळीस वर्षांचा संकल्प त्याने आता सिद्धीस नेला, त्याची तपशीलवार हकिकत इतरत्र दिली आहे. 27 मार्च 1685 रोजी शहाजादा अज्जम व खानजहान बहादूर यांनी विजापुरास वेढा घातला. मे 23 रोजी स्वत: बादशहा प्रथम सोलापुरास व नंतर विजापुरास जाऊन लढण्याची शिकस्त करू लागला. त्या वेळी सिकंदर आदिलशहा व त्याचे सरदार सिद्दी मसूद, आगा खुस्रू, नबाब अब्दुरौफ, सर्जाखान, मालोजी घोरपडे हे सर्व राज्याचे बचावासाठी आवेशाने लढले. नाइलाज झाला तेव्हा मालोजीने सिकंदर शहास असेही सुचवले की, 'मी तुम्हास चंद्रगिरीस नेऊन पोहोचवतो, तुम्ही तेथे जाऊन राज्य करावे.' पण हा प्रकार शहाने पसंत केला नाही. 'आषाढ मासी संभाजीराजांनी विजापूरचे बचावास कबजीस पाठविले. तो जाऊन पन्हाळ्यावर राहिला आणि तेथून हंबीररावाचे हाताखाली त्यान फौजा रवाना केल्या.' तिकडून अंबाजीपंताचे हाताखाली कुतूबशहाची फौज विजापूरचे बचावास आली. परंतु औरंगजेबाच्या प्रचंड सामर्थ्यापुढे सर्व प्रयत्न निष्फल होऊन ता. 12.9.1686 रोजी सिकंदरशहा शरण गेला आणि विजापूरचे राज्य संपले. सिकंदरशहास बादशहाने आपल्याबरोबरच कैदेत वागविले. ता. 3.4.1700 रोजी विजापूरचा हा शेवटचा दुर्दैवी शहा औरंगजेबाचे छावणीत मरण पावला.

वरील संग्राम चालू असतानाच बादशहाने पुत्र शहाआलम यास ता.28.6.1685 रोजी गोवळकोंड्यावर रवाना केले होते. त्याने ऑक्टोबरात हैदराबाद काबीज करून अपरंपार लूट पैदा केली. कुतुबशहा गोवळकोंड्याचे किल्ल्यात कोंडून बसला. त्याचे मुसलमान सरदार अगोदरच फितूर झाले होते. मादण्णापंताने मात्र सर्व हिंदूंस एकत्र करून मोगलांशी सामना करण्याची शिकस्त केली. तेव्हा औरंगजेबाने कुतुबशहास अशा अटी लिहून कळविल्या की, 'ब्राह्मण अधिकाऱ्यांची डोकी कापून आमचेकडे पाठवावी आणि त्यांबरोबर जवाहीर, हत्ती, रोख पैसे व युद्धसामुग्री पाठवावी आणि विजापुरास इत:पर मदत करणार नाही असे वचन द्यावे.' शहाने अटी कबूल केल्या. मादण्णापंताचे डोके कापून त्याने बादशहाकडे पाठविले आणि कित्येक किल्ल्यांच्या तटावरून ब्राह्मणांचा कडेलोट केला. इतके करूनही राज्याचा बचाव झाला नाही.

खरे म्हटले तर गोवळकोंड्याचे राज्य बुडवावे अशी इच्छा शाहआलमची नव्हती, आणि कसेही करून मी तुमचा बचाव करीन असे वचनही त्याने कुतुबशहास दिले होते. हा प्रकार औरंगजेबाचे नजरेस आला आणि मुलगा काही तरी घात करणार असे वाटून त्याने स्वत: कलबुर्ग्यास पिराचे दर्शनास जाण्याचे निमित्ताने विजापूरचा मुक्काम हलवला आणि ता.

28.1.1687 रोजी तो गोवळकोंड्यापुढे येऊन उतरला. लगेच किल्ल्यावर हल्ला करण्याचा हुकूम त्याने शहाआलमास पाठवला, पण तो त्याने मानला नाही. म्हणून युक्तीने बादशहाने शहाआलम व त्याचा पुत्र अजिजुद्दिन यांस आपले भेटीस जवळ बोलावले आणि दोघांची भेट वेगळी घेऊन त्यांस कैद करून अटकेत ठेवले. (2.3.1687). या प्रसंगांत वीस वर्षांचा तरणाबांड अजिजुद्दिन आजास ठार मारण्याची परवानगी बापाकडे मागत होता, पण शहाआलमने असले अघोर कृत्य मंजूर केले नाही; उलट आपण शांत वृत्तीने बंदिवास पत्करला. इतउत्तर शहाआलमचे रहस्य बापाशी कधीच जुळले नाही. पुष्कळ वर्षे कैदेत काढल्यावर त्याची नेमणूक अफगाणिस्तानावर झाली आणि तिकडेच तो असताना दक्षिणेत औरंगजेब मरण पावला.

पुढे गोवळकोंडा काबीज होण्यास विलंब लागला नाही. बादशहाने गोवळकोंड्याचा वेढा सक्तीने चालवला असताना एका फितुरी अधिकाऱ्याने ता. 21.9.1687 रोजी मध्यरात्री किल्ल्याचे दरवाजे उघडून मोगलांस आत घेतले. पुत्र अजमशहास आत पाठवून औरंगजेबाने अबुल हसन कुतुबशहास पकडून आणवले (ता.1.10.1687) आणि दौलताबादचे किल्ल्यावर नेऊन अटकेत ठेवले. गोवळकोंड्यातून सुमारे दहा कोटींची संपत्ती बादशहास मिळाली. विजापूर व गोवळकोंडे येथे जितकी म्हणून सुंदर चित्रे व मूर्ती होत्या तितक्यांचा त्याने विध्वंस केला.

विजापूर व गोवळकोंडा ही राज्ये हस्तगत होताच औरंगजेबाने ठिकठिकाणी आपले अंमलदार नेमून प्रांताची व्यवस्था ठरवली आणि किल्ले व ठाणी कब्जात घेऊन वसूल जमा करण्याकरता भरवशाचे सैनिक रवाना केले. या राज्यांचा विस्तार थेट दक्षिणेपावेतो असल्यामुळे प्रथम औरंगजेबाने तिकडेच फिरूजजंग व कासीमखान हे आपले अंमलदार पाठविले. फिरूजजंगाने यादगिरी उर्फ इब्राहिमगड आणि कासीमखानाने तोरगळ ही ठाणी घेतली. कृष्णा-भीमाच्या चिमट्यात हल्ली सुरापूरचे संस्थान निजामाचे ताब्यात आहे. हे संस्थान बेरडांचे असून त्यांचा मुख्य पेमनाईक बेरड सागर येथे राहत असे. आदिलशहास व कुतुबशहास पेमनाईक याने मदत पाठविली होती. सबब त्याजवर औरंगजेबाने रुहुल्लाखानाचा मुलगा खानजादाखान यास रवाना केले. ता. 27.12.1687 रोजी पेमनाईक शरण येऊन बादशहास भेटला. तरी बादशहाने त्याचा सर्व प्रदेश खालसा केला, त्यामुळे बेरडांचा दंगा उत्तरोत्तर अतोनात वाढून त्यांजवर फौजा येऊनही ते जिंकले गेले नाहीत. फिरुजजंग कर्नाटकात गेला होता. त्याने कर्नूल व अदोनी ही स्थळे सन 1688 मध्ये काबीज केली. अदोनी हे विजापूरचा वजीर सीदी मसूद याच्या जहागिरीचे ठिकाण होते, म्हणून त्यास बादशहाने आपले पदरी सप्तहजारी मनसब दिली.

याप्रमाणे विजापूर-गोवळकोंड्याची वाट लावल्यावर बादशहाने पुन्हा आपली नजर संभाजीराजांकडे वळवली. त्याने अजीमशहास संभाजीराजांवर पाठवले. तो बेळगावचे ठाणे हस्तगत करून परत विजापुरास आला. बादशहा हैदराबादेस होता, तो मुक्काम ता.

25.1.1688 रोजी सोडून आणि वाटेने कलबुर्गा वगैरे ठिकाणी जाऊन ता. 15 मार्चला विजापुरास दाखल झाला. तेथेच वर्षअखेरपर्यंत त्याचे वास्तव्य झाले. या मुक्कामात त्याचे पाण्याचे हाल झाले म्हणून कृष्णेचा कालवा खणून आणून त्याने विजापुरास पाण्याची चांगली सोय करून दिली. सन 1688 च्या नोव्हेंबर महिन्यात विजापुरात ग्रंथिज्वराची (प्लेगची) साथ येऊन बादशहाचे छावणीत मोठा हाहाकार उडाला. खुद्द बादशहाची बेगम व मोठमोठे सरदार व लाखो लोक या साथीत मरण पावले. ता. 14.12.1688 रोजी बादशहाने विजापूर सोडले आणि उत्तरेस 85 मैलांवर अकलूज म्हणून भीमेच्या काठी ठाणे आहे तेथे त्याचा मुक्काम असताना सन 1689 च्या फेब्रुवारीत संभाजी राजा हस्तगत झाल्याची बातमी त्यास पोहोचली. त्यादृष्टीने बादशहाचे मुक्काम लक्षात ठेवणे आता जरूर आहे.

5) हंबीररावाचा मृत्यु, हीनावस्था (डिसेंबर, 1687) :-

विजापूरच्या राज्यात सर्जाखान नावाचा प्रसिद्ध सरदार होता, त्याचे नाव पूर्वी आले आहे. विजापूरचे राज्य संपल्यावर तो औरंगजेबाचे पदरी आला आणि लगेच त्यास बादशहाने संभाजीराजांचा मुलूख सर करण्यास पाठविले. कित्येक मराठे मनसबदार औरंगजेबाकडे आले होते त्यांस त्याने सर्जाखानाबरोबर दिले. खान वाई प्रांताकडे चालून आला, तेव्हा त्याची व हंबीररावाची गाठ पडून निकराची लढाई झाली. सर्जाखानाचा पराभव होऊन मराठ्यांस लूटही भरपूर मिळाली, पण लढाईचे ऐन गर्दीत हंबीरराव गोळा लागून ठार झाला. त्यामुळे संभाजीराजांची मोठी हानी झाली. इमान व स्वामिसेवा हे त्याचे गुण लोकोत्तर असून लुटीचा ऐवज तो मोठ्या कसोशीने धन्याकडे आणून हजर करीत असे. हंबीरराव जिवंत असेपर्यंत लष्करी बाबतीत संभाजीराजांस विशेष काही उणे पडले नाही. त्याचे पश्चात तो सर्वस्वी कलुशाचे आधीन झाला. सन 1685-86 तील भडोच-बऱ्हाणपुरच्या स्वारीनंतर संभाजीराजांच्या हालचाली काय होत्या ते कळत नाही. बहुधा तो जास्त व्यसनासक्त झाला असावा. वरील वाईचे लढाईनंतर औरंगजेबाशी त्याचा तात्पुरता तह ठरला असे ऑर्म म्हणतो, पण त्याचा तपशील उपलब्ध नाही. बादशहा विजापुराकडे असतानाही त्याचा व संभाजीराजांचा झगडा चालूच होता.

'परिस्थितीचा उपयोग करून घेण्याचे चातुर्य' संभाजीराजांस असते तर बादशहाला मुळीच यश आले नसते असे एकंदर प्रकार पाहून वाटल्याशिवाय राहत नाही. पण माणसे व फौज असूनही त्याला उत्तरोत्तर दु:स्थिती येत गेली. राज्य करील त्याचे आहे असे म्हणतात ते खोटे नाही. नुसत्या त्याच्या फौजेची गणती करू म्हटले तर असे दिसून येते की नागोठण्यापासून चौलचे दरम्यान उत्तर कोकणातील रायगड टापूत पंधरा हजार लोकांचा भरणा होता. तेथून पुढे दंडाराजपुरीनजीक सिद्दिस पायबंद देण्यास दहा हजार आणि याच

टापूत देशावर सातारा व फोंडा यांचे दरम्यान वीस हजार स्वार फिरतीवर असून, शिवाय बाह्य प्रदेशात फिरणाऱ्या लहान-लहान टोळ्या व ठिकठिकाणच्या किल्ल्यांवरील शिबंदी बरीच मोठी असावी. त्याच्या आरमारात दीडशे लढाऊ जहाजे असून त्यातील 120 तरी मोठ्या आकाराची व चांगल्या स्थितीत होती. परंतु त्याच्या लहरी स्वभावामुळे हे साहित्य विफल होऊन सर्वत्र अव्यवस्था माजली. जुन्या अनुभवी माणसांवर त्याचा विश्वास कधीच बसला नाही. मोरोपंत पिंगळ्यांचे पश्चात कलुशाच सर्व मुखत्यार झाला, त्यामुळे अंत:करणापासून धन्याची सेवा करावी असे कोणासही वाटेनासे झाले. स्वत: राज्यकारभारात लक्ष घालून दमाने प्रकरणांचे निकाल लावण्याचे सामर्थ्य संभाजीराजांत मूळचेच अल्प होते. त्यातून तो कलुशाचे तंत्राने वागू लागल्यामुळे अधिकारी व प्रजा नाखूष झाली आणि पूर्वीच्या शिवाजीराजांच्या शिस्तीच्या तुलनेने संभाजीराजांचा कारभार विशेष हीन भासू लागला. त्यात आणखी औरंगजेबाच्या भेदनीतिची व लालुचीची भर पडली. अशा प्रकारची कित्येक ठळक उदाहरणे इतिहासात नमूद आहेत. आवजी पंडित म्हणून संभाजीचा वकील मुंबईस इंग्रजांकडे बोलणे करण्यास असे. त्याला संभाजीने कामावरून काढले, तेव्हा तो पोर्तुगिझांकडे नोकरीस राहिला आणि त्यांचे तर्फेने बादशहाकडे जाऊ-येऊ लागला. (जून 1682). काजी हैदर म्हणून शिवाजीराजांचा मुन्शी होता तो ता. 26.7.1683 रोजी संभाजीराजांची रजा घेऊन बाहेर पडला आणि बादशहास जाऊन भेटला. बादशहाने त्यास दोन हजारी मनसब दिली. तेथून उत्तरोत्तर पद वाढत जाऊन दिल्लीस सन 1706 मध्ये त्यास मुख्य काजीचे काम मिळाले. वाडीकर खेम सावंत संभाजीराजांचा पक्ष सोडून पोर्तुगिझांस मिळाला आणि पुढे त्यासच शृंगारपूरकर राम दळवीही सामील झाला.

अकबर व दुर्गादास सहा वर्षे महाराष्ट्रात राहून संभाजीराजांच्या कारभाराचे पूर्ण निरीक्षण करीत होते. त्यांना संभाजीराजांचा सहवास यशस्वी होईल अशी आशा दिसेना, म्हणूनच आपल्या बचावाचे अन्य उपाय त्यास पाहवे लागले. मुख्यत: लायक माणसांचा तुटवडा संभाजीराजांस विशेष जाचक झाला. शिवाजीराजांच्या पैदासीची माणसे सर्व खपली आणि नवीन माणसे संभाजीराजांच्या लहरी स्वभावामुळे तयार झाली नाहीत. स्वत:च्या विचाराने निश्चित धोरण ठरविण्याची शक्ती संभाजीराजांस नसल्यामुळे प्रसंग उद्भवला की तो कलुशाकडे बोट दाखवी आणि शेवटी-शेवटी तर कलुशाशिवाय इतरांना त्याची भेट बंद झाली, त्याच्या मध्यस्थीशिवाय दुसऱ्या कोणाचा त्याजकडे प्रवेश होईना. आधी कलुशा परकी, भिक्षुकी धंद्यातला, राजकारभाराचा अनुभव नाही, किंवा तितकीशी कळकळही नाही, यामुळे शिवाजीराजांची शिस्त व नियम मोडून गेले. लष्करचा बंदोबस्त बिघडला. लोक आणलेली लूट लपवू लागले, लष्करात बायका नेऊ लागले, कित्येक लूट करताना बायका पकडून आणू लागले. शिवाजीराजांचा भरलेला खजिना रिता झाला. नवीन भर येण्याची बंद पडून खर्चाची द्वारे वाढली. किनाऱ्यावरून पश्चिम देशांशी व्यापार

चाले तो अव्यवस्थेमुळे बंद पडून त्याची किफायत बुडाली. अर्थात लष्करास पगार वेळेवर पोहोचेना, तेव्हा मुलुख लुटून ज्याने-त्याने आपला पगार भागवून घ्यावा अशी परवानगी लष्करास देणे भाग पडले. कलुशास पैशाची अडचण पडू लागली, तरी यजमानास राग येईल म्हणून खरा प्रकार त्यास त्याने कळविला नाही. कर्नाटकातला पैसा येईनासा झाला. अर्थात जमिनीचा सारा कलुशाने वाढवला. कामगार पैसेखाऊ आहेत असे वाटून त्याने त्यांना कामावरून दूर केले आणि प्रांत एकदम इजाऱ्याने कमावीसदारांकडे वहिवाटीस देण्याचा प्रघात घातला. जो कोणी जास्त वसूल देईल त्यासच इजारा मिळायचा. त्यामुळे रयत त्रस्त होऊन मुलूख सोडून जाऊ लागली. अशा रितीने स्वत: शूर असूनही संभाजीराजे गोत्यात आले. अव्यवस्थेची गाऱ्हाणी कोणी त्यास कळविली की तो ती स्वत: ऐकून न घेता कबजीकडे कळविण्यास सांगे आणि कबजी तर, आला दिवस कसातरी लोटण्यापलिकडे दुसरे काही करीना. विजापूरचे राज्य बुडाले तेव्हा त्या राज्यात पूर्वी डफळे, घाटगे, माने, निंबाळकर वगैरे पुष्कळ मराठे जहागीरदार होते, त्यांस औरंगजेबाने काढून लावले. ते आयतेच येऊन संभाजीराजांस मिळाले. संभाजीराजांनी त्यांना मोगलांच्या प्रदेशात लूट करण्याची पूर्ण मोकळीक दिली. त्याबरोबर हे मराठे सरदार मोगलांच्या राज्यात स्वाऱ्या करून पैसा मिळविण्याच्या उद्योगास लागले. संभाजीराजांच्या लष्कराची शिस्त बिघडण्यास हे आणखी एक कारण झाले.

औरंगजेबाने मराठ्यांचे सरदार फोडण्याचा सपाटा चालवला, त्याचे एक ठळक उदाहरण 'बाजी सर्जाराव जेधे-देशमुखाचे' आहे. हे जेधे देशमुख शहाजीपासून भोसल्यांचे सहायक होते. सन 1685 मध्ये शिरवळच्या बाजूस मोगल चाल करून आले, तेव्हा 'त्यांची खास बातमी काढून सर्वांनी गनीम नामोहरम करावा, तुमचा भरवसा महाराजांस आहे' असे पत्र शंकराजी नारायणाने कृष्णाजी देशपांडे यास लिहिलेले आहे. त्याच सुमारास बाजी सर्जेरावासही पत्र आहे, त्यावरून दिसते की बाजीस मोगलांनी पकडून त्याचे हाल केले असता त्यास धीर देण्यात आला. त्यानंतर ता.5.10.1685 च्या पत्रात संभाजीने त्यास तंबी दिली आहे ती अशी :- 'या उपरीही गनिमांकडे राहणेच असेल तरी सुखे राहणे. तुमचा हिसाब तो काय आहे? या क्षणी स्वामी आज्ञा करतील तर गनीमांसुद्धा तुम्हास कापून काढतील हे बरे समजणे. दुसरी गोष्ट की, तेथे राहणेच नाही, एकनिष्ठेने स्वामीचे पायांशी वर्तावे असे असले, तरी तुम्ही परभारे मुद्दे सांगून गडकिल्ल्यांकडे राबते काय म्हणून करिता? हे गोष्ट स्वामीस मानत नाही. जो राबता करणे तो स्वामीकडेच करून हुजुर वर्तमान लिहून पाठवावे. स्वामी तुमचा मुद्दा मनास आणून आज्ञा करावयाची ती करतील. तरी अशी गोष्ट करावयास प्रयोजन नव्हते. हुजरातीखेरीज दुसऱ्यांकडे एकंदर राबता न करणे. आज्ञापत्र सादर होईल तेणेप्रमाणे वर्तणूक करणे.' त्यानंतर ता.1.2.1687 च्या पत्रात बाजी व त्याचे देशपांडे-गुप्ते यांनी समजावणी केल्याचा उल्लेख आहे, तो असा :-

'तुम्ही गनीमाकडे जाऊन सेवा करिता. कोण्या भरास भरून गेलेत? बरे झाले ते झाले. ते फिरोन न ये. परंतु मुसलमानांची सेवा करितां तुम्हास कष्ट होतात. सांप्रत स्वामीचे सेवेशी येऊन कार्यभाग करावा, कष्टाची मुजरा होईल, तर सर्फराजी करून घ्यावी म्हणून लिहिले ते कळून आले. तरी तुम्ही कदीम लोक. तुमचा भरवंसा, राजेश्री स्वामींचे बहुत अन्न भक्षिले आहे. क्रिया धरून यावयाचे केले तरी बहुत उत्तम केले, कदाचित गनीमांकडे गेला होता या गोष्टीकरिता यावयाचा आनमान कराल तर सर्वस्वी न धरणे. बेशक येणे. तुमचे बरे करणे. सुभ्याहून सर्फराजी करून बहुत चालऊं. अंतर न पडे. समाधान असो देणे आणि येणे. दरीबाब कबूल असे. आज्ञा प्रमाण मोर्तब.'

तथापि संभाजीराजांचे हयातीत जेधे परत आल्याचे दिसत नाही. ता.22.3.1690 च्या पत्रात राजारामाने त्याची समजावणी करून त्यास परत स्वराज्याचे कामी सामील होण्याविषयी पत्र लिहिलेले आढळते. 'तुम्ही स्वराज्यात परत न आल्यास तुमची इनामगावे परत मिळणार नाहीत.' अशी त्यास धमकी दिलेली आहे. राजारामाचे मृत्युनंतर लवकरच बाजी सर्जाराव जेधे-देशमुखही मृत्यु पावला.

ही फक्त एका लहानशा सरदाराची हकिकत झाली. मावळातील देशमुख देशपांड्यांचे किंवा इतर ठिकाणचे शेकडो शिवकालीन कागद छापले आहेत, त्यात संभाजी व राजाराम यांच्या वेळेच्या अशाच हकिगती आहेत.

6) मातब्बरखान, कल्याण व उत्तर कोकण (स.1688-1704) :-

शिवाजीराजांच्या उद्योगाचे अधिष्ठान नासिकपासून गोव्यापर्यंत सह्याद्रीच्या दोनही बाजूंस धरून होते, हे पूर्वी सांगितलेलेच आहे. त्यासाठी रायगड राजधानी निर्माण झाली, आणि कल्याणपासून राजापूरपर्यंतच्या प्रदेशावर शिवाजीची भिस्त बसली. उत्तर कोकणचा हा प्रदेश बादशहाच्या हुकमाने मातब्बरखानाने संभाजीराजांच्या हातून काबीज केला. मातब्बरखान सय्यद हा एक अरब सरदार कल्याणास वसती करून राहिलेल्या एका कुटुंबातला होता. तो प्रथम नासिक जिल्ह्यात ठाणेदार असून मावळे, कोळी, भिल्ल इ. लोकांत लहानपणापासून मिसळणारा असल्यामुळे त्याला त्या डोंगराळ प्रदेशाची चांगली माहिती होती. हरजी जाखरे नावाचा एक हुशार मराठा होता त्यास पैसा देऊन मातब्बरखानाने आपल्या हाताखाली घेतले आणि त्याचेमार्फत खटपट करून खानाने पठ्ठा उर्फ विश्रामगड हा मजबूत किल्ला ता.17.1.1688 रोजी रात्री चोरून छापा घालून घेतला. या कामी मातब्बरखानाने पदरचे 45000 रुपये खर्च केले. बादशहाने त्यास त्याबद्दल बक्षीस म्हणून फक्त दोन हजार रुपये व शाबासकी दिली. अल्पावकाशात इगतपुरीजवळचे कुलंग, रतनगड, हर्षगड, त्रिंगलवाडी, मदनगड हे लहानमोठे मराठ्यांचे किल्ले खानाने

ताब्यात आणले आणि सर्वांत मजबूत किल्ला त्रिंबकचा होता, त्याचे रक्षक तेलंगराव आणि श्यामराज यांजला ऐंशी हजार रक्कम देऊन त्यांजपासून ता.8.1.1689 रोजी तो किल्ला मातब्बरखानाने हस्तगत केला. त्यावेळच्या हकिकती वाचल्या म्हणजे शेवटच्या एकदोन वर्षांत संभाजीराजांचा बंदोबस्त अगदीच ढिला पडला होता असे स्पष्ट दिसू लागते. इतक्यात संभाजी पकडला गेल्याचे वर्तमान समजताच मातब्बरखानास एकदम स्फुरण चढले. नाशकाहून खान माहुलीवर चालून गेला आणि दोन-तीन महिन्यात नाना युक्त्या करून त्याने माहुली, भिवंडी, दुगाड, मलंगगड व शेवटी कल्याण ही सर्व ठिकाणे एकामागून एक कबजात आणली. पुढे ऑक्टोबर 1689 मध्ये रायगड मोगलास हस्तगत होऊन, चौल व राजापूर ही महत्त्वाची ठाणी मराठ्यांचे हातून गेल्याने सगळी कोकणपट्टी मोगलमय होऊन शिवाजीराजांचा पुष्कळ वर्षांचा उद्योग साफ धुवून गेला.

पुढे बादशहाने मातब्बरखानाची नेमणूक कल्याणास केली तेव्हा त्याने तेथे बागा, महाल, मशिदी वगैरे बांधून शहरास शोभा आणली, त्यांचे अवशेष अद्यापि दृष्टीस पडतात. संभाजीराजांच्या वधानंतर बादशहाने जे प्रचंड युद्ध चालविले त्यातील पुष्कळ प्रसंगांत मातब्बरखानाने बादशहाची कामगिरी मोठ्या दक्षतेने उठवली. हा सन 1704 च्या मार्च महिन्यात मरण पावला. कल्याणास पुष्कळ वर्षे त्याने कारभार केल्यामुळे ते ठिकाण त्याचे एक स्मारकच होय असे म्हटल्यास वावगे नाही.

7) हरजी राजाचा कर्नाटकातील उद्योग (सन 1681-89) :-

संभाजीराजांच्या शेवटल्या दोन-तीन वर्षांतल्या हकिकती स्पष्टपणे मिळत नाहीत. निदान औरंगजेबाचे लक्ष विजापूरकडे असताना संभाजीराजांनी इकडे मोगली महाराष्ट्रात धुमाकूळ उडवून दिला पाहिजे होता. ह्या शेवटच्या काळात संभाजी व कलुशा हे बहुधा पन्हाळा-विशाळगडचे आसपास राहून तेथून संगमेश्वर रायगडच्या बाजूस जरुरीप्रमाणे नजर फेकीत होते. हंबीरराव मोहिते पडल्यावर त्याच्या तडफेचा दुसरा सेनानायक संभाजीराजांकडे निघाला नाही. शिवाजीराजांनी जिंकलेल्या कर्नाटकी प्रदेशाकडे मात्र संभाजीराजांचे लक्ष प्रथमपासून विशेष होते, आणि मुसलमानी राज्ये खालसा होताच औरंगजेबाने प्रथम त्या राज्यांचा कर्नाटकातला प्रदेश कबजात आणण्याचा सडकून प्रयत्न चालवला. त्यात त्यास मराठ्यांकडून मोठा अडथळा आला. समग्र हिंदुस्थानावर मोगल बादशहाची एकछत्री सत्ता चालू केली हे दाखविण्याची औरंगजेबास मोठी इच्छा असून त्यासाठी त्याच्या फौजा कर्नाटकात घुसल्या; त्यांची हकिकत कळण्यासाठी प्रथम शिवाजीचे पश्चात त्या बाजूची मराठ्यांच्या अमलाची स्थिती काय होती ती पाहिली पाहिजे.

संभाजीराजांनी सन 1681 मध्ये हरजी राजे महाडिक व श्यामजी पुंडे यांस कर्नाटकचे कारभारावर नेमून पाठविले हे मागे सांगितलेच आहे. त्याजबराबर जैताजी काटकर व दादाजी काकडे हे आणखी इसम नेमून पाठविलेले होते. ही मंडळी सन 1681 च्या एप्रिलमध्ये दक्षिणेतून निघाली. परंतु ते जिंजीस पोहोचतात तोच श्यामजी नाइकास संभाजीराजांनी कैद करविले. पुढे हरजी राजे एकटाच तिकडे कामावर होता. तो कारणपरत्वे देशी येऊन संभाजीराजांस आपल्या कामाचा झाडा देत असे. हरजीने आपला शह कर्नाटकात चांगला बसविला. सन 1682 च्या चैत्रात श्रीरंगपट्टण व त्रिचनापल्ली येथील सत्ताधीशांचा तंटा लागला, त्यात हरजीने त्रिचनापल्लीकरांची मदत केली. लढाई होऊन श्रीरंगपट्टणचा सरदार कुमार व दोन हजार घोडे हरजीने पाडाव आणले. यामुळे त्या प्रांतात हरजीचे वजन पुष्कळ वाढले. पुढे सन 1685 च्या आरंभी तंजावरचा एकोजीराजे मरण पावल्यावर त्याची बायको दीपाबाई व पुत्र शहाजी यांनी तंजावरचा कारभार सुव्यवस्थित चालवला आणि त्यांच्याशी सख्य ठेवून जिंजी प्रांतात हरजीने प्रमुखत्व मिळविले. औरंगजेब विजापूर व गोवळकोंडा ही राज्ये जिंकीत असताना त्या राज्यांचा कर्नाटकी प्रदेश हरजीने शक्य तितका आपल्या हाताखाली घातला. तेणेकरून हरजीचे एक स्वतंत्र राज्यच निर्माण झाले असे म्हणण्यास हरकत नाही. जिंजी येथे कडेकोट बंदोबस्त करून तो रात्रंदिवस सावध राहू लागला. संभाजीराजांना त्याच्या या स्वतंत्र वर्तनाचा संशय आला आणि त्याजकडे संभाजीराजांनी पैशाची मागणी केली असता हरजीने वसूल पाठविला नाही. तेव्हा हरजी बंडखोरी करतो असे समजून त्यास कबजात ठेवून कर्नाटकच्या कारभारात आपली हुकमत चालवण्यासाठी संभाजीराजांनी आपल्या खुद्द भरवशाचा हुशार सरदार मोरोपंत पिंगळ्याचा भाऊ केसो त्रिमल यास कर्नाटकचे कारभारावर पाठवून त्याचे मदतीस संताजी घोरपडे यास दिले. केसोपंताचा पुतण्या निळो मोरेश्वर पिंगळे पेशवाईचे कामावर होता, त्याचे व चुलत्याचे वैमनस्य होते. तेव्हा केसोपंताविरुद्ध निळोपंताने पुष्कळ गाऱ्हाणी संभाजीराजांस कळवली, पण ती त्याने मानली नाहीत. केसो त्रिमल निघाला तो ता.11.2.1687 रोजी जिंजीस पोहोचला. औरंगजेब कर्नाटकात आपला अंमल बसवीत होता, तो बंद पाडून आपल्या प्रदेशाचे रक्षण उत्तमप्रकारे करावे अशी केसोपंतास संभाजीराजांची मुख्य ताकीद होती. तोच उद्योग त्याने तिकडे चालू केला, त्यामुळे हरजीचा अधिकार गेला याबद्दल त्यास वैषम्य वाटून त्याने केसोपंतास मदत न करता उलट जोराचा विरोधच चालवला. यास्तव विलक्षण घोटाळे उत्पन्न झाले, ते सर्व येथे सांगण्याची जरूर नाही.

मराठ्यांच्या या हालचालींवर औरंगजेबाची सूक्ष्म नजर होती. विजापूर गोवळकोंडा या राज्यांचा मुलुख आता आपला असून तो मराठ्यांनी लाटू नये एतदर्थ त्याने कासमखान नावाच्या हुशार सरदारास फौजेसह कर्नाटक जिंकण्यास रवाना केले. खानाने प्रथमच म्हैसूरचे राज्यावर स्वारी करून चिक्कदेव वोडियार याचे ताब्यातून बंगलोरचे मजबूत ठाणे

काबीज केले 9जून 1687). त्याबरोबर चिक्कदेवाने हरजीस आपले मदतीस बोलावून कासमखानास बंगलोरातून हुसकून दिले (ता.10.7.1687). तेव्हा कासमखानास दिसून आले की म्हैसूरचे राज्य जिंकण्याचे नादास आताच लागू नये. चिक्कदेवाचा वचक तंजावर, जिंजी इ. ठिकाणच्या मराठ्यांना आहे, तो नाहीसा केल्यास मराठे आपणास भारी होतील. हा प्रकार कासमखानाने बादशहास कळविला आणि त्याची संमती आणून तो म्हैसूरची हद्द सोडून पेनुकोंड्यावर चालून गेला आणि तेथील किल्लेदारास वश करून त्याने ते ठाणे हस्तगत केले. इतक्यात औरंगजेबाच्या फौजा रिकाम्या झाल्या, त्यांस त्याने कासमखानाचे मदतीस पाठविले. इस्माइलखान मका, याचप्पा नायक, रुस्तुमखान व महंमद सादिक असे मोठमोठे सरदार बादशहाने कर्नाटकात रवाना केले. केसोपंत जिंजीस दाखल होतो तोच हे अरिष्ट आलेले पाहून त्याने शहाणपण करून प्रथम हरजी राजाशी सख्य केले. कारण आपण दोघे भांडू लागल्यास सर्वस्व गमावण्याची पाळी येणार हे उघड दिसत होते. हरजीनेही प्रसंग ओळखून मोठ्या सौजन्याने आपली सर्व फौज व सामान केसोपंताचे हवाली केले. ते घेऊन केसोपंत म्हैसूर प्रांतात सफर करून आणि ठिकठिकाणचा अंदाज काढून ता. 10.11.1687 रोजी जिंजीनजीक त्रिनोमालीस दाखल झाला.

यापूर्वीच औरंगजेबाच्या फौजा कंडापिली वगैरे तेलंगणातील महत्त्वाची ठिकाणे हस्तगत करून (जुलै 1687) नंतर मराठ्यांवर चालून आल्या. इकडे हरजी राजे व संताजी भोसले यांनी अर्काटचे किल्लेदारास ठार मारून ते मजबूत ठिकाण काबीज केले आणि कांचीवर चाल केली. ता.10.1.1688 पासून तीन दिवस पावेतो त्यांनी कांचीचा विद्ध्वंस केला. त्याचवेळी केसोपंताने चिंगलपट व कावेरीपाक ही ठिकाणे हस्तगत केली. पुढे ता.25 फेब्रुवारी रोजी इस्माईलखान वगैरे मोगल सरदार कांचीवर आले, आणि मराठ्यांस हाकलून देऊन ते ठिकाण त्यांनी कब्जात घेतले. नंतर वांदिवाश येथे मोगल व मराठे यांचा तुंबळ रणसंग्राम होऊन त्यांत दोघांचाही पुष्कळ नाश झाला (ता.8.3.1688). या लढाईचा एक परिणाम असा झाला की दोन्ही पक्ष तुल्यबळ होऊन एकमेकांवर नजर ठेवीत स्वस्थ बसले. इकडे महाराष्ट्रात लवकरच संभाजीराजांचा निकाल लागला. हरजी महाडिकाने हे वर्तमान ऐकून केसोपंतास त्रिनोमाली येथे कैद केले आणि पुढे लवकरच राजाराम जिंजीस येऊन कर्नाटकचे राजकारण बदलले.

प्रकरण 4
विनाशकाल

1.संभाजीराजांचा हृदयद्रावक शेवट; 2.संभाजीराजांची योग्यता; 3.बायकामुले - येसूबाई.

1) संभाजीराजांचा हृदयद्रावक शेवट (ता.11.3.1689) :-

कर्नाटकात संभाजीराजांच्या फौजा गेल्यामुळे महाराष्ट्राच्या बंदोबस्तात कमतरता आली. संभाजीराजे बहुतेक पन्हाळ्यावर राहत होता, ही वार्ता औरंगजेबास मिळाल्यावर त्याने त्या बाजूस फौजा रवाना केल्या आणि सन 1687 च्या चैत्रात प्रथम मिरज घेऊन नंतर पन्हाळा हस्तगत करण्याचा प्रयत्न त्याने चालवला, पण तो मजबूत किल्ला सहज हाती येण्याजोगा नव्हता. तेव्हा चहूकडून कोंडमारा करण्याचा प्रयत्न औरंगजेबाने चालवला. नासिककडून संभाजीच्या फौजा मोगली प्रदेशास फार त्रास देत म्हणून त्या बाजूस बादशहाने आपला पुत्र अजमशहा यास ठेवून दिले. तसेच संभाजीराजे डोंगरी वाटांनी बाहेर पळून जातील त्यास अटकाव व्हावा म्हणून निरनिराळ्या नाक्यांच्या जागी आपल्या फौजा त्याने संभाजीराजांचे पाळतीवर ठेवून शिवाय सह्याद्रीतील चोरवाटांवर आपले पहारे बसवले. कोकणच्या प्रदेशाचे माहीतगार शिर्के वगैरे सरदार औरंगजेबास मिळाले होते, त्यांस कोकणात पाठवून त्यांजकडून त्याने संभाजीराजांचे प्रदेशात बंडावा सुरू केला. 'कार्तिक मासी (नोव्हें.1688) कविकलश यांजवरी सिर्के पारखे झाले. कलश पळोन खेळण्यावर गेला. तेच मासी संभाजीराजे रायगडाहून कलुशाच्या मदतीस आले. संगमेश्वरी सिर्क्यांशी युद्ध करून त्यांस पळवून खेळण्यासी आले.' शिर्क्यांनी या वेळी संभाजीराजांच्या लोकांत फितूर केला होता असे दिसते. बहुधा त्यांच्याचमार्फत संभाजीराजे व कलुशा यांच्या हालचाली मोगलांस कळल्या. त्यांनी जो शिर्क्यांवर कहर उडविला त्यामुळे हे शिर्के व त्यांचे अनुयायी नाराज होऊन धन्याचे वाईट करण्यास अगदी टपून बसले होते. रायगडावर प्रल्हाद निराजी वगैरे कित्येक प्रमुख मंडळी शिर्क्यांस सामील आहेत असा संशय संभाजीस आल्यावरून त्याने त्या सर्वांस कैदेत घातले. कलुशा व संभाजी खेळण्यावर होते. तेथे सामान सुमानाची भरती करून ते रायगडाकडे येत असताना

संगमेश्वर येथे त्यांचा मुक्काम अलकनंदा व वरुणा ह्या नद्यांचे संगमाजवळ नावडी गावी असताना ते (ता.1.2.1689) रोजी मोगलांकडून पकडले गेले, तो प्रकार असा.

गोवळकोंड्याचा वेढा चालू असतानाच शेख निजाम नावाचा एक कुतुबशाही सरदार प्रमुख व हुशार होता. तो औरंगजेबास येऊन मिळाला. (ता.28.5.1687). बादशहाने लगेच त्यास सहा हजारी मनसब व मुकर्रबखान हा किताब दिला आणि त्याच्या नातलगांसही निरनिराळ्या नेमणुका करून दिल्या. शेख निजामास कोल्हापूरकडील प्रदेशाची माहिती चांगली असल्यामुळे, बादशहाने त्यास पन्हाळ्यास वेढा घालून संभाजीराजांस पकडून आणण्याची कामगिरी सांगितली, ती त्याने उत्सुकतेने स्वीकारली. बादशहाने आपले कित्येक चतुर व अनुभवी हेर मुद्दाम संभाजीराजांच्या हालचालींचा व राहणीचा तपास ठेवण्याकरिता कैक दिवस आगाऊ पाठवले होते. या हेरांनी मुकर्रबखानास येऊन वर्दी दिली की, संभाजीचा मुक्काम संगमेश्वर येथे असून तेथे तो विलासात मग्न आहे. लगेच मुकर्रबखानाने दोन हजार स्वार व एक हजार पायदळ एवढा जमाव घेऊन कोल्हापुरहून लगबगीने प्रयाण केले. अंबा घाटाच्या जंगलातून उतरण्यास त्यास अतिशय प्रयास पडले आणि प्रत्येक मुक्कामावर त्याचे पुष्कळ लोक जाया झाले. संगमेश्वरास तो दाखल झाला तेव्हा फक्त तीनशे स्वार व हाताखालचे काही निवडक अंमलदार एवढेच त्याजबरोबर होते. ‘माघ व.7 शुक्रवारी संभाजीराजे व कवि कलश रायगडास जाण्यास संगमेश्वरास आले असता सेख निजाम दौड करून येऊन उभयतांस जिवंत धरून नेले. वरकड लोक रायगडास गेले’ (जे.श.). कोल्हापुराहून संगमेश्वर मोटार रस्याने 70 मैल आहे. हा सत्तर मैलांचा प्रवास शेख निजामाने तीन दिवसात केला. अर्थात संगमेश्वर येथे संभाजीराजांचा मुक्काम चार-आठ दिवस तरी झाला असला पाहिजे. त्यांच्या मुक्कामाची बातमी कोल्हापुरास पोहोचून खान नेमका संगमेश्वरास दौड करून आला, यावरून संभाजीराजे थोडेबहुत गाफिल स्थितीत मुक्काम करून होते असे दिसते. त्यांचेही हेर होतेच आणि गाफिल नसते तर मुकर्रबखानाच्या दौडीपुढे पळून जाणे त्यांस सहज शक्य होते. मोगलांचा अकस्मात हल्ला आलेला पाहून कवि कलश त्याजवर धावून गला. पण त्याच्या उजव्या हातास बाणाची जखम होऊन तो घोड्यावरून उतरला, त्याबरोबर जे थोडे लोक लढत होते ते पराभव पावून पळून गेले. तेव्हा संभाजी व कवि कलश तळघराच्या काळोखात जाऊन लपून बसले. लगेच खानाने घरास वेढा घातला. मुकर्रबखानाचा मुलगा इख्लासखान बरोबर होता, त्याने काही चार धीट माणसे घेऊन अरुंद पायऱ्यांवरून तळघरात प्रवेश केला, आणि संभाजी व कलुशा यांस पकडून वर आणले. मुकर्रबखान बाहेर हत्तीवर होता त्याने लगेच त्या दोघांस बांधून हत्तीवर घातले. त्या घरात दुसरे पंचवीस लोक व काही बायकामुले हस्तगत झाली, त्यांसही खानाने बेड्या घालून हत्ती, घोडे व उंट यांजवर बंदोबस्ताने बसविले. अशा रीतीने ता.1.2.1689 माघ वद्य 7 रोजी मुकर्रबखान त्या सर्व मंडळींस घेऊन संगमेश्वराहून बादशहाकडे जाण्यास निघाला.

संगमेश्वर येथे संभाजीराजे व कलुशा यांनी घरे, बागा वगैरे तयार करून काही काल ते आपल्या वास्तव्याचे ठिकाण केले होते. कसब्याच्या गावठाणापासून बंदरापर्यंतच्या दोन मैलात त्यावेळी पेठ व वस्ती होती. हल्ली बंदरावरून उत्तरेस कसब्याकडे जाताना उजव्या बाजूस नावडी गावात पडक्या घरांचे चौथरे व घरबंद दृष्टीस पडतात ते त्या वेळचे असावेत. कवि कलशने आपल्या मंत्रसिद्धीकरता ही जागा मुद्दाम एकांतात पसंत केलेली असून ती रायगडाहून विशाळगडास जाण्याच्या वाटेवर होती. सन 1688 च्या उन्हाळ्यात संभाजीराजे तेथे काही काळ राहिले होते, त्या संबंधाने खालील उल्लेख मननीय आहे. ‘संभाजी महाराज संगमेश्वरी आले ते उन्हाळा (सरदेसायांच्या) वाड्यानजिक होते. पर्जन्यकाळ आला तेव्हा सरदेसायांचा वाडा मोठा पाहून मागोन त्यात अडीच तीन महिने राहिले. कृष्णाबाई व तिचा पुत्र रंगोबा नायक सरदेसाई यांनी राजे धनी, प्रसंगेकरून आले, जागा मागतात हे समजोन रहायला जागा वाड्यात दिली. नंतर मोगलाने कबजीसह हस्तगत करून नेले. ते समयी वाडा जाळला व गावातील देवळे फोडिली, देव बाटवले. याप्रमाणे महार्णव जाले.’

संभाजीराजांस पकडते वेळी म्हाळोजी घोरपडे त्याजपाशी असून तो त्या गर्दीत ठार झाला आणि संताजी वगैरे त्याचे तिघे पुत्र पळून रायगडाकडे गेले. समर्थशिष्य रंगनाथस्वामी पालीमठाचा संचालकही संभाजीबरोबर शृंगारपुरी राहत असल्याचा उल्लेख आहे. संभाजीराजे व कबजी यांस धरून नेल्यावर स्वामी वाघापुरास गेला.

फाल्गुन व.30 (11.3.1689) रोजी म्हणजे पकडल्यापासून सुमारे सवा महिन्याने औरंगजेबाने तुळापुरी संभाजीराजे व कविकलश यांचा शिरच्छेद केला, असा जेधे शकावलीचा उल्लेख आहे. संभाजीराजे छावणीत दाखल होण्यापूर्वीच त्यास पकडल्याची बातमी बादशहास अकलूज येथे पोहोचली, त्याबरोबर त्याने मोठा विजयोत्सव सुरु केला. विशेषत: मुसलमानांस तर एका मोठ्या संकटातून आपण सुटलो असे वाटून त्यांनी जयघोष आरंभला. सहा वर्षांत आदिलशाही, कुतुबशाही व मराठे या तिघांचा ग्रास केल्याबद्दल खुद्द बादशहास अत्यंत धन्यता वाटली. या यशाबद्दल कलबुर्गा येथील साधूच्या मंदिरास बादशहाने लगोलग दहा हजार रुपयांची खैरात पाठविली, आणि अकलूज सोडून तो 15 फेब्रुवारीस बहादुरगडास आला. याठिकाणी संभाजीराजे वगैरे बंदिवान दाखल झाले. ते छावणीच्या बाहेर चार मैलांवर असतानाच बादशहाने असा हुकूम सांगून पाठविला की ‘संभाजी व कवि कलश यांची धिंड काढीत पुढे आणावे.’ त्याप्रमाणे त्यांस चित्रविचित्र पोषाख घालून डोक्यावर विदुषकी टोप्या घातल्या, त्यांस घुंगुर लावलेले होते. नंतर त्यांस उंटावरून मिरवीत वाद्ये वाजवीत हमिदुद्दिन खानाने छावणीतून फिरवीत बादशहासमोर आणले. बादशहा त्या समयी दरबार भरवून सिंहासनावर बसला होता. संभाजीराजा समोर येताच त्याने खाली उतरून गुडघे टेकून अल्लाची प्रार्थना केली, आणि बंदीवानांजवळ जाऊन अल्पकाळ निरीक्षण केल्यानंतर त्यांस परत नेण्याचा हुकूम केला. आदल्या रात्री

समस्त छावणीत संभाजीच्या आगमनाने एवढी गडबड उडाली होती की कोणास झोप सुद्धा आली नाही.

नंतर संभाजीराजांचा निकाल कसा करावयाचा याचा विचार बादशहाने आपल्या सल्लागारांशी चालविला. त्याला न मारता प्रथम त्याजकडून सर्व किल्ल्यांची सोडचिठ्ठी लिहून घेऊन ते हस्तगत करावे अशी कित्येकांची सूचना होती. रुहुल्लाखानास संभाजीराजांकडे पाठवून बादशहाने त्यास विचारले की, ‘तुमचा सर्व खजिना कोठे-कोठे गुप्त ठेवलेला आहे आणि कोण-कोण मोगल अंमलदारांची तुम्हास पत्रे येत असत? तुम्ही बऱ्या बोलाने सर्व हकिकती भरपूर कळवाल आणि मुसलमानी धर्म स्वीकारून बादशहाची सेवा कराल तर तुम्हास जीवदान देऊ.’ पण अपमान सोसून जीव जगविण्याचा संभाजीराजांचा बाणाच नव्हता. तो केवळ अभिमानाचा पुतळा असून आधल्या दिवसाच्या नाटकी मिरवणुकीमुळे अंत:करणात अत्यंत जळत होता. थोर मनाचे गृहस्थ शूर पुरुषाची मानखंडना अशी करीत नसतात. कट्टर शत्रूस सन्मानाने वागविल्याची उदाहरणे इतिहासात काही थोडी नाहीत. पण औरंगजेबाचे अंगी एवढा उदारपणा असता तर त्याचा व त्याच्या राज्याचा अंत इतका शोचनीय झाला नसता. ‘विनाशकाले विपरीतबुद्धि:’ अशी वर्तणूक त्याने करून स्वत:च्या नावास कायमचा काळिमा लावून घेतला. रुहुल्लाखानाचे बोलणे संभाजीराजांनी तिरस्काराने झिडकारून उत्तर केले, ‘बादशहास सांगा, मृत्यु किंवा हालअपेष्टा यास भिऊन हा शिवाजीचा पुत्र जिवाची पर्वा बिलकूल करीत नाही. तुमचा तो दुष्ट धर्म स्वीकारून कायमची अधोगती संपादणे मला इष्ट वाटत नसले तरी बादशहा मला आपली कन्या देऊन जावई करीत असतील तर मी त्यांच्या सूचनेचा विचार करीन. असे करण्यात बादशहाचेच खरे कल्याण आहे.’ संभाजीराजांचे भाषण इतके कठोर व उद्दामपणाचे होते की ते जसेच्या तसे बादशहास कळविण्याची छाती रुहुल्लाखानास झाली नाही. त्याने फक्त मुद्द्याचा आशय त्यास सांगून आपली कामगिरी पार पाडली. संभाजीचे उत्तर मात्र बाणेदार होते.

अशा स्थितीत औरंगजेब संभाजीराजांना थोडीच क्षमा करणार होता! त्याच रात्री बादशहाने संभाजीचे डोळे काढविले आणि कलुशाची जिव्हा छेदली. पुढे यांचे काय करावे याबद्दल बादशहाने मुल्लांचा अभिप्राय विचारला, तेव्हा त्यांनी कळविले, मुसलमानांचे खून व अप्रतिष्ठा करून व त्यांची शहरे लुटून संभाजीने घोर पापाचरण केले असल्यामुळे त्यास मृत्यूचीच शिक्षा योग्य आहे. तेव्हा आता संभाजीराजांकडून जास्त लभ्यांश काहीच होत नाही असे दिसून येताच बादशहाने त्यास ठार मारण्याचा हुकूम फर्मावला. हे सर्व होत असताना बादशहाचा मुक्काम बहादुरगडाहून कोरेगावास गेला. पंधरा दिवस पावेतो संभाजीराजांचे अतोनात हाल करण्यात आले. कोरेगावास गेल्यावर ता. 11.3.1689 रोजी त्याचे व कलुशाचे एकएक अवयव तलवारीने तोडून आणि त्यांचे मांस कुत्र्यांस देऊन शेवटी त्यांचा शिरच्छेद करण्यात आला. उभयतांची शिरे मसाला भरून दुरुस्त केल्यावर ती कैक

दिवस निरनिराळ्या गावांतून वाद्ये वाजवीत मिरविण्यात आली आणि शेवटी फेकून दिली. ती पुढे मराठ्यांनी आणून तुळापूर येथे भीमा-इंद्रायणीच्या संगमावर अग्निसात केली. पुण्याच्या ईशान्येस सुमारे बारा मैलांवर त्या नद्यांचा संगम तुळापुरावर झाला आहे. संगमाच्या खाली भीमा नदीच्यापूर्वकाठी आपटी, वढू (बुद्रुक) व कोरेगाव ही गावे असून बादशहाची छावणी कोरेगावपासून तुळापुरपर्यंत पडलेली होती. तुळापुरचे पूर्वीचे नाव नागरगाव असून शहाजीने केलेल्या हत्तीच्या तुलेवरून त्यास तुळापूर नाव मुरारजगदेवाचे दानप्रसंगाने पडले हे मागे शहाजीचे चरित्रात सांगितले आहे. संभाजीराजांचा अंत्यविधि औरंगजेबाने करविलाच नाही. त्याचा शिरच्छेद वढू येथे झाला. धडाचे तुकडे फेकून देण्यात आले ते हाती लागले नाहीत. शीर तेवढे वढूच्या लोकांनी आणून त्यास तुळापूर येथे संगमावर अग्नि दिला. हल्ली वढू गावात दोन-तीन घुमट्या दिसतात, त्या बहुधा येसूबाई व शाहू यांनी पुढे शिरच्छेदाच्या स्थळी बांधविल्या असाव्यात. कारण 'कै.स्वामींचे वृंदावन मौजे वढू येथे आहे, त्याचे झाडलोटीबद्दल शाहूने ता.30.1.1733 रोजी इनाम जमीन दिली', या लेखावरून अनुमान होते की शिरच्छेदाचे ठिकाणी वृंदावन म्हणजे घुमटी बांधण्यात आली, आणि दहनक्रिया तुळापुरास झाली. दुसरे वृंदावन कलुशाचे असावे.

संभाजीराजे हाती आल्याने बादशहास अत्यंत धन्यता वाटली आणि रायगडावर स्वतंत्र मराठी राज्य स्थापणाऱ्या शिवाजीमहाराजांचे राज्य आपण कायम बुडवले अशी त्याची भ्रामक भावना झाली. औरंगजेबाच्या एकंदर हयातीतील हाच प्रसंग आनंदाचा परमोच्च बिंदू होय. या आनंदातच त्याच्या कारभाराची ओहोट सुरू झाली. मुकर्रबखानाने उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल त्यास 'खानजमान बहादूर फतेजंग', हा बहुमानाचा किताब, पन्नास हजार रुपये रोख बक्षीस, सहा हजारी मनसब, मोलवान पोषाख, हत्ती, घोडे वगैरे देऊन बादशहाने त्याचा गौरव केला. त्याचा मुलगा इख्लासखान यास पंचहजारी मनसब व इतर सहायकांस आणखी काही बक्षिसे दिली. वास्तविक संभाजीराजांवर चढाई करण्याची कामगिरी स.1688 च्या नोव्हेंबरातच निजामउल्मुल्कचा बाप फिरूजजंग यास प्रथम सांगण्यात आली होती, पण त्या संधीत फिरूजजंगाचे डोळ्यांस विकार होऊन तो कायमचा अंध झाला, म्हणून बादशहाने ती कामगिरी आपला पुत्र अजमशहा यास सांगितली. अजमशहा पुण्याचे उत्तर भागी चाकणास येऊन संभाजीराजांचे पाळतीवर राहिला. पण त्याला ती शिकार प्राप्त झाली नाही.

संभाजीराजे हस्तगत होण्यापूर्वीच त्यांचा मेहुणा महादाजी नाईक निंबाळकर याचा निकाल लागला होता. संभाजीराजांचे आज्ञेने तो सन 1685-86 मध्ये फौज घेऊन गोवळकोंड्यांचे मदतीस गेला असता त्यास औरंगजेबाने कुटुंबासह पकडून मरेपर्यंत ग्वाल्हेरचे किल्ल्यावर प्रतिबंधात ठेवले. त्याच्या मृत्युनंतर त्याची स्त्री सखूबाई सती गेली. महादजीस रंभाजीराव म्हणून एक दासीपुत्र होता, त्यास पुढे दोन पुत्र झाले ते निजामाच्या

बाजूस राहिले, एक जानोजी व दुसरा रावरंभा. या दोघांचाही संबंध पेशवाईच्या इतिहासात येतो.

2) संभाजीराजांची योग्यता :-

संभाजीराजांच्या योग्यतेविषयी जास्त काही सांगण्याची जरुर नाही. वर ठिकठिकाणी त्याच्या गुणावगुणांचे स्पष्टीकरण करण्यात आलेच आहे. त्याच्या स्वभावाला विवेक व शांत विचार पारखा होता. अंतर्बाह्य राजकारणाची त्यास चांगली ओळख नव्हती. विश्वासू हेर व चतुरस्र सल्लागार यांच्या साह्याने शिवाजीराजांनी ठिकठिकाणचे राजकारण ओळखून प्रत्येक डाव टाकला, परंतु एका कलुशाशिवाय संभाजीराजांनी कधी कोणाचा सल्ला शांत चित्ताने ऐकल्याचे उदाहरण आढळत नाही. अकबर व दुर्गादास हे दोन पराक्रमी पुरुष त्याजकडे धावून आले. सर्व हिंदुस्थान व विशेषत: राजपुतस्थान गांधीलमाशांच्या पोळ्यांप्रमाणे बादशहाचा चावा घेण्यास टपले होते. त्यांचेच हे दोन प्रतिनिधी जवळ आले असातना सहा वर्षे पावेतो त्यांचा पुरस्कार स्वीकारण्यास संभाजीराजांस सामर्थ्य किंवा इच्छा झाली नाही; अथवा संधी आली नाही, हाच त्यांच्या बुद्धीचा कोतेपणा होय. ‘समर्थ रामदासांनी उत्तरेकडील राजपुत्राचे आगमन झाले म्हणोन ऐकिले, ते समयी बोलले, ते प्रांतीचे लोक अनुकूल करून घेतील तर उभयता योगे कार्यसिद्धिच आहे, परंतु त्वरा पाहिजे,’ समर्थांचा हा अभिप्राय महत्त्वाचा आहे. म्हणजे ते राजकारण अशक्य कोटीतले नव्हते असा तत्कालीन समज होता. पण हिंदुस्थानचे संकलित राजकारण संभाजीराजांस कळलेच नाही. दक्षिणेत बादशहा डोंगरी प्रदेशांतून आपल्या फौजा पसरून झगडत असताना एखादी संधी साधून खुद्द संभाजीराजे त्याजवर समोर तुटून पडले असते तर, बादशहा तर नामोहरम झालाच असता, पण त्यामुळे सिद्दी, पोर्जुगीझ हेही आपोआप नरम आले असते. असा समोर हल्ला करणेत्यास अशक्य वाटत हेते, तर थेट नर्मदोत्तर हिंदुस्थानात धडाडीने प्रवेश करून अकबराला दिल्ली-आगऱ्याकडे पोहोचविला असता तरी औरंगजेब थंड पडला असता. शहाजहान युवराज असताना त्याने आपल्या बंडखोरीने सर्व हिंदुस्थान दोनदा पालथे घातले. जाधवराव, बाबूराव काटे यांच्यासारखे मराठे सरदार देखील त्याजबरोबर हिंदुस्थानात फिरून आलेले होते. धडाडी व हिंमत संभाजीराजांस खचित होती. पण रायगड विशाळगडच्या जंगलातच ते सारखे गुरफटून राहिले. संभाजीराजे स्वत: शूर व धाडसी होते, परंतु सेनापतीला आवश्यक लागणारे रणांगणावरचे किंवा मुत्सद्देगिरीचे डावपेच त्यांना कळत होतेसे दिसत नाही आणि ते कळत असले तरी दमाने व सोयीने सर्व संधाने जुळवून आणण्याची दीर्घदृष्टी त्यांचे ठिकाणी नव्हती. संभाजीराजे व त्यांचे साथीदार गनिमी काव्याची कला उत्कृष्ट जाणत होते. राजपुतांनी या

गनिमी काव्याचा अवलंब करून बादशहास दोन वर्षे चणे चारले. शहाजादा अकबर हीच भावना त्यास सारखा पढवीत होता. सुरत भडोचपर्यंत संभाजीराजांच्या फौजा गेल्याही होत्या. तेव्हा संभाजीराजांची एवढी मोठी हिम्मत सात-आठ वर्षांत काहीच दृश्य करामत न करता अखेर शत्रूच्या निर्घृण शस्त्रास अमानुषतेने बळी पडली हे पाहून केवढा उद्वेग वाटला पाहिजे! समर्थ रामदास व अमात्य रघुनाथ पंडित हणमंते यांची संगत व शिकवण शिवाजीराजांच्या वेळेपासून संभाजीराजांस लाभली होती, पण तिचा उपयोग त्यांच्या चारित्र्यास झालेला दिसत नाही. समर्थांनी त्यास समजुतीचे पत्र लिहिले आणि त्याचे अत्याचार ऐकून उद्वेग व्यक्त केला!

मनूचीने संभाजीराजांची बरीच हकिगत दिली आहे. त्या दोघांची भेट झालेली असून, मनूची त्यावेळी दक्षिणेतच असल्यामुळे संभाजीराजांसंबंधाने त्याचा अभिप्राय जमेस धरण्यास हरकत नाही. मनूची लिहितो, 'लोकांच्या बायकांवर बदनजर ठेवतो म्हणून संभाजीराजांचे अंमलदार त्याजवर अत्यंत नाराज झाले. शत्रूंना तोंड देण्याची निकडीची वेळ आली असताना दुसऱ्यांच्या बायकांशी दुर्वर्तन करण्याची त्याला जडलेली खोड नाहीशी होईना, तेणेकरून तो आपल्या स्वातंत्र्यास व प्राणांस मुकला.'

संभाजीराजांसंबंधाने रामचंद्रपंत अमात्याने आपल्या राजनीतित स्पष्ट अभिप्राय दिला आहे, तो सर्वथा ग्राह्य मानला पाहिजे. तो लिहितो, 'औरंगजेबासारख्या महान शत्रूशी परस्पर प्रसंगातिशयामुळे संपूर्ण राज्यातील प्रजा पीडा पावली. देशद्वीपांतरातून वस्तुजाताचे येणे राहिले. कित्येक सैनिक स्वामिकार्यावर क्षत्रधर्मे खर्च जाहले. कित्येक हतसैन्य होत्साते शत्रूस मिळून गेले. स्वस्वामी शत्रूसम व्यसनासक्त पाहून स्वतंत्रवादे देशदुर्ग आक्रमून बसले. कित्येक स्थळोस्थळी कलहास प्रवर्तले. या विषमसंधीमध्ये श्यामलादि क्षुद्रास अवकाश मिळून बद्धमूल जाहले. अवशिष्ट देश उद्ध्वस्त व दुर्ग सामग्रीरहित जाहले. राज्यमर्यादा राहून गेली.'

संभाजीराजांच्या व्यसनांचे वर्णन कृष्णाजी अनंत सभासदाने त्याच्या मृत्युनंतर पाच वर्षांनी त्याच्या भावास ऐकविले, ते सत्य समजण्यास काही हरकत नाही. तो लिहितो, 'अवघ्या सरकारकुनांस विश्वास देऊन धरिले. थोर-थोर ब्राह्मणांस मारिले. ब्रह्महत्या केली. मराठे यांस व लष्करचे सरदारांस मारिले, धरिले, इज्जत घेतली. लहान माणसे गुलाम यांचा पगडा पडला. थोर लोकांची चाल मोडली. संभाजी कैफ खात, गांजा ओढीत, इषकबाजी करीत. गडकोट देशामध्ये अनायक जाहली. राजाने परामर्ष घेतला नाही. द्रव्य खजिना उडविला, सर्व राज्य गमावले, शेवट दगा खाल्ला.'

राज्यकारभाराचे व न्याय निवाड्याचे संभाजीराजांचे कित्येक कागद उपलब्ध आहेत, त्यांवरून निष्पक्षपाती न्याय देण्याची त्याची आवड व प्रजाहिताची कळकळ व्यक्त होते. 'साहेबी आपणास बोलावून आणून, वाजपूस करून, कवि कलश व सरकारकून सदरेस बसोन मनसुफी केली,' असे उल्लेख कैक आहेत. बापाच्या वेळची इनामे व उत्पन्ने त्याने

बहुधा अविच्छिन्न चालू ठेवली, मात्र त्याच्या संशयी वृत्तीच्या सपाट्यात जे कोणी सापडले त्यांचा अतर्भाव यात करून उपयोग नाही. असे प्रकार सोडून दिले तर सामान्यत: मनुष्याची कदर व औदार्य हे त्याचे गुण पुष्कळ ठिकाणी व्यक्त झाले. राणी येसूबाईवर त्याचे प्रेम अढळ होते आणि आपण गाफिलपणाने भलतीच गोष्ट करितो याची जाणीव त्यास असल्यामुळे शिक्का मोर्तब तो येसूबाईच्या ताब्यात ठेवी असे बखरकार लिहितात. एकंदरीत संभाजीचा कारभार अनेक दृष्टींनी राज्यविघातक झाला असला, तरी त्याने आपल्या अपराधांबद्दल भरपूर प्रायश्चित्त भोगले ही गोष्ट मनात बाळगली असता त्याजबद्दलच्या आपल्या कठोर भावना बोथट होऊ लागतात. शौर्य, साहस, बेडरपणा इत्यादि त्याचे गुण जसे त्याच्या एकंदर कारभारात दिसतात तसेच ते त्याच्या अखेरच्या कठोर प्रसंगातही तितकेच निदर्शनास येतात. स्वत:च्या कारभारात त्याचे स्खलन झाले असले तरी त्याजबद्दल भोगलेल्या भरपूर प्रायश्चित्ताने त्याने महाराष्ट्रीयांचे अंत:करणात नवीन भावनेचा संचार उत्पन्न केला आणि या संचाराच्या जोरावरच पुढे मराठ्यांनी मोगल बादशाही उलथून पाडली, हे प्रकार आपण त्यांची योग्यता ठरवताना लक्षात ठेवले पाहिजेत.

संभाजीराजांच्या अंगी विशेष विद्वत्ता नव्हती. बापाने त्यास शिकविण्यास पंडित ठेवले होते. पण धामधुमीच्या त्या काळात लेखन पठणास सवड मिळाली असेल असे वाटत नाही. मथुरेस काशी पंडिताच्या घरी त्याचा काही काल वास झाला, त्यावेळी इतर विद्यार्थ्यांबरोबर तो काही थोडे पढत असे, असे बखरकार लिहितात. त्यास हिंदी कवने करण्याचा नाद होता, तो कलुशाच्या सहवासात उत्पन्न झाला असावा. ‘नखशिखा’ व ‘नायिका भेद’ या नावाची दोन हिंदी काव्ये संभाजीराजांनी लिहिलेली म्हणून उपलब्ध झाली आहेत. त्यावरून ते स्त्रीलंपट व रंगेल बनलेले असावेत असे म्हणण्यास हरकत नाही. त्याचा सल्लागार कलुशा बराच पढलेला होता आणि त्याची भाषा हिंदी असल्यामुळे संभाजीराजांस हिंदी संभाषण करता येत असले पाहिजे. लहानपणी अल्पस्वल्प संस्कृत भाषेचे अध्ययन संभाजीराजांनी केले असावे असे बुधभूषण नावाचे काव्य त्याचे नावावर रचलेले आहे, त्यावरून म्हणता येते.

किंकेडच्या इतिहासात खालील मजकूर आहे. ‘केशव पंडित अध्यक्ष हा संभाजीचा मित्र असून त्याजपाशी त्याने वाल्मिकी रामायण वाचले. त्या पंडिताला सन 1684 मध्ये 1600 लारी दिल्याचा दाखला सापडतो. नखशिख व नायकभांड हे दोन हिंदी प्रबंध लिहून त्याने आपली प्रेमरसाची आवड व्यक्त केली आहे.’ राजारामचरिताचा लेखक केशव दामोदर पुरोहित हाच बहुधा संभाजीराजांचा वरील मित्र असावा. शिवाय कवि महेशदास म्हणून एक पंडित संभाजीराजांचे दरबारी होता.

संभाजीराजांचे ठिकाणी स्वधर्माबद्दल अत्यंत आदर वसत होता हे दाखविण्यास त्याच्या अनेक सनदांपैकी खालील एकच उतारा पुरेसा आहे. ‘लखवा लिंगपा मामले

तोरगळ यांनी विनंति केली की गतवर्षी तारा मोगल (अजमशहा) लष्कर समवेत येऊन कसबे मजकूरची घरे, वाडे, पेठ जाळून तलफ केली, गावात जागृत देवस्थान होते ते छिन्नभिन्न केले. दुसरी थोर देवालये होती ती मोडली. त्या योगे गावात मरग सुटला. माणसे मरू लागली. रयत लोक राहेनासे झाले. पांढरी बसली. पुरातन मूर्ती दुरात्म्यांनी विच्छिन्न केल्या. महाराज छत्रपति महाराष्ट्र राजा आहे, त्यांची देवस्थाने छिन्नभिन्न असो नयेत. ती बांधून ऊर्जा चालवावी. तूर्त नवलगुंदात देवळेच नाहीतशी झाली आहेत. ऐशास, वेदमूर्ति काशीनाथभट वाराणसीकर बहुत योग्य भले ब्राह्मण आहेत. विचारमते पाहता हिंदुकीची गोष्ट खरीच. उदंड खर्चवेच महाराजांचे दरबारात होऊन जातो, त्यापरीच श्रींचे ऊर्जेस वेच जाहला तरी त्याचे पुण्य व श्रेय छत्रपति महाराजांस येईल. तरी यास इनाम सर्वमान्य करून दिल्हे असे. (ता.22.8.1685). याच मासल्याच्या आणखीही पुष्कळ सनदा आहेत. मोगलांनी बलात्काराने बाटविलेल्या हिंदूस प्रायश्चित्ताने शुद्ध करून परत स्वधर्मात घेण्याचा शिवाजीमहाराजांचा शिरस्ता संभाजीराजांनीही तसाच पुढे चालू ठेवला. खरे म्हटले तर नवीन चांगले शिरस्ते व धारे उत्पन्न करण्याची संभाजीराजांस ताकदच नव्हती. पण कै.शिवाजीमहाराजांनी अमुक असे केले होते, असा दाखला पुढे आल्याबरोबर तो सर्वथैव मान्य करण्यापलिकडे त्यास गत्यंतरच नव्हते. म्हणून त्याचे बहुतेक निवाडे व हुकूम पूर्व प्रघातास अनुसरून होते. ‘गंगाधर रघुनाथ कुळकर्णी’ हा ब्राह्मण मोगलांनी बाटवून कैक वर्षे आपल्या नोकरीत ठेवला. त्याने ज्ञातीस शरण येऊन छत्रपतिंपाशी प्रायश्चित्ताची याचना केली, तेव्हा छंदोगामात्यांनी विद्वत्सभा भरवून शास्त्राधारे प्रायश्चित्त ठरवून त्यास शुद्ध केले.’ (ता.16.4.1686). अशी उदाहरणे पुष्कळ असली पाहिजेत.

3) बायका मुले :-


संभाजीची बायको जिऊबाई उर्फ येसूबाई हिचे नाव त्याच्या कारभारात प्रामुख्याने आले पाहिजे. ही गणोजी शिर्क्याची बहीण आणि गणोजी हा शिवाजीचा जावई. शिवाजीची बायको सोयराबाई ही गणोजीची आत्या. म्हणजे शिर्क्यांचे हे घराणे छत्रपतींच्या निकट आप्तांपैकी होय. सोयराबाईने संभाजीविरूद्ध राजकारण केले त्यात कदाचित शिर्क्यांचा तिला अंतस्थ पाठींबा असेल. आपल्या माहेरच्या मंडळींचा नवऱ्याने छळ केला त्याचा राग सोडून देऊन येसूबाईने असलेल्या परिस्थितीत शक्य तितके नवऱ्याचे मन वळवून त्याजकडून राज्याच्या हिताची कामे करविली. नवऱ्याच्या सुखदु:खाची ती पूर्ण वाटेकरीण बनली होती. आणि ‘गृहिणी सचिव: सखी मिथ:’ असे कवीने वर्णिलेले गुण आपल्या या प्रियपत्नीच्या अंगी आहेत अशी खुद्द त्याचीच खात्री होती. शिवाजीविरूद्ध तो दिलेरखानास जाऊन मिळाला, तेव्हा ही बायको त्याजबरोबर होती. तो नुसता चैनी गडी

असता तर हे बायकोचे लटांबर त्याने आपल्याबरोबर कशाला बाळगले असते? सन 1681-82 मध्ये दिलेरखानाने तिला व मुलीला पकडून नगरचे किल्ल्यावर कैदेत ठेवलेले होते, त्यातून संभाजीने तिला सोडवून आणले. येसूबाईशिवाय दुसरी विवाहित स्त्री संभाजीस असल्याचा उल्लेख नाही. मदनसिंग वगैरे दासीपुत्र होते त्यावरून त्याला उपस्त्रिया असाव्यात. त्याच्या वर्तनास बेहोष शब्द लावलेला बखरीत आढळतो. येसूबाईस दोन मुले झाल्याचा उल्लेख आहे. वडिलमुलगी भवानीबाई हिचा जन्म ता. 28.1.1679 रोजी शृंगारपूर येथे आणि मुलगा शाहू याचा जन्म 17.5.1682 रोजी गंगावली येथे झाल्यामुळे, प्रवासात सुद्धा ती नवऱ्याबरोबर असावी असे दिसते. शृंगारपूर संगमेश्वराजवळ असून ते सुर्व्यांचे गाव आहे. शिर्क्यांचे कुटऱ्यापासून ते जवळच असून बहुधा येसूबाई बाळंतपणासाठी आजोळी गेली असावी. गंगावली हे ठिकाण रायगडाचे आसमंतात माणगावाजवळ आहे. भवानीबाईचे लग्न पुढे हरजी महाडिकाचा मुलगा शंकराजी याच्याशी होऊन ती सती गेली. या तपशिलांवरून येसूबाईचा स्वभाव व वळण यांचा अंदाज बांधता येतो. रायगडावर संभाजीराजांनी सन 1681 च्या पावसाळ्यात सोयराबाईच्या कटामुळे जुन्या अनुभवी मंडळींचा वध केला, त्या संबंधाने तिने नवऱ्याला चार हिताच्या गोष्टी सांगून त्याला शांत केले. बाळाजी आवजीचा मुलगा खंडो बल्लाळ यास तिनेच पुन्हा वडिलांच्या पदावर दाखल करविले. अष्टप्रधानांची कामे पूर्वीच्याच इसमांकडे ठेवण्याविषयी तिने आपले वजन खर्च केले असले पाहिजे. संभाजीराजांसारखे आवेशी गृहस्थ जितके क्रोधाविष्ट होतात तितकेच ते प्रेमवशही असतात, हा सामान्य अनुभव पाहता, संभाजीच्या कारभारात येसूबाईचे अंतस्थ वजन बरेच असावे असे अनुमान होते. संगमेश्वरास तो पकडला गेला तेव्हा ती रायगडावर होती. तेथे पुढे ज्या वाटाघाटी झाल्या त्यात तिने स्वतःच्या जिवाची पर्वा न करता राज्याच्या हिताकरिता राजारामाला बाहेर जाण्याचा सल्ला दिला आणि आपण बादशहाच्या कैदेचा बंदिवास पत्करला, हा मोठाच स्वार्थत्याग म्हटला पाहिजे. तिची जाऊ ताराबाई देखील कर्तृत्ववान व कदाचित जास्त राजकारणी अशी म्हणता येईल. दोघींची कर्तबगारी मराठ्यांचे इतिहासात पुष्कळ प्रगट झाली असून शिवछत्रपतींच्या या दोन स्नुषांची चरित्रे अत्यंत चित्ताकर्षक व एकंदर हिंदी स्त्रियांना शोभा आणणारी आहेत.

- समाप्त -



संभाजीची गोव्यावर चढाई


संभाजीचें वधस्थान
पृष्ठ ९९
* * * * *
बादशहाची छावणी
पुणे
मुंढवें
हडपसर
आळंदी
चिखली
देहू
पिंपरी
चाकण
खडकी
धोरपडी